शनिवार
३ जानेवारी १९८१

# माणूस

किंमत
एक रुपया

## हा परीक्षक समितीचा अवमान नाही का ?

जनांचा प्रवाहो चालिला (ले. विनय हर्डीकर), सिंहासन (ले. अरुण साधू) व लोकनायक जयप्रकाश (ले. बा. न. राजहंस) या तीन पुस्तकांना पारितोषिके नाकारून महाराष्ट्र शासनाने आपल्या साहित्यिक अज्ञानाचे चांगलेच प्रदर्शन केलेले आहे. शासनाचा हा निर्णय पूर्ण कायदेशीर व नियमांच्या चौकटीत बसणारा असेलही; कारण यासाठी नियुक्त केल्या गेलेल्या तज्ज्ञांच्या समितीकडे फक्त पारितोषिकयोग्य ग्रंथांची शिफारस करण्याचे काम असते व समितीच्या सर्व शिफारसी जशाच्या तशा स्वीकारण्याचे बंधन कोणतेही शासन केव्हाही पत्करू शकणार नाही, हे खरेच आहे; परंतु गेल्या अनेक वर्षांचा प्रघात असा की, तज्ज्ञांच्या अशा समितीच्या शिफारसी शासनाने डावललेल्या नाहीत. डावलल्या असल्यास निदान तसे बाहेर तरी आले नाही. यंदाच प्रथम शासनाने आपला अधिकार बजावला. वरील तीन पुस्तकांना पारितोषिके देण्याची समितीची सूचना फेटाळली व एका वादाला निष्कारण आमंत्रण दिले. विधानपरिषदेत शिक्षणमंत्री व मुख्यमंत्री यांनी केलेला खुलासा तर या समितीचा आणखीनच अवमान करणारा आहे. शिक्षणमंत्री व मुख्यमंत्री म्हणतात की, वरील तीन पुस्तकांना कोणतेही साहित्यगुण नसल्याने व राज्यकर्त्यांविरुद्ध आकस दर्शविणारा काही भाग या पुस्तकांतून आढळल्याने तज्ज्ञ समितीच्या शिफारस–यादीतून ही तीन पुस्तके वगळण्यात आली. याचा अर्थ शासनाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या तज्ज्ञतेवरच शासन अविश्वास दाखवते असा होतो. राजकीय कारणास्तव वरील तीन्ही पुस्तकांची नावे अंतिम यादीतून वगळण्यात आली, यापेक्षा अधिक भाष्य करण्याची शिक्षणमंत्र्यांना-मुख्यमंत्र्यांना वास्तविक गरज नव्हती; पण त्यांनी हा अव्यापारेषु व्यापार केला आहे व त्यामुळे तज्ज्ञ समितीच्या सदस्यांची आणखीनच पंचाईत होणे साहजिक आहे. आपल्या शिफारसी नाकारल्या गेल्या याबद्दल या समितीचे अध्यक्ष श्री. गंगाधर गाडगीळ व एक सदस्य प्रा. राम शेवाळकर यांनी पत्रे पाठवून शासनाकडे खुलाशाची मागणी केल्याचे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले होते; पण या पत्रांना शासनाकडून काय उत्तरे आली, मुळात ती आली की नाही, हे सगळेच अद्याप गुलदस्तात आहे. ही पहिली उपेक्षा गिळली जाते न जाते तोच शिक्षणमंत्री–मुख्यमंत्री यांनी समितीने निवड केलेल्या वरील तीन पुस्तकांत साहित्यगुण नसल्याचे सांगून तज्ज्ञ समितीच्या या क्षेत्रातील अधिकारावरच अतिक्रमण केले आहे. हे अतिक्रमण तज्ज्ञ समितीचे सभासद कसे थोपवून धरणार आहेत ? का त्यांना हे अतिक्रमण वाटतच नाही ? हा अवमान वाटतच नाही ? म. टाइम्स-मध्ये पत्र लिहून (दि. २७ डिसेंबर) सुप्रसिद्ध साहित्यिक दि. बा. मोकाशी व वि. ग. कानिटकर यांनी असे आवाहन केले आहे की, "परीक्षक समितीने निवडलेली पुस्तके नाकारणे यात परीक्षकांचा अपमान आहे तो जाणून समितीने निषेधाचे संयुक्त पत्रक काढावयास हवे. शिवाय समितीच्या सभासदांनी परीक्षक म्हणून मिळणारा मोबदला नाकारावयास हवा व बक्षीससमारंभावर बहिष्कार टाकावयास हवा. खरे म्हणजे ज्या क्षणी हा हस्तक्षेप झाला त्या क्षणी परीक्षक मंडळाने निषेध करायला हवा होता." हे म्हणजे फारच झाले. मोबदला कसा काय नाकारावयाचा ? तो केलेल्या कामाबद्दल असतो, असे परीक्षक समिती म्हणेल. तेव्हा ही मागणी मोकाशी-कानिटकर मागे घेतील अशी आशा आहे. तसेच परीक्षक मंडळाने तावडतोब निषेध करायला हवा होता, ही त्यांची अपेक्षाही आता पूर्ण होणे शक्य नाही. कारण अगोदरच उशीर होऊन गेलेला आहे. तेव्हा हस्तक्षेपाबद्दल निषेधाचे संयुक्त पत्रक व समारंभावर बहिष्कार या दोन मागण्याच फार तर मंजूर होऊ शकतील. तेवढ्या करायच्या तरी अंतुले सरकारची थोडीफार खप्पा मर्जी समितीच्या सदस्यांना स्वतःवर ओढवून घ्यावी लागणारच ! काय हरकत आहे एवढासा धोका पत्करायला ? नाही तरी असा वेडेपणा करत राहणारे सरकार फार काळ टिकून राहात नसतेच.

दरम्यान मंगेश पाडगावकर, य. दि. फडके, महावीर जोंधळे व आणखी काही लेखकांनी आपल्याला मिळालेली पारितोषिके नाकारण्याचा जो बाणेदारपणा दाखविला आहे तो अभिनंदनीयच आहे.

पारितोषिके नाकारलेल्या वरील पुस्तकांना 'जनपारितोषिके' देण्याची कल्पना निघाली आहे, तीही चांगली आहे. मागे दुर्गा भागवत यांनी वंदे मातरम् ट्रस्टची कल्पना काढली होती. त्याप्रीत्यर्थ काही निधीही जमा झाला; पण पुढे ही कल्पना बारगळली. या ट्रस्टला पुन्हा चालना देऊन त्यामार्फत जनपारितोषिके का दिली जाऊ नयेत ? दुर्गाबाईंना हवी असलेली शासनाशी संपूर्णतया फटकून राहण्याची भूमिका आजच्या काळात तरी बहुतेकांना मान्य होण्यासारखी नाही. ती भूमिका थोडी व्यवहारवादी करून अशा जनपारितोषिकांचा उपक्रम लगेच चालू करण्यात आला तर वाइटातून तेवढेच चांगले निघाले असे होईल. हेही नसे थोडके....

पुणे वार्ता

# संरक्षणव्यवस्थेची फेरतपासणी हवी
## –एअर मार्शल मालशे

२७ डिसेंबर. पुण्यातलं टिळक स्मारक मंदिराचं सभागृह. पंडित हृदयनाथ कुंझरू संरक्षण अभ्यास केंद्राच्या वतीनं आज या ठिकाणी एअर मार्शल यशवंतराव मालशे यांचं 'भारतीय वायुसेनेचं कार्य' या विषयावर भाषण होते. श्री. मालशे भारतीय हवाईदलात छत्तीस वर्षं सेवा करून आता निवृत्त झाले आहेत. तसेच 'इंडियन एअरपोर्ट अॅथॉरिटी' या संस्थेचे ते भूतपूर्व अध्यक्ष आहेत. त्यामुळं अनुभवाचं भक्कम बळ असलेल्या या सेनाधिकाऱ्याकडून खूप काही ऐकायला मिळेल अशी सभागृहात जमलेल्या दीड-दोनशे श्रोत्यांची अपेक्षा होती आणि श्री. मालशे यांनी ती बऱ्याच अंशी पूर्ण केली.

भारतीय वायुसेनेच्या कार्याचं मूल्यमापन करण्यापूर्वी कोणत्याही देशाच्या हवाईदलाला कोणती महत्त्वाची कर्तव्यं बजावावी लागतात हे स्पष्ट करताना श्री. मालशे म्हणाले, 'परकीय हल्ल्यापासून स्वत:च्या देशाच्या भूमीचं आणि अवकाशाचं संरक्षण करणं हे हवाईदलाचं मूलभूत कर्तव्य असतं. यामध्ये शत्रूला कोणत्याही कारणास्तव आपल्या हवाईहद्दीत शिरू न देणं याचाही समावेश आहे याचबरोबर युद्ध सुरू झाल्यावर शत्रूच्या प्रदेशात खोलवर चढाया करून त्याचे लष्करी तळ व दळणवळणकेंद्रं उद्ध्वस्त करणं आणि त्यायोगे त्याची लढण्याची उमेद खच्ची करून टाकणं हे हवाईदलाचं काम असतं. अशा तऱ्हेनं शत्रूवर आक्रमक हल्ले चढवत असतानाच आपल्या भू-दलाला आणि नौदलाला हवाईसंरक्षण देण्याचीही जबाबदारी वायुसेनेवर असते. यामध्ये आपल्या भूदल किंवा नौदलावर शत्रूने हवाईहल्ले करू नयेत म्हणून त्याच्या हवाईतळावर आपणच जोरदार हल्ले करून ते जास्तीत जास्त निकामी करण्याची कामगिरी वायुसेनेला बजावावी लागते.

'भारताच्या संरक्षणाचा विचार केल्यास आपल्या असं लक्षात येईल की, भौगोलिकदृष्ट्या भारताच्या पश्चिम सीमेवर पाकिस्तान व उत्तरेला चीन ही दोन राष्ट्रं आहेत आणि भारताचं त्याच्याशीच युद्ध होण्याची शक्यता आहे. कारण देशाच्या दक्षिण व पूर्वेला असलेल्या सागरी भागावरून आपल्याला हल्ला होण्याची फारशी शक्यता नाही.

'यापैकी पाकिस्तानशी सुरुवातीपासूनच आपले कधीही मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित होऊ शकलेले नाहीत. किंबहुना पाकिस्तान या देशाला अजून स्वत:चंच मर्मस्थान सापडलेलं नाही. अतिशय अस्थिर व अनिश्चित स्थितीमध्ये गेली तीस वर्षं हा देश झगडत आहे. युद्धाच्या दृष्टीनं पाकिस्तानच्या लष्करी बळाचा विचार केला तर असं जाणवतं की, या देशाला मध्यआशियातून उत्कृष्ट रसद-पुरवठा सातत्यानं चालू आहे. असं सांगितलं जातं की, १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धामध्ये मध्यआशियातील काही देशांच्या स्क्वाड्रन्स पाकिस्तानच्या बाजूने उतरल्या होत्या. अर्थात यामुळे घाबरून जायचं कारण नाही; पण हा मुद्दा आपण लक्षात ठेवला पाहिजे.

'भारत-पाकिस्तान-सीमेचं असं वैशिष्ट्य आहे की, या संपूर्ण सीमेवर कुठंही फार मोठे डोंगर किंवा जंगलं नाहीत. या परिसरातलं हवामानही आधीच अंदाज वर्तवण्याइतपत स्थिर आहे. तसंच पाकिस्तानबरोबर कधी युद्धाचा प्रसंग आलाच तर त्या


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : एकतिसावा

३ जानेवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

युद्धाचा काळही अतिशय मर्यादित असेल. म्हणून अशा युद्धात हवाईदलाच्या सहकार्यानं आपलं भूदल युद्धबंदी जाहीर होण्यापूर्वी शत्रूचा किती प्रदेश पादाक्रांत करू शकतं, यावरच या युद्धाचा निर्णय अवलंबून असेल.

'देशाच्या उत्तर सीमेची भौगोलिक रचना मात्र पश्चिम सीमेच्या अगदी उलट आहे. विविध उंचीचे डोंगर, हिमालयाची पर्वतराजी, मोठमोठ्या नद्या, घनदाट जंगलं यानी हा प्रदेश व्यापलेला आहे. त्यामुळं इथं शत्रूवर आक्रमक हल्ले चढवण्यापेक्षाही वाहतूक व संरक्षणाची जबाबदारी हवाईदलावर जास्त येते. आजपर्यंत या दोन्ही सीमांवर भारतीय वायुसेनेने स्पृहणीय कामगिरी बजावली आहे.

बदलत्या काळातील युद्धतंत्राच्या दृष्टिकोनातून भारतीय हवाई दलाचं मूल्यमापन करताना श्री. मालशे म्हणाले, 'आज जास्तीत जास्त कमी उंचीवरून उडू शकणाऱ्या, भरपूर दारुगोळा वाहून नेऊ शकणाऱ्या आणि तरीही चारशे-साडेचारशे किलोमीटर अंतर विनासायास कापून शत्रूच्या प्रदेशात खोलवर चढाया करू शकणाऱ्या लढाऊ विमानाची गरज आहे. विशेषतः शत्रूच्या विमानदलाशी हवाई धुमश्चक्री सुरू झाली तर त्यातून सुखरूपपणे बाहेर पडून परतणं फार कठीण असतं. यांसाठी अत्याधुनिक रचनेच्या फायटर्सची गरज असते. गेली तीन वर्षं आपल्याकडे वादग्रस्त ठरलेली इंग्लंडची 'जाग्वार' ही लढाऊ विमानं त्या दृष्टीनं अत्यंत उपयुक्त आहेत. नजीकच्या भविष्यकाळात भारतीय हवाईदलाला ज्या काही कामगिऱ्या कराव्या लागतील त्यासाठी ही विमानं उत्कृष्ट साथ देऊ शकतील, असं मला वाटतं. शिवाय त्याच्या रचनेविषयीचं तात्त्विक ज्ञान भारतीय तंत्रज्ञानाही असल्यामुळं आणि या विमानाचे काही महत्त्वाचे सुट्टे भाग भारतातच तयार करण्याची योजना असल्यामुळं ही विमानं काही कारणानं नादुरुस्त झाल्यास आपल्याला लगेच इंग्लंडकडे धाव घ्यावी लागणार नाही.

'पण अशा तऱ्हेनं परदेशी बनावटीची लढाऊ विमानं किंवा शस्त्रास्त्रं स्वातंत्र्याची तेहतीस वर्षं उलटल्यावरही खरेदी करावी लागणं ही काही आपल्या देशाच्या दृष्टीनं समाधानाची गोष्ट नाही. सुमारे वीस वर्षांपूर्वी श्री. सी. सुब्रह्मण्यम् याच्या अध्यक्षतेखाली केंद्रशासनाने देशाच्या संरक्षणव्यवस्थेची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने शासनाला आपला अहवालही सादर केला. त्यात असं म्हटलं होतं की, लवकरच आपला देश संरक्षणविषयक तंत्रज्ञान व उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल; पण प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच आहे'

'आज कोणतंही लढाऊ विमान परदेशाकडून विकत घ्यायचं म्हटलं तर एका विमानासाठी सुमारे दहा कोटी रुपये किंमत पडते जी जाग्वार लढाऊ विमानं आपण आयात करणार आहोत त्यासाठी आपल्याला सुमारे दोन हजार कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. अशा तऱ्हेने स्वत:च्या संरक्षणासाठी कायम परकीय मदतीवर अवलंबून राहणं शहाणपणाचं ठरणार नाही.

'आज आपली रडारयंत्रणा व दळणवळणव्यवस्था उत्तम आहे, शस्त्रास्त्रांच्या निर्मितीबाबत आपण चांगली प्रगती करत आहोत; पण आपल्या हवाईदलात मात्र चाळीस वर्षांपूर्वीचीच विमानं अजूनही वापरली जात आहेत. १९७१ सालच्या पाकिस्तानबरोबरच्या युद्धात आपण कॅनबेरा विमानं वापरली; पण ती इतकी दुबळी होती की कॅनबेरा घेऊन शत्रूच्या प्रदेशात फक्त रात्रीच्या वेळीच हल्ले करणं शक्य होत असे. अजूनही आपण व्हॅंपायर, मिग- २१, नॅट, एच एफ- २४, कॅनबेरा असल्या जुनाट लढाऊ विमानावरच फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहोत. थोडक्यात आपल्या वायुसेनेतला विमानाचा ताफा म्हणजे 'पुणेरी मिसळ' आहे!

'ही परिस्थिती बदलवण्यासाठी आपल्या देशाच्या संरक्षणव्यवस्थेच्या संपूर्ण विकासाचीच एकदा फेरतपासणी केली पाहिजे आणि आवश्यक त्या ठिकाणी देशाच्या संरक्षणाच्या गरजा लक्षात घेऊन पुनर्रचना ही झाली पाहिजे. कारण देशाच्या अर्थकारणावरील संरक्षणव्यवस्थेचा ताण कमी करण्यासाठी संरक्षण-उत्पादनामध्ये आपण लवकरात लवकर व जास्तीत जास्त प्रमाणात स्वावलंबी होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने केंद्रशासन सध्या उचलत असलेली पावलं स्वागतार्ह आहेत!'

श्री. मालशे याच्या भाषणाचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते उत्कृष्टपणे बेतलेलं होतं. आपल्या भाषणाची व्याप्ती श्री. मालशे यानी सुरुवातीलाच श्रोत्याना सूत्ररूपानं सांगितली होती आणि त्या सूत्राला धरूनच त्यानी आपलं भाषण केलं. यामुळे देशाची संरक्षणव्यवस्था व हवाईदलाच्या कार्याबाबत असणारे अनेक समज-अपसमज दूर होऊ शकले.

पंडित हृदयनाथ कुंझरू संरक्षण अभ्यासकेंद्राच्या वतीने याच ठिकाणी गेल्या महिन्यात (ता. २२ नोव्हेंबर) भारताचे माजी सरसेनापती गोपाळराव बेवूर याचं भाषण झालं होतं. आपल्या भाषणात त्यानी 'आपला शत्रू कोण व त्याचं सामर्थ्य किती याचा हिशेब करून आपण संरक्षण-उत्पादनात गुंतवणूक केली पाहिजे' असा विचार मांडला होता. तसंच 'भारताने अत्याधुनिक, परदेशी बनावटीची महागडी शस्त्रास्त्रं खरेदी करण्यामध्ये आपले श्रम व पैसा घालवण्यापेक्षा सध्या आपण वापरत असलेल्या शस्त्रास्त्राचे सुट्टे भाग निर्माण करण्यावर जास्त भर दिला पाहिजे, असा सल्लाही बेवूरसाहेबानी दिला होता.

या दोन ज्येष्ठ सेनाधिकाऱ्यांच्या भाषणाचा विचार केला तर आपल्या असं लक्षात येईल की, भारतीय युद्धतंत्र, युद्धनीती, भारतीय जवान व तंत्रज्ञाची बुद्धिमत्ता आणि कुशलता याबाबत त्याना अजिबात संदेह नाही; पण भारताचं संरक्षणविषयक अर्थकारण मात्र

त्यांना अतिशय भेडसावत आहे म्हणूनच श्री. यशवतराव मालशे यानी आपल्या भाषणात 'लष्करचे ज्येष्ठ अधिकारी व संरक्षण–उत्पादकांमध्ये उत्पादनाबाबत सतत चर्चा–विचार–विनिमय झाला पाहिजे व त्यातून आपल्या देशाच्या लष्कराच्या गरजाना अनुरूप अशी संरक्षण–उत्पादनांची निर्मिती झाली पाहिजे,' असा विचार मांडला. या अनुभवी सेनाधिकाऱ्यांचा हा आर्थिक विचार आपल्या शासनाने जरा गंभीरपणे लक्षात घ्यायला काय हरकत आहे?

–प्रतिनिधी

स्वप्नकळ्यांचा आक्रोश

# हुंडाविरोधी सप्ताह

न लगाओ बेटेकी कीमत
न खरीदो बेटीके लिए दुल्हा।
यह सौदेबाजी खत्म करो
दहेज लेना बंद करो ॥

पुण्यातील सुशिक्षित पेठांमधून ठिकठिकाणी अशी पोस्टर्स लागलेली होती. लोकाचे लक्ष सहज वेधून घेतले जाईल अशा ठिकाणी ही पोस्टर्स लावलेली होती. पुण्यातील 'लिओ क्लब ऑफ सारसबागचा'चा हा उपक्रम होता.

एकीकडे बहुधा रोज वर्तमानपत्रांमधून, हुंड्यासाठी छळल्या गेलेल्या विवाहित तरुणीच्या बातम्या, त्यांच्या आत्महत्यांच्या घटना वाचायला मिळतात. कित्येकदा ह्या तरुणीबाबत हळहळ वाटते, तिच्या सासरच्या माणसांबद्दल चीड निर्माण होते; पण इतपतच. हुंडा हा एक सामाजिक रोग आहे ही जाणीव फक्त अशा घटना समोर आल्यावरच तीव्र होते आणि काही काळाने ती बोथट बनते हे असेच चालणार हा दृष्टिकोनही तयार होत जातो.

आणि ह्या पार्श्वभूमीवर पुण्यासारख्या शहरात 'लिओ क्लब ऑफ सारसबाग'च्या वतीने दि. २४ ते ३० डिसेंबर असा 'हुंडाविरोधी सप्ताह' पाळला जातो आजपर्यंत हुंडाविरोधी कार्यक्रम अनेक होऊन गेले आहेत. अनेक युवकानी हुंडा न घेण्याच्या शपथा घेतल्या तर युवतींनी हुंडा न देण्याच्या! परतु प्रश्न कायमच!

२४ डिसेंबर हा ह्या हुंडाविरोधी सप्ताहाचा पहिला दिवस! त्या दिवशी 'हुंडा–एक ज्वलंत समस्या' या विषयावर गोखले हॉल' मध्ये एक परिसंवाद भरविण्यात आला होता. बॅ. सुनीती पुगलिया आणि दै तरुण भारतचे वि. ना. देवधर हे प्रमुख वक्ते होते; याशिवाय विविध कॉलेजांमधून बारा तरुण–तरुणींनी ह्या विषयावर आपले विचार माडले. प्रत्यक्षात ह्या तरुण वक्त्यांची संख्या ३० पर्यंत होती; परंतु वेळेअभावी संयोजकाना आटोपते घ्यावे लागले. एका जाहीर परिसंवादात हुंडाप्रथेविरुद्ध आपला आवाज उठविण्यासाठी पुढे येणाऱ्या ह्या तरुण–तरुणी हे एक नक्कीच आशास्थान आहे.

हुंडा हा जरी सामाजिक रोग असला, तरी शेवटी त्याचे मूळ व्यक्तीत आहे, सामाजिक मूल्यात आहे जोपर्यंत ही अनिष्ट मूल्ये नष्ट केली जाऊ शकत नाहीत, तोपर्यंत हा प्रश्न अस्तित्वात राहणार! ह्यासाठी ही अनिष्ट मूल्ये नष्ट करण्याच्या प्रयत्नात आपण तरुण–तरुणींनीच मोठ्या प्रमाणात सहभागी होणे आवश्यक आहे असा सूर सर्व तरुण वक्त्यांमध्ये होता.

'हुंड्यासारख्या अनिष्ट रूढीविरुद्ध झगडताना आपल्या सामाजिक मूल्याचाही पुनर्विचार होणे आवश्यक आहे असे सांगून तरुण भारतचे सपादक आपल्या भाषणात म्हणाले, 'आता आपल्या विवाहसंस्था व कुटुबसंस्थेचाही पुनर्विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुण–तरुणींनी पुढे सरसावणे गरजेचे आहे.'

'हा प्रश्न एकूणच स्त्री–मुक्तिचळवळीचा आहे असे प्रथमच सांगून बॅ. सुनीती पुगलिया म्हणाल्या की, 'हुंडापद्धतीविरुद्ध जरूर झगडावे परंतु अनेकदा हुंडा ही दोन कुटुबातील बाब समजली जाते. अशा प्रसगी त्या नववधूने आपल्या नवऱ्यास ठणकावून सागितले पाहिजे की 'तुला माझ्या वडिलानी हुंडा देऊन विकत घेतले आहे. तू विकला जाणारा प्राणी आहेस!' ह्यातून संघर्ष अटळ आहे, परंतु स्त्रियांनी आता त्याची तयारी ठेवली पाहिजे!'

लिओ क्लबतर्फे ह्या विषयावर एक प्रदर्शन टिळक स्मारक मदिरात भरवले. ह्या प्रदर्शनात एकूण ५० पोस्टर्स होती. स्वप्नकळ्याचा आक्रोश–हुंडा', 'कर्तृत्वहीन पुरुषासाठी हुंडा-


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... –प्रा. वा. ल. कुलकर्णी
(प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.
तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

हेच सर्वस्व ', ' हुंड्यापायी दाहीदिशा...' अशी समर्पक, आशयबद्ध पोस्टर्स लक्ष खेचून घेत होती. अभिनव कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अहोरात्र खपून ही पोस्टर्स तयार केली होती. प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मोहन धारिया यांनी ह्या प्रश्नावर अचूक बोट ठेवले.केवळ सप्ताह पाळून, शपथा घेऊन हा प्रश्न सुटणार नाही, तर त्यासाठी जशी प्रबोधनाची गरज आहे, तशीच शपथ पाळली जाण्याची गरज आहे असे सांगून अशी शपथ पाळली जाण्याकडे लक्ष ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले. तसेच हुंडाव्यवहार घडलेल्या लग्नात त्या ठिकाणी जाऊन दंडास काळचा फिती लावून शांततामय निदर्शने करण्याचा आपला हक्क आहे व तो बजावला पाहिजे अशीही तरुणांना हाक दिली.


ह्या सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी, म्हणजे ३० तारखेला हुंडा न घेण्याचा–देण्याचा शपथविधीकार्यक्रम आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. राम ताकवले ही शपथ तरुण–तरुणींना देणार आहेत. ह्यासाठी सुमारे ५० जणांनी आपली नावे दिली आहेत. ह्यात वैशिष्टच की मारवाडी–गुजराती समाजातील तरुणांनीही आपली नावे दिली आहेत. प्रत्यक्षात ' लिओ क्लब 'चे ३० सभासद असूनही त्यांच्यातील फक्त १२–१३ जणच शपथविधीत सहभागी होणार आहेत. ह्याचे कारण असे दिले गेले की इतरांची इच्छा आहे, पण आई–वडिलांच्या दडपणामुळे सहभागी होता येत नाही आणि ह्यात ही शपथ घेणाऱ्या तरुणांची नावे प्रसिद्ध केली जाणार म्हणजे तर शक्यच नाही 'वगैरे वगैरे.

असा हा एकूण सप्ताह. ह्यात अभिनवता नक्कीच आहे.परंतु ह्या प्रयत्नांच्या मर्यादाही स्पष्ट आहेत. मोहन धारिया यांनी उपस्थित केलेला प्रश्न खूपच समयसूचक आहे. अशा प्रसंगी शपथ घेतली जाते; परंतु ऐन लग्नाच्या प्रसंगी मात्र घरच्या दडपणामुळे, आईवडिलांच्या आग्रहामुळे वा अट्टाहासामुळे हुंडा घेतला जातो. तेव्हा मग अशा आधी घेतलेल्या शपथांचे प्रयोजन काय ?

लग्न हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील आनंदाचा क्षण; परंतु अशा अनिष्ट रूढींमुळे तो फक्त मुलाकडील मंडळींनाच आनंदाचा ठरतो. आपले जोडे झिजवून–स्थळ शोधून हुंड्यापायी कर्जात गळ्यापर्यंत बुडणाऱ्या मुलीच्या घरच्यांना तो केवळ व्यवहार उरतो, त्यात आनंदाचा अंशही नसतो आणि दुसरे असे की लग्न काय केवळ मुलींनाच आवश्यक आहेत ? मुलांनाही ती आवश्यक बाब नाही का ? मग केवळ आपला वरपक्ष आहे ह्या भूमिकेतून, हुंड्यासाठी अडवणूक करणे, लग्नात दोन्ही घरचा खर्च वधूपक्षाकडून करवून घेणे ह्या गोष्टी करीत राहणे हे पाशवी मनोवृत्तीचे लक्षण नाही काय ? आणि अनेकदा वरपिता हा वधुपिताही होत असतो, त्या प्रसंगी ' वधूपिता म्हणून होणाऱ्या कुचंबणेची जाणीव वरपिता असतानाच का ठेवली जात नाही ?'

तेव्हा हुंडाविरोधी आंदोलन हे जसे तरुण-तरुणींमध्ये मोठ्या प्रमाणात पसरले पाहिजे, तसेच ते त्यांच्या आई-वडिलांमध्येही पसरले पाहिजे आणि जेथे शक्य नाही तेथे तरुणांनी आईवडिलांच्या दडपणाविरुद्ध बंड उभारले पाहिजे, तरच हा प्रश्न मार्गी लागेल व सामाजिक मूल्यपरिवर्तनाच्या लढ्यास हातभार लागेल. अन्यथा हुंड्यासाठी छळल्या गेलेल्या, जाळल्या गेलेल्या निष्पाप तरुणींचे आक्रोश असेच पुढेही ऐकू येत राहतील !

–प्रवीण वाळिंबे

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**
**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी ( सचित्र )

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# राष्ट्रीय सुरक्षा कायदा

## बातमी दडवण्याचा प्रयत्न

वा. दा. रानडे

अटक करायची; पण वृत्तपत्रांना त्याची बातमी मिळू द्यावयाची नाही हे तंत्र एका शेतकरीनेत्याच्या अटकेबाबत तामिळनाडूत एम. जी. रामचंद्रन याच्या सरकारने कसे अवलंबले हे पाहण्यासारखे आहे. श्री. सी. नारायणस्वामी नायडू याच्या अटकेची बातमी चोवीस तास दडवून ठेवण्यात आली.

घटना २२ डिसेंबरची आहे. नायडू दिल्लीला जाण्यासाठी संध्याकाळी सात वाजता मद्रासच्या मीनांबकम विमानतळावर आले होते. दिल्लीच्या विमानात ते चढण्याचे बेतात असता पोलिसानी राष्ट्रीय सुरक्षा वटहुकुमाखाली त्याना स्थानबद्ध केले. वार्ताहराना याचा सुगावा लागला; पण त्याना अधिकृत बातमी हवी होती. बातमीला दुजोरा मिळविण्यासाठी वरिष्ठ पोलिस-अधिकाऱ्याना त्यानी फोन केले; पण 'बाहेर गेले आहेत' हे ठराविक उत्तर त्याना मिळाले. त्या दिवशी रात्री तर त्याना अधिकृत बातमी काहीच मिळाली नाही; पण बातमीचा पिच्छा त्यानी सोडला नाही. दुसऱ्या दिवशी दुपारी वार्ताहरानी डायरेक्टर जनरल ऑफ़ पोलीस टी. टी. पी. अब्दुल्ला याची भेट घेतली. त्यानी दिलेल्या उत्तराने तर ते चकितच झाले. 'नायडू आता दिल्लीला असतील, विमानतळाकडे तुम्ही चौकशी करा!' असे त्यानी सांगितले. वार्ताहराच्या प्रश्नाना त्यानी जी उत्तरे दिली त्यावरून आपल्याला हे खरी माहिती तर देत नाहीतच; पण मुद्दाम चुकीची माहिती देत आहेत असा वार्ताहराचा ग्रह झाला. 'नायडू कोठे आहेत आम्हाला माहीत नाही, ते सापडले तर आम्ही त्याना स्थानबद्ध करणार आहोत' असे त्यानी सांगितले. वास्तविक हे उत्तर देत असताना नायडूंना स्थानबद्ध केलेलेच होते.

दुपारी एक वाजताची ही घटना. त्याच वेळी काही वार्ताहराना सुगावा लागला की, नायडूना एग्मोर येथील कमिशनराच्या कचेरीच्या आवारातील एका खोलीत स्थानबद्ध केले आहे. वार्ताहरानी कमिशनर श्रीपाळ यांच्याकडे चौकशी केली ते कचेरीतच होते; पण वार्ताहरांना भेटले नाहीत किंवा फोनवरही त्यांच्याशी बोलले नाहीत. 'आम्हाला नायडूसंबंधी काही माहिती मिळाल्याशिवाय आम्ही येथून हलणार नाही!' असा आग्रह काही वार्ताहरानी धरला. सायंकाळी ६-१० वाजता कमिशनराच्या कचेरीच्या आवारातून काही वाहने बाहेर पडली. त्यापैकी एका मोटारीत नायडू व काही पोलीसअधिकारी होते.

कमिशनर श्रीपाळ संध्याकाळी सात वाजता आपल्या कचेरीत परत आले व नंतर तासभर आपल्या सहकाऱ्यांशी बोलत बसले. बैठक संपल्यावर त्यानी वार्ताहराना बोलावले व फक्त एक वाक्याची बातमी दिली, 'नायडू याना राष्ट्रीय सुरक्षा वटहुकमाखाली अटक करण्यात आली असून संध्याकाळी ६-४५ पासून मध्यवती तुरुंगात ठेवण्यात आले आहे.'

वास्तविक नायडू याना एक दिवस आधी स्थानबद्ध केले असता वार्ताहराना बातमी चोवीस तास उशीरा देण्यास कोणतेही समर्थनीय कारण नव्हते. नायडू कोठे आहेत आम्हाला माहीत नाही, ते दिल्लीला गेले असतील अशी बनवाबनवी करण्याचे तर काहीही कारण नव्हते. तामिळनाडूत राष्ट्रीय सुरक्षा वटहुकुमाखाली झालेली ही पहिली अटक होती; पण त्याची बातमी दडवून ठेवून आमच्या राज्यात या वटहुकुमाखाली एकालाही अटक झालेली नाही असे भासविण्याचा सरकारचा प्रयत्न होता काय? पण वार्ताहराच्या जागरूकतेमुळे तो प्रयत्न फसला आणि नायडू याना अटक करून तुरुंगात स्थानबद्ध केले आहे अशी बातमी देणे सरकारला भाग पडले. पोलिसानी ताब्यात घेणे व अटक करणे यात कायद्याचे श्लेष आहेत; पण सामान्य माणसाला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. त्याच्या दृष्टीने नायडूना पोलिसानी ताब्यात घेतल्यापासूनच त्याची अटक सुरू झाली. पोलिसाच्या दृष्टीने सुरुवातीला ती अटक नसेल; पण नायडूना त्यानी ताब्यात घेतले व कमिशनर-कचेरीच्या आवारातील एका खोलीत स्थानबद्ध केले हे तर खरे होते ना? मग तशी बातमी त्यानी वार्ताहराना का देऊ नये? आणि चुकीची बातमी देऊन त्याची दिशाभूल का करावी? वार्ताहरापासून खरी बातमी दडविणे म्हणजे बातमी मिळविण्याच्या त्याच्या हक्कालाच बाध आणणे होय. वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे. तामिळनाडूच्या वार्ताहरानी त्यासाठी झगडायला हवे आणि माहिती न देण्यात पोलिसअधिकाऱ्यानी चूक केली, त्याची पुनरावृत्ती होणार नाही असे आश्वासन त्यानी सरकारकडून घ्यायला हवे.

राष्ट्रीय सुरक्षा वटहुकुमाला कायद्याचे स्वरूप देणारे बिल संसदेच्या नुकत्याच संपलेल्या अधिवेशनात पास झाले. विरोधी पक्षानी त्याला जोरदार विरोध केला व सभात्याग करून नागरिकस्वातंत्र्याच्या या गळचेपीबद्दल आपला निषेध नोंदविला. राष्ट्रीय सुरक्षा कायदा म्हणजे विरोधी नेत्यानी म्हटल्याप्रमाणे मिसाचाच (अंतर्गत सुरक्षा कायदा) नवा अवतार आहे. राजकीय नेत्याविरुद्ध या कायद्याचा वापर केला जाणार नाही असे आश्वासन केंद्रीय गृहमंत्री झैलसिंग यांनी कितीही दिले असले तरी मिसाचा अनुभव लोक विसरलेले नाहीत. त्या कायद्याच्या बाबतीतही असेच आश्वासन देण्यात आले होते; पण सरकारच्या विरोधकांना स्थानबद्ध करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात आला. तेव्हा या कायद्याबद्दलही तशीच भीती लोकाना वाटणे स्वाभाविक आहे. समाजकंटक, काळाबाजार, साठेबाजी करणारे व्यापारी याच्याविरुद्ध मुख्यतः या कायद्याचा वापर केला जाईल असे मंत्री म्हणतात; पण त्यासाठी

त्याचा परिणामकारक वापर केला गेला असल्याचे दिसत नाही. वास्तविक या कायद्याची आवश्यकता नाही. समाजकंटक, काळा बाजारवाले, साठेबाज याच्याविरुद्ध उपाय योजण्यास सध्याचे कायदे पुरेसे आहेत. खरी आवश्यकता आहे ती त्याचाच परिणामकारक वापर करण्याची. राष्ट्रीय सुरक्षा कायदा असे या कायद्याला म्हटले असले तरी सरकारला काळजी आहे ती राष्ट्राच्या सुरक्षिततेपेक्षा विरोधकापासून सरकारचे रक्षण करण्याची. विरोधक लोकशाही मार्गानेच झगडत आहेत. संसदेत सत्तारूढ पक्षाचे मोठे बहुमत आहे; पण गेल्या वर्षभरात लोकाचे प्रश्न सोडविण्याच्यादृष्टीने सरकार विशेष काही करू शकलेले नाही. आपल्या या अपयशाची कबुली देण्याचा प्रामाणिकपणा सरकारपाशी नाही. विरोधक आमच्या विरुद्ध कट करीत आहेत, आमच्या मार्गात अडथळे आणीत आहेत त्यामुळे आम्हाला विशेष काही करता आले नाही असे सरकारचे फसवे समर्थन आहे; पण या फसव्या समर्थनाने जनता फसणार नाही. इंदिरा गांधीच्या हाती आपण सत्ता सोपविली, पण गेल्या वर्षभरात आपली परिस्थिती सुधारण्यात त्याना काहीही यश आलेले नाही, याची जाणीव जनतेला झाली आहे. तिचा भ्रमनिरास होऊ लागला आहे.

राष्ट्रीय सुरक्षा वटहुकमाला कायद्याचे स्वरूप येण्यापूर्वीच त्या वटहुकमाचा वापर इंदिरा कॉंग्रेसची सत्ता असलेल्या काही राज्य सरकारांनी केलेला आहे सर्वांत जास्त धरपकड उत्तर प्रदेशात झाली. केंद्रीय गृहखात्याशी संलग्न असलेल्या खासदारांच्या सल्लागार समितीस खात्यातर्फे जी माहिती पुरविण्यात आली त्यावरून असे दिसते की, राष्ट्रीय सुरक्षा वटहुकमाखाली उत्तर प्रदेशात ११२ जणांना स्थानबद्ध करण्याचा हुकूम राज्यसरकारने दिला होता. त्यापैकी ७२ अजून स्थानबद्ध आहेत. ३४ जणाच्या स्थानबद्धतेचा सल्लागार मंडळे अजून विचार करीत आहेत. पकडलेल्या लोकामध्ये राजकीय कार्यकर्ते किती याची माहिती उत्तर प्रदेश सरकारने केंद्राला कळविलेली नाही. उत्तर प्रदेशच्या खालोखाल मध्यप्रदेशात ७४ व्यक्तीना स्थानबद्ध करण्यात आले. त्यापैकी ५० अजून स्थानबद्ध आहेत. दिल्ली केंद्रशासित प्रदेशात ४२ जणाना या वटहुकमाखाली पकडले. त्यापैकी ३७ अजून स्थानबद्ध आहेत मणिपूरमध्ये २० जणाना अटक केली त्यापैकी १८ अजून स्थानबद्ध आहेत. बिहारमध्ये २५ जणांना पकडले. त्यापैकी ७ अजून स्थानबद्ध आहेत. १८ जणाच्या प्रकरणाची सल्लागार मंडळ अजून छाननी करीत आहे. लोकांना स्थानबद्ध करण्याचा हुकूम सरकारने काढला, पण ते हाती लागले नाहीत. आसाममध्ये ११ जणाना पकडले त्यापैकी ७ अजून स्थानबद्ध आहेत. इतर काही राज्यात हे आकडे पुढीलप्रमाणे आहेत. गुजरात ३–१, कर्नाटक १६–११, महाराष्ट्र ३–३ मेघालय ३–०.

राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा विरोधी पक्षाचे राजकीय कार्यकर्त्यांना अटक करण्यासाठी वापर केला जात नाही याबद्दल सर्व लोकशाहीवाद्यानी जागरूक असायला हवे. □


“Start where You are,
With what You have.
Make Something of it
Never be satisfied.”

–G. W. Carver

गेल्या वर्षीच्या माणूस दिवाळी अंकात आलेली–गाजलेली चरित्र कहाणी

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

लवकरच पुस्तकरूपात प्रसिद्ध होत आहे.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पद्मावती प्रतिष्ठान व्याख्यानमाला :

# संगीताचा रंग, परंपरा व लोकप्रियता

निखिल गजेंद्रगडकर

'पद्मावती प्रतिष्ठान आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी' याच्या संयुक्त विद्यमाने गेली नऊ वर्षे पुण्यात विविध विषयांवर व्याख्यानमाला होत आहे. या वर्षी व्याख्यानमालेत 'संगीत' हा विषय चर्चिण्यात आला. वक्ते होते मुबई विद्यापीठातील संगीतविभागाचे प्रमुख आणि ख्यातनाम सगीतसमीक्षक डॉ. अशोक रानडे. पहिल्या दिवसाचा–दि. २६ डिसेंबरचा विषय होता, 'महाराष्ट्रातील सगीताचा पूर्वरंग.'

'महाराष्ट्रातील संगीत हे समाजाच्या जवळजवळ प्रत्येक स्तरात या ना त्या स्वरूपात रुजलेले आहे हिंदुस्थानी सगीताचे बरेचसे प्रकार महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे फोफावले,तसेच संगीताचा औपपत्तिक भागही चागल्या प्रकारे जोपासला गेला. तेव्हा महाराष्ट्रास संगीतावद्दल 'प्रेम' आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये हे प्रथमतःच स्पष्ट करून डॉ. अशोक रानडे म्हणाले, 'संगीताचा विचार महाराष्ट्रात जास्त झाला हे जरी खरे असले तरी महाराष्ट्रातील सगीताचा पूर्वरंग तपासणे किंवा शोधणे हे बरेच अवघड कार्य आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे कोणताही ठोक पुरावा उपलब्ध नाही. हा ठोक पुरावा म्हणजे ध्वनिरूप पुरावा. तो तर नाहीच; परंतु सगीत ही प्रयोगसिद्ध कला ध्वनिउत्पादन व ध्वनिग्रहणावर अवलंबून असल्याने आपल्याकडे त्याचे लेखनही फार झालेले नाही. कारण भारतामध्ये शिक्षणपद्धतीत मौखिक परंपरेचे पारडे खूपच जड!

'या अडचणीव्यतिरिक्त दुसरी मोठी अडचण म्हणजे कालखंड पाडणे. शातवाहन, चालुक्य, यादव मुसलमानी व ब्रिटिश आणि स्वातंत्र्योत्तर हे कालखंड सर्वसामान्य 'इतिहास' अभ्यासण्यास योग्य असतील; पण संगीताचा इतिहास त्यावरून कळणे फारच अवघड. संगीतिक कल्पना व सकल्पना व त्यामुळे घडलेले वदल यांचा मागोवा घेणे ही एक अत्यंत अवघड गोष्ट आहे.

'महाराष्ट्रापुरते बघायचे झाले तर यादव पूर्वकालामध्ये 'गाथा सप्तशती' या ग्रंथात बरेच सगीतविषयक उल्लेख आढळतात. गाथाचा जन्मच गीतप्रवृत्तीतून व समाजाच्या संगीतप्रवणतेतून झाला आहे. वाद्यामधले बदल, तसेच प्रगत लयवाद्ये व तालवाद्ये याचे उल्लेखही या गाथेमध्ये आढळतात.

'दुसरा एक पुरावा म्हणजे अजंठा व वेरूळ येथील चित्रे व शिल्पे यातील संगीतविश्वद्याचा बनण्याचा काळ काही शतके पसरलेला आहे. तसेच कलाकारावर धार्मिक बंधने असल्यामुळे संगीताचे तत्कालीन चित्र पूर्णपणे उभे रहात नाही. तरीही संगीतिक प्रसंगांची बहुविधता ही लक्षणीय आहे; परंतु त्या चित्रामध्ये किंवा शिल्पामध्ये 'मैफल' हा प्रकार आढळत नाही. त्यावरून संगीताला सार्वत्रिक प्रतिष्ठा मिळालेली नसावी असा निष्कर्ष निघतो.

'यादवकालामधे प्रादेशिक भेद स्पष्ट होऊ लागले. सोमेश्वरविरचित 'मानसोल्लास' हा ग्रंथ याच सुमाराचा. ज्ञानकोश किंवा ज्ञानसंग्रह अशा ग्रंथातही मूळ राग त्याचे प्रादेशिक स्वरूप किंवा भेद, अनेक संगीतप्रकाराची चर्चा, लोकसगीतावद्दलचे विवेचन, वाद्याचे वैशिष्टघपूर्ण वर्गीकरण, तालांचे विवेचन आढळते. संगीत गुतागुतीचे होऊ लागल्याचा हा पुरावा आहे

'यानंतर आलेले 'सगीतरत्नाकर' व 'सगीतसुधाकर' हे ग्रंथ तर पूर्णपणे सगीतविषयकच. या काळातच संगीतपद्धतीचे 'हिंदुस्तानी' व 'कर्नाटक' अशा तऱ्हेचे ध्रुवीकरण होऊ लागले व महाराष्ट्रीय संगीत जास्त उत्तरेकडे झुकू लागले. वारकरी संप्रदायाचा उदय हाही महाराष्ट्रीय सगीतक्षेत्राच्या बाबतीत महत्त्वाचा आहे.

'मराठा(पेशवेकाल)कालखंडात शास्त्रोक्त व अर्धशास्त्रोक्त सगीताची भरभराट झाली. सर्व सगीतप्रकारांचा महाराष्ट्रीय कलावंताकडून अभ्यास झाला. पोवाडा, लावणी व कीर्तन हे प्रकार तर खूपच फोफावले. पेशवेकाळाबरोबरच महाराष्ट्रीय संगीताचा 'पूर्वरंग' संपतो.'

¤

दुसऱ्या दिवशीचा (२७ डिसेंबर) विषय होता 'संगीताची मौखिक परंपरा' या सदर्भात बोलताना डॉ. रानडे म्हणाले,

'मौखिक परंपरा भारतामध्येच खूप जुनी व जवळजवळ सर्वव्यापक होती व जुने ते सोने म्हणून त्याचा विचार करावयाचा अशा उद्देशाने हा विषय निवडलेला नव्हता. 'संपर्क' किंवा 'विचारसंक्रमण' (communication) या दृष्टीने ती जास्त योग्य आहे तसेच भारतातील आजची 'साक्षरता' विचारात घेता आजही ही पद्धत सयुक्तिक ठरते.

'भारतामध्ये प्राचीन काळी अध्यात्मापासून ते संगीतापर्यंत सर्वत्र मौखिक परंपराच प्रचलित होती. वाङ्मय हेही 'वाणीचा आविष्कार' अशाच अर्थाने घेतले जाई. शब्द देणे, वचन देणे हे वाक्प्रचार किंवा आयुर्वेदातील मुनीची नावे वाग्भट वा सुश्रुत ही पण सूचक आहेत.

'या मौखिक परपरेत बोलण्याइतकेच ऐकणे–लक्ष देऊन ऐकणे म्हणजेच श्रवण करणे पण महत्त्वाची क्रिया ठरते. त्यामुळेच श्रोता, त्याचा दर्जा व श्रोत्याचा प्रतिसाद (Feedback) हेही खूपच महत्त्वाचे होते. सभेची रचना कशी असावी, श्रोत्यानी कसे सभेत आचरण करावे याविषयीचे संकेत स्पष्ट होते.

'मौखिक परंपरा वरचढ होती याचा अर्थ लेखन नव्हतेच असे नव्हे. प्राचीन विद्यापीठामधे प्रचड ग्रंथसंभार होतेही. या परपरेचे लिखितावरोबर शातिपूर्ण सहअस्तित्व होते. लिहिलेले वाचले म्हणजे फक्त'माहीत', होते, पण तेच गुरूने सागितले की 'समजते' त्याचे 'ज्ञान' बनते म्हणूनच या परंपरेत 'गुरू' हा खूपच महत्त्वाचा. गुरु-शिष्य याचा व्यवहार व संबंध हा निरपेक्ष व न मोजता येणारा असा आहे. शिक्षक-विद्यार्थी येथे व्यवहार जास्त असतो.

'मौखिक परंपरेत सूत्रानाही खूप महत्त्व होते. सूत्रे लहान व नादमय असल्याने लक्षात ठेवण्यास सोपी असतात. 'स्मरणशक्ती' चा खूपच विचार या मौखिक परंपरेत झालेला दिसतो.

'मौखिक परंपरेचा विशेष म्हणजे, संपूर्ण अनुभव एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविणे. 'जे जुने आहे ते पुढे न्यायचेच, त्यात नवे ते समाविष्ट करून घ्यायचे व त्यांची सगतीही लावायची' हे परंपरेचे लक्षण हिंदुस्तानी संगीतात पूर्णपणे आढळते तसेच परपरावाहकाची बहुविधता ( घराणी ) ही आढळते.

'मौखिक परंपरेत आढळणारा श्रवणावरचा भर येथेही स्पष्ट दृग्गोचर होतो. सतत श्रवणातूनही काही तरी मिळते, म्हणून सतत 'ऐकणे' यावर सर्व संगीतगुरूंचा आजही आग्रह असतो. श्रोतासुद्धा 'तयार' हवा या भूमिकेतूनच. १८१६ साली 'आज आम्हाला तानसेन नकोत तर कानसेन हवेत' ही म्हण जन्मली. जी आज चिरंतन (आणि भरपूर गुळगुळीतसुद्धा !) होऊन राहिली आहे.'

या व्याख्यानात बोलता बोलता डॉ. रानडे यांनी या क्षेत्रात प्रचलित असलेल्या अनेक म्हणींच्या गमती सागितल्या. स्मरणात ठेवण्यासाठी रागाच्या लक्षणगीतांऐवजी दोहे, आर्या वगैरे वापरल्याने त्या त्या रागाचे 'भाव' किंवा मूडस् अधिक स्पष्ट होतात हे ओळखून अनेकानी दोहे व आर्या याचा वापर केल्याचे त्यानी स्पष्ट केले.

मौखिकपरंपरेत 'नादा'ला प्रतिष्ठा आहेच; पण संगीतात त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे नादाचे सूक्ष्मपणे वर्गीकरणही केले आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या कारणांसाठी गाणाऱ्याचेही वैतालिक, भाट, चारण, बदीजन इ. वर्गीकरण आहे.

'नाट्यकलेत'ही या परंपरेचा वापर कसा करता येईल याविषयी डॉ. रानडे यानी काही सूचना केल्या आहेत. अभिनेत्यांचे बोलणे मौखिकपरंपरेच्या अगाने झाल्यास भाषणातील स्पष्टता वाढेल व आंगिक अभिनय यात सुसंवादित्व येईल. संवादशैली खऱ्या अर्थाने बोलकी होईल. लेखनप्रयोगानुसारी होईल इत्यादी.

दुसऱ्या दिवशीच्या डॉ. रानडे याच्या या व्याख्यानानतर प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी डॉ. रानडे याची पहिल्या व्याख्यानातील काही विधाने घेऊन 'पुणेरी स्टाइल'ने डॉ. रानडे यांची खूपच 'उडविली'. , महाराष्ट्रीय म्हणजे काय? महाराष्ट्राच्या नक्की भौगोलिक मर्यादा कोणत्या ? संस्कृत भाषेविषयी डॉ. रानडे यांचे अज्ञान, 'मानसोल्लास'कार सोमेश्वर हा खरोखरचा महाराष्ट्रिय होता का ? इ. अनेक प्रश्न त्यांनी अत्यंत 'स्पष्ट'-तेने माडले. असो.

तिसऱ्या दिवशीचे व्याख्यान शेवटचे होते आणि त्याचा विषयही श्रोत्याना जरा जवळचा वाटणारा होता. 'जनताप्रिय सगीत' हा विषय ध्वनिमुद्रित उदाहरणासह डॉ. रानडे स्पष्ट करून सागणार होते म्हणून जरा उत्सुकताही होती, परंतु शेवटी वेळेअभावी ती उदाहरणे वाजवण्यात आलीच नाहीत. असो. डॉ. रानडे म्हणाले,

'जे संगीत समाजाचे (masses) आहे, समाजाच्या एका फार मोठ्या भागामध्ये जे प्रिय (popular) आहे ते संगीत जनताप्रिय संगीत होय. प्रत्येक समाज हा सर्वसाधारणपणे बहुविध असतो. अनेक उपसंस्कृत्या एका संस्कृतीमध्ये नांदत असतात आणि त्याच्यामध्ये सतत अभिसरणही चालू असते व यातून जनताप्रिय संगीत जन्मते.

'लोकसंख्येत होणारी अचानक वाढ उदा. शहराकडे येणारा लोकांचा लोंढा किंवा लोकसंख्येचे पुनर्वितरण, नागरीकरण व मोठा शहरी मध्यमवर्ग याचा प्रभाव हाही जनताप्रिय संगीताच्या उगमास कारण ठरू शकतो आणि हे सर्व घटक सतत अस्तित्वात असल्याने प्रत्येक काळाचे जनताप्रिय संगीतही नेहमीच अस्तित्वात असते, त्या दृष्टीने ते 'सार्वकालिक' असते.

'लोकांना त्याच्या फुरसतीच्या वेळेत विरंगुळा पुरवणे, त्याचे मनोरंजन करणे या प्रमुख हेतूतून जनताप्रिय संगीताचा जन्म होतो. लोकाची पसती लक्षात ठेवून हे संगीत बनते. जनतासंपर्क माध्यमाचाही (mass medias) याच्यावर खूपच परिणाम झालेला दिसून येतो.

'जनताप्रिय संगीत हा एक प्रथमपासूनचा व्यवसाय आहे समाजाच्या तत्कालीन सांगितिक गरजा भागवण्याचे काम हा व्यवसाय करीत आला आहे आणि म्हणूनच मागणी तसा पुरवठा करताना या सागितिक गरजाचा बारकाईने विचार करणे हे या प्रकारच्या संगीतात महत्त्वाचे ठरते.

'जनताप्रिय संगीत हे कार्यबद्ध आहे. मनोरंजन हे महत्त्वाचे कार्य या प्रकारच्या सगीताला बजावायचे असते. म्हणून हे सगीत प्रचलित गोष्टीची (Fashion) कधीच टिंगल उडवत नाही, उलट प्रत्येक वेळेस नवनव्या फॅशनचा स्वीकार करून पुढे जाते. शिवाय या फॅशन्सही समाजाच्या उपवर्गानुसार बदलत जातात. त्या सर्वांचा विचार करून प्रत्येक वर्गाचे समाधान होईल अशा प्रकारचे संगीत बनते आणि म्हणूनच आरत्या, भजने, गजल ते वाद्यसंगीत अशा या संगीताच्या असंख्य तऱ्हा बाजारात आढळतात.'

'जनताप्रिय संगीत हा एक व्यवसाय असल्याने मागणी, पुरवठा, 'माला'-मधील वैविध्य, रेकॉर्डसची प्रचंड जाहिरात, बाजारात रेकॉर्डसचे वितरण, एवढेच नव्हे तर रेकॉर्डसचे कव्हरही लक्षपूर्वक बनवले जाते. हा 'धंदा' हाही या सगीताचा एक अपरिहार्य भाग आहेच.

'मात्र व्यवसाय आहे म्हणून जनताप्रिय संगीत वाईट किंवा निकृष्ट दर्जाचे, ते बनवणारे संगीतकार खालच्या दर्जाचे ही समजूत मात्र चूक आहे. समकालीन जे जे काही चागले आहे ते ते प्रत्येक वेळेस जनताप्रिय सगीताने पटकन उचलले आहे. उदाहरणार्थ, तीसेक वर्षांपूर्वी गायकाचा खर्जातील आवाज, कमी वाद्यमेळ ही चित्रपटसंगीताची वैशिष्ट्ये होती. नंतर गायकाचे उंच पट्टीतले आवाज, भरपूर वाद्यवृंद अशी स्थिती आली, तर आज पूर्णपणे पाश्चात्य धुना वापरल्या जात आहेत. ध्वनिमुद्रणातील प्रगत तंत्रे या जनताप्रिय संगीताने वेळोवेळी अंगीकारल्यामुळे सर्वसामान्य श्रोत्याचे 'कान' सगीताच्या बाबतीत 'तयार' करण्याचे श्रेय या संगीतप्रकाराकडेच जाते. असे असूनही शास्त्रोक्त संगीताच्या मानाने आणि 'आजकाल'प्रतिष्ठा मिळालेल्या लोकसगीतापुढे हा संगीतप्रकार उगीचच उपेक्षित राहिला हेही सत्य आहे.

'जनताप्रिय सगीत हे नेहमीच आश्रयदात्या वर्गाच्या मर्जीप्रमाणे बदलत आले आहे. महाराष्ट्रातले आद्य जनताप्रिय सगीत जे लावणी तेही नागरी पांढरपेशा वर्ग, पेशवे किंवा सरदार, धनिकवर्ग यांच्या प्रभावाप्रमाणे बदलत गेले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस 'मेळा संगीत' उगम पावले. मनोरंजन प्रमुख व काही तरी सागणे हा दुय्यम हेतू यामध्ये होते. मग भावगीते व तत्सम

प्रकार आणि नंतर सर्वांत प्रभावशाली म्हणजे चित्रपटसंगीत. जनताप्रिय संगीताला मात्र नेहमीच कलासंगीताचे किंवा शास्त्रीय संगीताचे आकर्षण वाटत असल्याचे आढळते.

आकाशवाणी वगैरे माध्यमाप्रमाणेच, जाहिरातीचे संगीत किंवा 'जिंगल्स' ही जनताप्रिय संगीतामधे डॉ. रानडे यानी वर्गीकृत केले.

डॉ. अशोक रानडे याचा अभ्यास खूपच दाडगा आहे. संगीतावर बोलण्यासारखे त्यांच्याकडे खूप आहे. (ते ते बोलतातही, मग मंगरूळकरासारखे श्रोते त्यांना पेचात पकडतात, पण आपली करमणूक होते. असो.) त्यामुळे त्याची व्याख्याने छान होतात, पण वेळ कमीच पडतो. असा काहीसा प्रकार घडतो.

संगीतावर तीन उत्तम व्याख्याने सादर केल्याबद्दल आयोजकाचे आणि डॉ. अशोक रानडे याचे सर्व श्रोत्यांतर्फे आभार मानणे आवश्यकच आहे. □

# स्पर्धापरीक्षांचा अभ्यासक्रम

पुढील महिन्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोग डेप्युटी कलेक्टर इत्यादी राज्यपातळीवरील दुसऱ्या वर्गांच्या जागांसाठी स्पर्धापरीक्षा घेत आहे. सरकारी नोकरीत व थोड्या प्रतिष्ठेच्या जागेवर नोकरी करण्याचे 'करिअर' बनवू पाहणाऱ्या युवकांना ह्या परीक्षा आकर्षित करतात. हजारोच्या संख्येने विद्यार्थी परीक्षेस बसतात. यंदा जवळजवळ १५,००० विद्यार्थी ह्या परीक्षेस बसत आहेत. अन्य औपचारिक परीक्षाप्रमाणेच या परीक्षेतही एक प्रकारचा नियमितपणा आलेला आहे. राष्ट्रीय पातळीवर उच्च अधिकाराच्या जागासाठी केंद्रीय सेवा आयोग आय ए. एस. वगैरे जागासाठी मे व ऑक्टोबरमध्ये स्पर्धापरीक्षा घेते. महाराष्ट्र सेवा आयोग आणि केंद्रीय सेवा आयोग याच्या स्पर्धापरीक्षाचा अभ्यासक्रम वरवर पाहिले तरी असे जाणवते की, हे अभ्यासक्रम पूर्णपणे परस्परविरोधी आहेत.

राज्यपातळीवर घेण्यात येणाऱ्या स्पर्धापरीक्षाना प्रत्येक विद्यार्थ्यास एकूण १०० गुणाचे सहा पेपर ठेवण्यात आलेले आहेत. त्यापैकी तीन पेपर सक्तीचे आहेत. ते म्हणजे इग्रजीचा एक व सामान्य ज्ञानाचे दोन पेपर्स. ऐच्छिक तीन विषयाची निवड विद्यार्थी तीन गटातून करू शकतो. एका गटातून जास्तीत जास्त दोनच विषय घेता येतात. पहिला गट भाषेचा, दुसरा सामाजिक शास्त्र (वाणिज्य शास्त्र धरून) आणि तिसरा गट सर्व भौतिक शास्त्रविषयांचा आहे. प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम थोडक्यात देणारी एक पुरवणी छापील अर्जासोबत देण्यात येते. त्यातील माहिती अत्यंत त्रोटक असते. तीत नेटकेपणा दिसत नाही. परीक्षार्थी गोंधळूनच जातो. ह्या माहितीच्या आधारे आपले विषय निश्चित करण्याच्या बाबतीत प्रश्नपत्रिकांच्या आधारे अभ्यासक्रमाचा अंदाज घ्यावा म्हटल्यास तेही शक्य होताना दिसत नाही. कारण एक तर पूर्वीच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होत नाहीत असे दिसून येते आणि दुसरे म्हणजे ह्या प्रश्नपत्रिकामध्येही एकसंधपणा, काही ठराव धोरण दिसत नाही. तालुका व ग्रामीण पातळीवरील परीक्षार्थींची तर ह्यामुळे होणारी कुचंबणा कल्पना न करता येण्यासारखीच आहे. सक्तीच्या सामान्यज्ञान पेपराच्या बाबतीत तर परिस्थिती अत्यंत वाईट आहे. अभ्यासक्रमात शक्य तेवढा अपुरेपणा ठेवून प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेमध्ये कोणत्याही विषयावर प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. अधारातील चाचपडणे अशीच साधारण ह्या विषयाची तयारी परीक्षार्थी करतो. इग्रजीच्या पेपरमधील व्याकरणाचा समावेश हेही एक असेच कोडे आहे. त्याऐवजी अहवाल तयार करणे, वस्तुस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा तयार करणे यावर भर दिल्यास योग्य होणार नाही का? कारण अखेरत: शासनातील अधिकाऱ्यास अभिव्यक्तीचे कौशल्य हवे. ते आहे का नाही हेच अशा प्रश्नाद्वारे जोखायचे असते. अभ्यासक्रमाच्या सुरुवातीला त्यामागील हेतू व उद्दिष्ट स्पष्ट करता येणार नाही का? शिवाय मराठीमधून थोडक्यात गोषवारा देण्यात काय अडचणी आहेत हे समजत नाही. अपुरा व अध्याहृत अभ्यासक्रम तयार करून परीक्षार्थींच्या मनात गोंधळ होण्यापलीकडे कोणताही उद्देश साध्य होताना दिसत नाही.

ऐच्छिक विषयांचे अभ्यासक्रम विद्यापीठाच्या औपचारिक अभ्यासक्रमाहून निराळे नाहीत. काही विषयांच्या बाबतीत तर सुईच्या टोकावर हत्ती चढविण्याचा प्रयत्न करणारा अभ्यासक्रम तयार केल्याचे दिसते. उदाहरण म्हणून भारतीय इतिहास, अर्थशास्त्र, मराठी इत्यादी विषयाचे अभ्यासक्रम पाहण्यासारखे आहेत.

हे अभ्यासक्रम तयार करताना ज्या जागा भरण्यासाठी परीक्षा घेतली जात आहे त्या जागांच्या गरजा व कामाचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे असे वाटते. आता घेण्यात येणाऱ्या परीक्षा ज्या जागासाठी आहेत त्या सर्व जागा जिल्हा वा तालुका पातळीवरील आहेत. हे अधिकारी नियमित कार्यालयीन कामकाजाखेरीज विकासाची व जनसंपर्काची कामे पाहतात. त्यातील काही अधिकाऱ्याना कायदा—सुव्यवस्था, जमीनमहसूल,जमिनीचे तंटे, सीलिंग कायद्याची अमलबजावणी इत्यादी कामेच करावी लागणार आहेत. गटविकासअधिकारी विकासाच्या कार्याचा मुख्य घटक आहे, तर दारूबंदी विभागातील अधिकारी अगदीच वेगळ्या प्रकारचे कार्य करणार आहे. म्हणजे ह्या सर्व अधिकाऱ्याना समाजात राहून काम करावे लागणार आहे.

अधिकाऱ्याच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता स्पर्धापरीक्षेमध्ये मानसशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक सांस्कृतिक इतिहास,ग्रामीण विकास, आर्थिक नियोजन, देशातील मूलभूत कायद्याचे ज्ञान, जमीनमहसूलपद्धती व त्यातील नव्या दिशा,शेतीव्यवस्था, नव्या सामाजिक समस्या इत्यादी विषय अंतर्भूत असलेले अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे. तसेच मराठीच्या अभ्यासक्रमातही वाङ्मयेतिहास व वाङ्मयीन समालोचन इत्यादीऐवजी उपयोजित मराठीचा (applied Marathi) अभ्यासक्रम असायला हवा.

भावी काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोग जेव्हा केव्हा ही स्पर्धापरीक्षा आयोजित करेल तेव्हा वरील सूचनांचा जरूर विचार करेल अशी आशा आहे.

प्रा. म. आ. कुलकर्णी
प्रा. अ. गो. गोसावी
मॉडर्न महाविद्यालय, पुणे– ५.

# योद्धा शेतकरी

**लेखांक पाचवा**

लेखन आणि संकलन

**विजय परुळकर**

काही शब्दच इतके जबरदस्त असतात, इतके ताकदवान असतात, त्याच्या पोटात इतका इतिहास सामावलेला असतो की, केवळ त्याचा उच्चार करताच एका विशिष्ट काळातील घटना मन पटलावर झरझर चित्रित होतात 'बेचाळीस' हा शब्द घ्या. एक साधा सख्यावाचक शब्द; पण एका विशिष्ट सदर्भात तो उच्चारला तर लगेच 'क्रांती', 'लढा' अशा शब्दाचे सादपडसाद त्याच्या पाठोपाठ उमटतात. दाडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह, क्विट् इंडिया, महात्मा गांधी... पाहिलेलं न पाहिलेलं, ऐकलेलं–वाचलेलं सर्व सर्व एकदम आठवू लागतं.

गनीम किंवा गनिमी हा असाच एक इतिहासगर्भ शब्द आहे. ह्या शब्दाचा नुसता उच्चार करताच त्याच्या पाठोपाठ 'कावा', 'युद्ध' हे शब्द निनादू लागतात. मनात शिवरायाची प्रतिमा उमटते ! अफझलखान, औरंगजेब, नरवीर तानाजी, शूर मावळे, पावनखिंड असे अनेक इतर शब्द मनात आपोआप घुमू लागतात !

शरद जोशीनी नासिकच्या शेतकरी आंदोलकाना अठ्ठेचाळीस तासाची सुट्टी जाहीर करताना जेव्हा सांगितलं की, 'इथून पुढं गनिमी तंत्राचा वापर केला जाईल !' तेव्हा शासनाच्या अधिकाऱ्यांच्या मनात 'कावा' किंवा 'युद्ध' हे दोन शब्द आपोआपच उमटले असल्यास नवल नाही. अनेक वृत्तपत्राच्या वार्ताहराचा आणि संपादकांचाही असा समज झाला ह्याबद्दलही विशेष आश्चर्य वाटून घेण्याचं कारण नाही. 'गनिमी' हा शब्दच तसा जबरदस्त आणि उच्चारण्याच्या क्रियेपासूनच दिशाभूल करणारा आहे.

अठ्ठेचाळीस तासांची विश्रांती संपल्यानंतर शरद जोशी गनिमी युद्ध पुकारणार– सॅबोटाज, पूल उडविणे, गाड्या पाडणे, सुरुंग पेरणे, पोलीसपथकावर रात्री अचानक हल्ले असं काही तरी व्हिएतनामप्रमाणे सनसनाटी सुरू होणार अशी अनेकाची अपेक्षा, त्यामुळेच शरद जोशीनी 'गनिमी सत्याग्रह' असा शब्दप्रयोग केल्याचं अनेकांना चटकन उमजलं नसावं.

विश्राती संपल्यानंतर नेमकं काय घडणार ह्याबद्दल सहाजिकच अनेकाच्या मनात अनैसर्गिक कुतूहल ! मग वृत्तपत्राचे संपादक तरी ह्याला अपवाद कसे ठरणार ? 'आता घातपात सुरू' अशा आशयाचे अग्रलेख त्यानी न लिहिले तरच नवल !

ह्याच सुमारास एक्स-मिनिस्टर श्रीयुत जॉर्ज फर्नांडिस नासिकात आले. येताच त्यानी एक जाहीर सभा घेतली अणि 'मीदेखील शेतकरीच आहे' असे नासिककराना पटवून देण्याचा प्रयत्न केला. सभेला बरीच गर्दी. नासिकात जमावबंदीचे कलम असल्याचे अर्थातच जॉर्ज याना माहीत नव्हते किंवा त्याना सभेच्या अगोदर कुणी तसे सांगितलेदेखील नाही. जाहीर सभेत जॉर्जनी जाहीर केले की उद्या 'कलेक्टर काम रोको' असा मोर्चा नासिकात काढण्यात येईल ! मोर्चा सुरू होताच खेरवाडी गोळीबारात हुतात्मा झालेल्यांसाठी निधी गोळा करण्यात येईल ! ...वगैरे वगैरे...

'जॉर्ज आले– जॉर्ज बोलले– जॉर्ज आता मोर्चा काढणार !' अर्थातच नाशकात जमलेले वार्ताहर भारावून गेले. जॉर्ज–एक महान चळवळे, अर्थातच सर्व चळवळ्याचे लाडके, झंझावती व्यक्तिमत्त्व, झंझावाती वक्तृत्व आणि झुल्फे तर झंझावातावरोबर मुख्यमंत्र्यांच्या झुल्फाशी स्पर्धा करणारी ! आणखी काय पाहिजे ? त्याचबरोबर

आज जरी ते लोकदलाचेच नेते असले तरी भविष्यात दल बदलून दुसऱ्या एखाद्या दलाचे नेते होणार नाहीत असे कशावरून ?

जॉर्ज नाशकात आले आणि मुबईहून प्रसिद्ध होणाऱ्या एका वृत्तपत्रानं बॅनर टाकला– ' हावडा एक्सप्रेस उलथून टाकण्याचा प्रयत्न फसला– जॉर्ज फर्नांडीस याना अटक; आदोलन चालूच ! ' बादरायणी संबंध लावणारा इतका चालू मथळा माझ्या तरी वाचनात बरेच दिवसात आलेला नाही ! असो

शरद जोशीनी आदोलकाना अठ्ठेचाळीस तासाची विश्राती जाहीर केली, अशी बातमी छापून आली त्या दिवशी मा. मुख्यमत्री अंतुलेसाहेब आणि त्याच्या पत्नी श्रीमती नर्गिस लहान मुलाना रवरी चेडू वाटीत होते. चेडू वाटून झाल्यानंतर त्यांनी शेतकरी नेत्याना ' गय करणार नाही ' वगैरे इशारादेखील नेहमीप्रमाणे दिलाच !

एका वर्तमानपत्रानं ' नासिक जिल्ह्यात लोकप्रतिनिधीना घेराओ– परिस्थितीला तोंड देण्यास शासन सज्ज ' अशा मथळ्याखाली छापलेल्या बातमीत म्हटलं, ' कादा आणि उसाला जादा भाव मागणारे हे आदोलन नासिकच्या आजूबाजूच्या भागात पसरत आहे. मात्र आदोलनाच्या नेत्याना असलेली जनतेची सहानुभूती झपाट्याने ओसरत आहे असे गुप्तचरखात्याचे म्हणणे आहे. आंदोलनाची व्याप्ती अधिक वाढवावी याला शेतकऱ्याची तयारी नाही ! '

१४–१५ नोव्हेंबरच्या परिस्थितीची माहिती देणाऱ्या ह्या वृत्तपत्रातच ' हवेली तालुका शेतकरी संघटना ' जन्मास आल्याचा वृत्तात साग्रसंगीत वर्णन करण्यात आला होता, ह्या संघटनेन पुणे–सोलापूर रस्ता सव्वा तास रोखून धरला होता. रस्ता रोखणाऱ्या १३७ जणांना अटक करण्यात आली होती. सायंकाळी सर्वांनाच सोडून देण्यास पोलीस तयार होते; पण आदोलकानी स्वत:ची सुटका करून घेण्यास नकार दिला. (बाहेर जर ' लोकप्रतिनिधीचे राजीनामे आणि न दिल्यास घेराओ ' असा प्रकार चालू असेल तर ' आत ' राहिलेलं ' सेफ ! ') अटक झालेल्यांमध्ये काही आमदार आणि नगरसेवक वगैरे लोकप्रतिनिधी होते.

ह्या आदोलनाच्या प्रसंगी काही वक्त्यानी शासनाला इशारा दिला की, शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी व इतर प्रतिनिधीसमवेत शासनाने चर्चेला त्वरित प्रारंभ न केल्यास पुणे–सोलापूर मार्गावर ठिकठिकाणी झाडे पाडून रस्ता अडविला जाईल ! रेल्वे अडविण्यात येईल आणि आंदोलन अधिक तीव्र होईल ! !

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात असा प्रकार घडत असताना औरंगाबाद येथे इंदिरा कॉंग्रेसचे खासदार श्री. बाळासाहेब पवार यानी ' शेतकऱ्याना भाव बाधून मिळावेत या मागणीला माझा पाठिंबा आहे ' असे उद्‌गार काढले. त्याच सुमारास शेतकरी सघटनेच्या आंदोलनास पाठिंबा दर्शविण्यासाठी फलटण तालुक्यातील शेतकऱ्यांनी श्री. हरिभाऊ निंबाळकर याचे नेतृत्वाखाली तहसील कार्यालयावर मोर्चा नेला.

एका माजी मंत्र्याच्या चिरंजिवानी युवक शेतकरी संघटना स्थापन करून श्रीरामपूर स्टेशनमध्ये पाच जणासह ठाण मांडून दौड-मनमाड पॅसेंजर काही मिनिटे अडवून स्वतःला अटक करवून घेतली.

१४ नोव्हेंबर रोजी चाळीसगावच्या बेलगंगा सहकारी साखरकारखान्याच्या गळिताचा शुभारंभ डॉ. वळीराम हिरे याचे उपस्थितीत पार पडला. कारखान्याचे चेअरमन एम्. के. पाटील यांनी ' उसाला आम्ही ३०० रुपये भाव देऊ ' अशी घोषणा केली.

मुबईमध्ये श्री. अंतुले म्हणाले, ' सामान्य जनतेच्या जीवनात अडथळे निर्माण करणाऱ्याची यापुढे बिलकुल गय केली जाणार नाही आणि या शक्तीच्या बंदोबस्तासाठी कितीही कठोर कारवाई करावी लागली तरी लोकशाहीच्या चौकटीत राहून तशी पावले उचलण्यास सरकार मागेपुढे पहाणार नाही ! '

तत्पूर्वी म्हणजे १५ नोव्हेंबरला अटक होण्यापूर्वी जॉर्ज फर्नांडिस ह्यानी खेरवाडी, सौदाणे वगैरे ' पॉलिटीशियन्स, आदोलन टुरिस्ट स्पॉट ' ना भेट देऊन ' आंदोलनाची व्याप्ती वाढवा ! ' असे शेतकऱ्यांना आवाहन केले होते.

लोकदलनेते जॉर्ज फर्नांडिस शेतकऱ्याना असे आवाहन करत असताना अर्स कॉंग्रेस मंडळी थंड बसतील हे अशक्य ! अर्स कॉंग्रेस आणि जनता पक्षवाल्यांनी एकत्र येऊन ' शेतकरी संघटनेच्या नेत्यांच्या चुकीमुळे आंदोलन दडपले जाणार असेल तर आम्ही तसे होऊ देणार नाही ! ' वगैरे घोषणा देण्यास सुरुवात केली. सर्वश्री निहाल अहमद, बबनरावजी ढाकणे वगैरे मंडळी जिल्ह्यामध्ये फिरू लागली. ¤

१५ नोव्हेंबरच्या पहाटे सिन्नरचे कॉंग्रेस आयचे कार्यकर्ते श्री. एन्. एम. आव्हाड पिंपळगाव बसवंत येथे आले. शरद जोशी, माधवराव बोरस्ते ह्यानी सिन्नरचा दौरा करून आदोलनात भाग घेतलेल्या शेतकऱ्याशी बातचीत करावी असा आग्रह त्यानी धरला. वास्तविक जोशी, बोरस्ते आणि मोरे ह्यांना साडेअकरा वाजता कोर्टात हजर रहाणे आवश्यक होते. वैयक्तिक जातमुचलक्यावर या नेत्यांची सुटका केली होती, त्याविरुद्ध सरकारनं सेशन्स कोर्टात अपील दाखल केलं होतं, त्याची सुनावणी होणार होती. माधवराव खंडेराव मोरेंचा पत्ता नव्हता– ते भूमिगत होते !

आव्हाडांनी आग्रह केला, जोशीनी केला आणि कोर्टात हजर रहण्यापूर्वी सिन्नर भागातील चिंचोलीफाटा, दोडी वुद्रुक, नांदूर शिंगोटे, शिंदे पळसे वगैरे भागांना भेटी देण्यासाठी ते आणि माधवराव बोरस्ते बाहेर पडले. ह्या दौऱ्यातील एका सभेत बोलताना श्री. माधवराव बोरस्ते ऊर्फ ' तात्या ' म्हणाले–

– " मी तर आता अस म्हणेन की भाव काय मिळणार, काय नाही हे आता गणितानंच सिद्ध होणार आहे. परवाच्या आंदोलनात शेतकरी रस्त्यावर आला ह्यातच आपला पहिला विजय झाला. ह्या भारतामध्ये अनेकानी आपआपल्या मागण्या एकत्र येऊन, संघटितपणे आदोलन करून पदरात पाडून घेतल्या. पार्टटाइम काम करणाऱ्या गावच्या कोतवालानीसुद्धा संघटितपणे आपलं वेतन वाढवून घेतलं आहे. फक्त शेतकरी तेव्हढा सघटित होत नव्हता. एकत्रित येऊन आपल्या मागण्या मागत नव्हता. त्याला अर्थातच अनेक कारणं होती. शेतकऱ्यांना संघटित करण्याच्या नावाखाली आतापर्यंत अनेक राजकीय पक्ष पुढे आले- पण केवळ राजकारण खेळण्यासाठी. शेतकरी संघटना जन्मास येताच, ह्या राजकारणी लोकाच्या खेळामुळे ती लगेचच नेस्तनाबूद होत होती, असा आपल्या सगळ्याचा आतापर्यंतचा अनुभव आहे.

' –ही शेतकरी संघटना मात्र निकोप आहे, पक्षविरहित आहे

आणि तशी ती ठेवली पाहिजे. जॉर्ज फर्नांडिसचं सरकार आलं तेव्हा त्यांनीही शेतकऱ्यासाठी काही केलं नाही आणि आता माझ्या पक्षाच-माधवराव बोरस्तेच्या पक्षाचं सरकार आलं आहे त्यानंही आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी काही केलं नाही ही वस्तुस्थिती आहे.

'शेतकऱ्याच्या शेतमालाच्या आधारभूत किंमती ठरविताना मुळा-तच फार मोठी चूक असल्यामुळे केंद्र सरकारकडून शेतकऱ्यावर सतत अन्याय झाला ही गोष्ट विसरून चालणार नाही.

'काही लोक विचारतात, महाराष्ट्रात सत्तर लाख कारखाने आहेत ते कुणाच्या जिवावर चालले आहेत ? हे लोक असंही म्हणतात की सरकारनं कोटयवधी रुपये दिल्यामुळेच हे कारखाने चालू आहेत ! बड्या शेतकऱ्यांकडे तीनशे कोटी रुपयाची थकबाकी आहे असं वर्तमानपत्रात वारंवार छापून येतं !

'शेतकऱ्याकडे तीनशे कोटीची थकबाकी असेल; पण उद्योगपतीकडे साडेआठशे कोटीची थकबाकी आहे त्याच काय ?– हे उद्योगपती आपल्या कारखान्यात तयार होणाऱ्या मालाची किंमत स्वत: ठरवू शकतात ही गोष्ट वर्तमानपत्रवाले विसरतात. शेतकऱ्याला मात्र त्याच्या कारखान्यात तयार होणाऱ्या मालाची–साखरेची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही !

'मर्सिडीज् ट्रक तयार झाला की टाटा किंमत ठरवतो–लाख रुपये, दीड लाख, पावणेदोन लाख – महागाई वाढली म्हणून दोन लाख ! त्याच्यावर सरकार कसलही बंधन घालत नाही ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

शेतकऱ्याच्या शेतमालाच्या किंमती मात्र दुसरेच कुणी तरी ठरव-तात आणि ह्या किंमती ठरवताना साधा उत्पादनखर्च देखील ही मंडळी ध्यानात घेत नाहीत. आपण म्हणतो शेतकऱ्याचा मुलगा मंत्री झाला. आता शेतकऱ्याला काही कमी पडणार नाही ! शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटणार ! – पण वस्तुस्थिती मात्र तशी नाही. शेतकऱ्याचा मुलगा जरी मंत्री झाला असला तरी त्याच्याभोवती ज्या मंडळीचं कडबोळं जमतं–ते कडबोळं त्या मंत्र्याला ग्रामीण भागातील शेतकऱ्या-साठी काही करू देत नाही. आजपर्यंत वारंवार हेच आपल्या निदर्श-नास आलं आहे.

'– म्हणूनच आता आपल्या न्याय्य मागण्या पदरात पाडून घेण्या-साठी आपल्याला इथून पुढं सातत्यानं आंदोलन चालू ठेवावं लागणार आहे. संघटना वाढवावी लागणार आहे. आपल्या संघटनेला अजून सरकारदरबारी मान्यता मिळाली नाही– ती इथून पुढं मिळालीच पाहिजे ! आज सरकार शेतकरी संघटनेचं अस्तित्वच मानायला तयार नाही; पण लवकरच त्यांना संघटनेकडे लक्ष द्यावं लागणार हे निश्चित.

'आम्हाला आंदोलनाची हौस नाही–शक्यतो सर्व प्रश्न वाटाघाटीनेच सोडवावे असं आम्हाला वाटतं, पण शासन वाटाघाटीला तयार नाही, एव्हढंच नव्हे तर हे आंदोलन चिरडून टाकायचं, असं शासनाच्या डोक्यात भरलेलं दिसतंय. शासनाला आपलं आंदोलन यशस्वी होऊ द्यायचं नाही–पण हे आंदोलन त्यांना असं चिरडून टाकता येणार नाही. शासनाला ह्याची लवकरच जाणीव होईल अशी मला खात्री आहे. शेतकरी संघटनेशी आज ना उद्या चर्चा करणं, वाटाघाटी करणं शासनाला भाग पडणार आहे.

– तेव्हा मित्रानो, तुम्ही कुठल्याही पक्षाचे असा, तुमच्यापैकी कुणीही राजकारणामध्ये कुठेही विखुरलेला का असेना–शेतकरी संघटनेच्या कामासाठी आपला पक्ष बाजूला ठेवा, शेतकरी ह्या नात्यानं एकत्र या आणि आपल्या मागण्या पदरात पाडून घ्या !'

माधवराव बोरस्तेच्या भाषणाला सिन्नरच्या शेतकऱ्याकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला. अनेकांच्या चेहऱ्यावर 'तात्या इंदिरा काँग्रेसचे–निफाड कारखान्याचे चेअरमन, महाराष्ट्र साखरसंघाचे अध्यक्ष आणि तरी देखील असं बोलतात, तेव्हा ह्यात नक्की काही तरी डाव असला पाहिजे असा भाव दिसत होता. ह्या सभा आयोजित करणारे एन्. एम. आव्हाड हे देखील आय काँग्रेसचेच आहेत हे मात्र मंडळी सोयिस्करपणे विसरली असल्यासारखं देखील वाटत होतं. म्हणजेच आव्हाडावर विश्वास पण तात्यावर अविश्वास–दोघेही इंदिरा-काँग्रेसचेच ! असं काहीसं विचित्र वातावरण सिन्नरच्या परिसरात होतं हे निश्चित. शरद जोशीना पक्ष-पक्षातील किंवा पक्षांतर्गत तणावामध्ये बिलकुल रस नसल्यामुळं त्यांनी आपल्या भाषणात सांगितलं–

'आजपासून पुष्कळ लोक तुम्हाला सांगतील–तुम्ही इतक्या उत्सा-हानं आंदोलनात भाग घेतला, पण शेतकरी संघटनेच्या नेतृत्वामध्ये काही तरी गडबड दिसते ! शेतकरी संघटनेचे नेते आता आंदोलन मागे घेत आहेत, ते हरत आहेत, त्यांचा पराभव होतोय. आपण सगळे हरत आहोत, आपला पराभव होतोय अशा प्रकारचा गैरसमज फैलावण्याचा काहीजण प्रयत्न करीत आहेत. असा गैरसमज पसरव-णारी जी मंडळी आहेत त्यांनी आंदोलन उभं करण्यास मात्र अजिबात साथ दिली नाही, आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतला नाही हे तुम्ही लक्षात ठेवा !

'– आज जे गैरसमज पसरविण्यासाठी फिरत आहेत त्यांच्याच गावी मी आंदोलनाच्या अगोदर जाहीर सभा घेतल्या होत्या. तेव्हा हीच माणसं सभेला देखील हजर राहिली नव्हती–इतकी त्यांची शेतकरी आंदोलनाबद्दल तेव्हा आस्था होती !

'पण आज जेव्हा लाखो शेतकरी आंदोलनात उभे राहिले तेव्हा ह्या पर्वणीत कुठं तरी हात धुऊन घ्यावेत, सध्याचं नेतृत्व बाजूला सारून आपण मध्येच घुसावं अशा स्वार्थी हेतूनं ही धंदेवाईक पुढारी मंडळी आता लुडबुड करत आहेत.

'तुमच्यापैकी कुणाच्या मनामध्ये जर शंका असेल की आपण आंदोलन मागे घेतलं की काय–त्यांना आज मी एव्हढच सांगू इच्छितो, की, हा आपला महाराष्ट्र गनिमी लढ्यासाठी प्रसिद्ध आहे हे त्यांनी आठवावं; पण लढा द्यायचा म्हणजे भिंतीला एक टक्कर द्यायची, डोकं फोडून घ्यायचं आणि हुतात्मे होऊन खाली पडायचं ही कल्पना साफ चुकीची आहे !

'तुमच्या ह्या सिन्नर परिसरात सुदैवानं कुठंही लाठीमार झाला नाही. गोळीबार झाला नाही; पण आडगावपासून सौदाण्यापर्यंत

## शेतकरी आंदोलन आणि धंदेवाईक पुढाऱ्यांची लुडबूड

झाली सात–आठ हजार माणसं पोलिसांच्या, एस आर. पी च्या लाठ्या खाऊन जखमी झाली आहेत. सत्याग्रहींनी शांततेत कायदेभंग करून रस्ता अडवायचा आणि अटक करवून घ्यायची हे तंत्र आपण स्वीकारलं होतं सरकारनं हा सत्याग्रह मान्य केला असता तर आता-पर्यंत दोन-अडीच लाख शेतकरी तुरुंगात गेले असते; पण सरकारनं सत्याग्रहींना अटक केलं नाही, बळाचा वापर केला. अमानुष लाठी-हल्ला करून आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न सरकारनं केला, तेव्हा शेतकरी संघटनेच्या सत्याग्रहींना लाठ्यांनी बडवून घेण्यासाठी पाठवायचं नाही असा निर्णय आम्ही घेतला !

'पूर्वसूचना देऊन केलेल्या शांततापूर्ण सत्याग्रहाचं तंत्र बदलून आता इथून पुढं आपण 'गनिमी सत्याग्रहाचं' तंत्र अवलंबणार आहोत. ह्या गनिमी सत्याग्रहासाठी तुमच्या गावानं नेमक्या कुठल्या तारखेला, कुठं, काय करायचं ह्याचा आदेश तुम्हाला योग्य वेळी देण्यात येईल. असा आदेश मिळाल्यानंतर आंदोलनाच्या सुरुवातीला ज्या संख्येनं तुम्ही उतरलात त्याहीपेक्षा मोठ्या संख्येनं सत्याग्रह करण्याची तुम्ही तयारी करा !

'खेरवाडीला जो गोळीबार झाला, जिथं हाताची घडी घालून बसलेल्या शेतकरी आंदोलकांवर पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला, अश्रुधुराचा मारा करून गोळीबार केला त्या अन्यायाकडे साऱ्या जगाचं लक्ष वेधावं म्हणून जरूर पडल्यास आम्ही जनता न्यायालय स्थापन करून जाहीर निवाडा करणार आहोत !

'त्याआधी सरकारनं ह्या अत्याचाराची न्यायालयीन चौकशी करावी असा आमचा आग्रह आहे. खेरवाडीच्या गोळीबाराचा आणि आंदोलन चिरडून टाकण्यासाठी शेतकऱ्यांवर जो निर्घृण लाठीहल्ला झाला त्याचा निषेध म्हणून सर्व प्रतिनिधींनी आपआपले राजीनामे सादर करावेत अशी शेतकरी संघटनेनं विनंती केली आहे. जे लोकप्रतिनिधी राजीनामे देणार नाहीत त्यांना घेराओ घालून राजीनामे मागावेत असे शेतकऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत. जे लोकप्रतिनिधी स्वखुषीनं राजीनामा देतील त्यांना फेरनिवडणुकीसाठी एक पैसाही खर्च करावा लागणार नाही अशी शेतकरी संघटनेतर्फे त्यांना हमी देण्यात येत आहे.

'आपल्या आंदोलनाच्या बाबतीत सरकारनं दडपशाहीचा मार्ग अवलंबिल्यामुळं शेतकऱ्यांच्यात प्रचंड संताप पसरला आहे. सुकेण्याला फार मोठ्या प्रमाणावर शेतकरी महिलांनी आंदोलनात भाग घेतला, अटक करण्यासाठी महिला पोलीस नव्हते तेव्हा एस्. आर. पी आणि पोलिसांनी मिळून स्त्रियांना हातपाय धरून उचलून गाडीत टाकलं. ह्या दांडगाईत काही आंदोलक स्त्रियांचं लुगडं फिटायची वेळ आली. त्यामुळे शेतकरी अतिशय चिडले !

'त्या दिवशी जर रेल्वेचं आंदोलन आम्ही तात्काळ मागं घेतलं नसतं तर शेतकऱ्यांनी मनमाडपर्यंतचे रूळ उखडून काढले असते, पूल पाडून टाकले असते.

'अशा तऱ्हेच्या घटना घडल्या असत्या तर शेतकरी आंदोलन फार काळ चालणं कठीण झालं असतं. आपल्याला हा ऊस–कांद्याचा एकच लढा जिंकायचा नाही...आपल्याला सर्व शेतमालाच्या भावासाठी दीर्घ मुदतीचं आंदोलन चालवायचं आहे. त्यासाठी आपल्याला लोकांची सहानुभूती आवश्यक आहे. ती गमावून चालणार नाही !

'आज नाशिक जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांवर पोलिसांनी खटले भरले आहेत; पण नाशिकमधील सर्व वकिलांनी आंदोलकांवरील खटले विनामूल्य चालविण्याचा ठराव करून त्याप्रमाणे कामाला सुरुवात केली आहे. तसेच नाशिकमधील डॉक्टरांनी जखमी सत्याग्रहींना विनामूल्य वैद्यकीय साहाय्य करण्याचं काम हाती घेतलं आहे. अशा प्रकारची सहानुभूती आपल्याला गमवायची नाही आहे. आपलं आंदोलन दूरच्या पल्ल्याचं आहे हे प्रत्येकानं ध्यानात ठेवावं !'

'जी राजकारणी मंडळी आता तुमच्यामध्ये येऊन गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करतील त्यांना फक्त एकच प्रश्न विचारा– हे आंदोलन उभं करण्यात आलं, सुरू झालं तेव्हा तुम्ही कुठे होता ?– हे आंदोलन संपलंय किंवा मागं घेण्यात आलंय अशी तुमची भावना अजिबात होऊ देऊ नका. आंदोलन सुरू आहे आणि ते अधिक तीव्र होणार आहे !'

¤

शरद जोशी सिन्नरच्या परिसरात सभा घेत होते त्याच सुमारास श्री. जॉर्ज फर्नांडिस यांनी नाशिकमधील रविवार कारंज्यापासून 'कलेक्टर काम रोको' सत्याग्रहासाठी भव्य मोर्चा काढला. ह्या मोर्चाचे वेळी ते खेरवाडीच्या गोळीबारात मरण पावलेल्यांसाठी निधी देखील गोळा करणार होते.

मोर्चा सुरू झाला तेव्हा कारंज्यापाशी श्री. जॉर्ज आणि चार-पाच 'सत्याग्रही' होते. हळूहळू मोर्चात भर पडून सत्याग्रहींची संख्या २५–३० इतकी झाली. काहींच्या मते जॉर्ज धरून पस्तीस माणसे मोर्चात होती. ह्या भव्य मोर्चा कलेक्टरचे काम बंद पाडण्यासाठी निघाला तेव्हा मोर्चातील सत्याग्रही रंबा-संबा नाच करून शेतकरी झिंदाबादच्या घोषणा देत होते असेही काही बघ्यांनी सांगितलं. श्री. जॉर्ज ह्यांना अटक होण्यापूर्वी त्यांच्या झोळीत बावीस रुपये ऐंशी पैसे इतका निधी जमला होता. त्यांच्या गोटातील खास माहितगाराकडून हा आकडा पंचवीस रुपयांपेक्षा जास्त असल्याचे विश्वसनीयरीत्या सांगण्यात आले. श्री. जॉर्ज आणि त्यांच्या अकरा सहकाऱ्यांना अटक करून कोर्टात आणले तेव्हा त्यांच्याभोवती पंचवीस–तीस वार्ताहर, दहा-बारा फोटोग्राफर्स आणि असंख्य बघ्यांचा गराडा पडला. श्री फर्नांडिस यांना मॅजिस्ट्रेटनं दोन दिवसांचा रिमांड देऊ केला– पण श्री. जॉर्ज ह्यांनी तो नाकारला. असा सत्याग्रह केल्यानंतर तुरुंगात जाणे आवश्यक आहे असे श्री. जॉर्ज यांचे मत असावे !

जॉर्जना अटक झाली त्या दिवशी म्हणजे १५ नोव्हेंबरच्या सकाळी इगतपुरी इथं मुक्कामास आलेल्या श्रीमती गोदुताई ऊर्फ गोदाराणी परुळेकर यांनी 'आम्हाला न विचारताच शरद जोशींनी आंदोलन स्थगित केले' ह्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पाच डाव्या पक्षांतर्फे वेगळे आंदोलन उभे करण्याची त्यांनी घोषणा केली. लोकप्रतिनिधींच्या राजिनाम्यांची जोशी यांनी केलेली मागणी अयोग्य असल्याचं त्यांनी सांगितलं. इगतपुरी इथं एक कृतिसमिती स्थापन करून आंदोलनात जखमी झालेल्यांसाठी निधी गोळा करण्याचा त्यांचा विचार आहे असं एका कार्यकर्त्याकडून समजलं.

शेतकरी संघटनेचे माधवराव खंडेराव मोरे प्रत्येक सभेमध्ये शेतकऱ्यांच्या तरुण मुलांकडून वर्गणी मागत होते पोलिसाच्या एक लाठीची ! शेतकऱ्यानी अपेक्षेपेक्षा जास्त वर्गणी माधवरावांना बहाल केली होती. लोकानी आपल्या पाठी पोलिसाच्या आणि एस्. आर. पीच्या लाठीहल्ल्यानं फोडून घेतल्या होत्या आणि शेतकरी संघटनेची वर्गणी पुरी केली होती !

डाव्या आघाडीची मंडळी कृतिसमिती स्थापन करण्याच्या प्रयत्नात असतानाच अर्स काँग्रेसचे आमदार श्री. सूर्यकांत गडाख यानी नासिक जिल्हा जनतापक्षाबरोबर संगनमत करून अकरा जणांची अस्थायी समिती स्थापन केल्याची घोषणा केली या अस्थायी समितीत सर्वश्री मालोजी मोगल, निहाल अहमद वगैरे मंडळींचा समावेश होता.

पंधरा नोव्हेंबरपासून डाव्या आघाडीच्या मंडळीकडून शेतकरी संघटनेच्या आंदोलनात फूट पाडण्याचे प्रयत्न उघडपणे सुरू झाले. सिंहानं शिकार केल्यानंतर आभाळात ज्याप्रमाणे गिधडे घिरट्या घालू लागतात, सिंहाच्या हालचालीवर लक्ष ठेवून अतिशय सावधगिरीनं झाडाच्या फांद्यावर उतरतात आणि सिंह नजरेआड होताच शिकारीवर तुटून पडून, एकमेकांना टोची मारत मिळेल तो तुकडा पळविण्याचा प्रयत्न करतात तसा प्रकार नासिक जिल्ह्यात सुरू झाला. सर्व राजकीय पक्षाची खरी पोटदुखी होती– 'आम्हाला न विचारता जोशी निर्णय घेतात !'

**आंदोलन का स्थगित केले ह्याबद्दल वार्ताहरांशी बोलताना शरद जोशी म्हणाले, 'केवळ वेगानं पळू शकते म्हणून एखादी गाडी चांगली आहे असं समजणं चूक आहे. वेगानं पळणारी गाडी ब्रेक मारताच हवी तिथं अचूक थांबणं जास्त महत्त्वाचं आहे. आंदोलनाची गाडी हाताबाहेर जाऊ नये म्हणून आम्ही तिला योग्य वेळी ब्रेक लावले आहेत. आंदोलन मिटलेले नाही. आमचे आंदोलन म्हणजे रोज खेळ झालाच पाहिजे अशी सर्कस नव्हे !'**

१५ नोव्हेंबरला शरद जोशी, माधवराव बोरस्ते, अॅडव्होकेट दौलतराव घुमरे ह्यांचेबरोबर कोर्टात हजर झाले तेव्हा जॉर्जसाहेबांचा मोर्चा संपला होता. शरद जोशी वगैरे नेत्याना ११ तारखेला वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडण्यात आले होते, त्याविरुद्ध सरकारनं अपील दाखल केलं होत. सरकारचं म्हणण होतं की, ज्या कायद्याच्या कलमाखाली शेतकरी संघटनेच्या नेत्याना अटक करण्यात आली होती त्या कलमानुसार त्याना जामिनावर मुक्तता करण्याचा कोर्टाला अधिकार नव्हता. नासिकच्या अनेक वकील मंडळींना कलम १५१ ह्या नव्यानंच अंमलात आलेल्या कायद्याची– मिनी–मिसाची तपशीलवार माहिती नव्हती. कोर्टाच्या आवारात वकीलमंडळी गटागटानं उभी होती ! सर्वांच्या चर्चेचा विषय एकच. कलम १५१– मिनीमिसा. कुणी म्हणत होतं की, खास दत्ता सामंतांवर निर्बंध घालता यावेत म्हणून ऑगस्ट महिन्यात कलम १५१ ची तरतूद करण्यात आली होती.

न्यायाधिशांनी सरकारचं अपील मान्य केलं आणि शरद जोशी, माधवराव बोरस्ते आणि माधवराव खंडेराव मोरे यांना १६ नोव्हेंबर रोजी मॅजिस्ट्रेटसमोर हजर रहाण्याचा हुकूम दिला; पण माधवराव खंडेराव मोरे होते कुठे ?– अकरा तारखेला सर्वांना सोडण्यात आलं होतं तेव्हापासून माधवराव खंडेरावाचा पत्ताच नव्हता ! त्याचेविषयी कुणी काहीच बोलत नव्हतं. सगळेच गप्प ! कोर्टाच्या आवारातून बाहेर पडताना शरद जोशी म्हणत होते, 'आज माधवराव मोरेंनी कोर्टात हजर असणं आवश्यक होतं– उद्या मॅजिस्ट्रेटसमोर त्यांनी उभं रहाणं महत्त्वाचं आहे– माधवरावांना जाहीरपणे आवाहन करावं असं आता मला वाटू लागलंय !' मी प्रश्न केला 'पण माधवराव आहेत कुठं ? नाशकात का आणखी कुठं ?'– शरद जोशींनी प्रश्नाचं उत्तर दिल नाही, ते नुसतेच हसले.

कोर्टातून बाहेर पडलो तेव्हा दुपारचे दोन वाजून गेले होते आम्ही सरळ रमण सिसोदियांच्या घरी गेलो. जेवण आटोपलं तेव्हा शरद जोशींना भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांची बरीच गर्दी झाली होती. मंडळींची चर्चा रंगात आली होती; पण चर्चेत माझं मन रमेना. शेजारच्या खोलीत एक गादी टाकून मी आडवा झालो. पडताक्षणी गाढ झोपी गेलो.

संध्याकाळी साडेपाच-पावणेसहाच्या सुमारास जाग आली. बाहेरच्या खोलीत आलो. शरद जोशींना म्हणालो,

'मी पुण्याला जाऊन लगेच परत येतो. रील्स, टेप्स वगैरे सगळं संपलं आहे.'

माधवराव बोरस्ते यानी विचारलं, 'केव्हा निघणार ?' मी म्हटलं 'आत्ता !' 'बाहेर माझी गाडी उभी आहे–ड्रायव्हर पण आहे त्याला घेऊन जा !' माधवरावानी सांगितलं.

मी उठलो, श्रीभाऊ माजगावकर पण उठले, शंकर वाघ पण निघाले आणि सिसोदियांनी आपल्या भावाला–सुरेशला–आमच्याबरोबर जाण्यास सांगितलं. संध्याकाळी सातच्या सुमारास आम्ही नासिक सोडल. पोलिसाची वायरलेस जीप पीछा करत होती. आम्ही सिन्नर ओलांडलं आणि जीपचे दिवे दिसेनासे झाले.

शंकर वाघाना वाटेत चाकणला त्याच्या घरी सोडलं.पुण्यात येताच श्रीभाऊ माजगावकराना त्याचे घरी सोडलं आणि मध्यरात्री साडेबारा-एकच्या सुमारास मी घरी आलो. सुरेश सिसोदिया म्हणाला, 'मी दीड-दोन तासात येतो–तुम्ही तयार रहा !'

घरी येताच मी शरद जोशींच्या पत्नीला, सौ. लीलाताईंना फोन केला. सोळा तारखेला–दुसऱ्या दिवशी शरद जोशींना पुन्हा अटक होण्याची शक्यता असल्याच सांगितलं. त्या म्हणाल्या, 'मी तयार रहाते–निघण्यापूर्वी गाडी माझ्या घरावरून घ्या !'

पहाटे अडीचच्या सुमारास सुरेश सिसोदिया हजर झाला. मी सगळं साहित्य घेऊन तयार होतोच. गाडीमध्ये एक 'को-पेसेंजर' होता. सौ. लीलाताई जोशींना आणि वाटेत चाकणला शंकर वाघाना गाडीत घेऊन आम्ही सोळा तारखेला सात वाजता पुन्हा नासिकात हजर झालो.

सिसोदियांच्या बंगल्याबाहेर पोलिसाच्या दोन वायरलेस जीप्स पहाऱ्यावर होत्या. माणसाची वर्दळ चालू होती. वृत्तपत्रकाराची गर्दी जमली होती. ११ तारखेला वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटका झाल्यापासून शरद जोशी नासिक जिल्ह्यामध्ये अहोरात्र फिरत होते, अनेक सभांतून त्यांची भाषणं झाली होती. सतत प्रवास, अनियमित

आहार, अपुरी झोप ह्या सर्वांचा त्याच्या प्रकृतीवर मात्र विशेष परिणाम झाल्यासारखं वरकरणी तरी दिसत नव्हतं आवाज मात्र बसला होता—घशाला इन्फेक्शन झालं होतं. वार्ताहरांशी ते बोलत होते आणि मी अंगणातील नारळाच्या झाडाखाली बसून होतो. इंदिरा काग्रेस पक्षाचे एक कार्यकर्ते दिवाणखान्यातून बाहेर पडले आणि माझ्या शेजारी येऊन बसले. इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्या नंतर ते 'बोलते' झाले. सागू लागले—

'काल (१५ नोव्हेंबर) डॉ. बळिराम हिरे नाशिकात होते—रात्री आम्हाला त्यानी जेवायला बोलावलं होतं—मी गेलो होतो—तात्या म्हणजे आपले माधवराव बोरस्ते आले नव्हते. शंकरराव कोल्हे पण काल नाशकात आलेत. अंतुलेसाहेबांनी शंकरराव कोल्हेंच्याकडे सर्व सूत्रे सोपवली आहेत असं माझं वैयक्तिक मत आहे.

'मी आणि माझ्यासारखे इतर कार्यकर्ते शरद जोशींच्याबरोबर आदोलनात उतरलो म्हणून आमच्या पक्षातील काही नेतेमंडळी नाराज असावीत. काल आमच्या चर्चेची सुरुवातच ह्या मुद्द्यावरून झाली. मी डॉक्टराना स्पष्ट सागितलं, गेले दहापधरा दिवसच मी शरद जोशींच्या सहवासात आहे, पण त्यानी मला तुम्ही अमुक अमुक पक्षात का रहाता असं चुकूनही विचारलं नाही. मग तुम्ही मंडळी मला शरद जोशींबरोबर का रहाता असं विचारू नका!

शरद जोशींची शेतकरी संघटना पक्षातीत आहे हे आम्ही मान्य केलं आहे. मी, माझे सहकारी, माधवराव बोरस्ते आणि त्यांचे लोक शरद जोशींच्याबरोबर रहाणार, शेवटपर्यंत काम करणार आहो! लोकांना ह्या प्रश्नाविषयी खरं काय वाटतं हे आमच्याशिवाय शासनाला दुसरं कुणीच सागू शकणार नाही.

'मी डॉक्टराना विचारलं, 'लोकाच्या खऱ्या भावना काय आहेत हे असं काग्रेसच्या मंडळींनी तुम्हाला सागितलं तर चालेल काय?—नाही ना? म्हणूनच लोकाचं खरं मत काय आहे हे सागण्यासाठीच आम्ही शेतकरी सघटनेत आहोत आणि इथून पुढं काम करणार आहोत.

'शासनाविषयी लोकाचं सध्या अतिशय वाईट मत झाल आहे ही तर वस्तुस्थिती आहे.शासन सध्या कुणाशीही बोलणी करतं, कुणाच्याही मागण्या मान्य करत, पण फक्त शेतकऱ्याच्या नेत्यांशी बोलत नाही—ह्याची लोकाना चीड आली आहे.

डॉक्टर मला म्हणाले—'शेतकऱ्याशी बोलायला कुणाचीच ना नाही. पण शरद जोशींबरोबर कशासाठी बोलायचं? त्यांचे दुसरे नेते मोरे त्याच्याशी का बोलायच—? मोरेंनीच हा सगळा उपद्व्याप करून ठेवलाय—आणि तुमच्यासारखी मडळी देखील शरद जोशींच्या नादाला लागली हे तुम्हाला शोभतय का?'

मी डॉक्टराना म्हणालो—'इथं शोभण्या न-शोभण्याचा प्रश्नच कुठं आला? आम्हाला स्थानिक पातळीवर जे योग्य वाटलय ते आम्ही स्वीकारलय!' बागलाण—मालेगाव भागातील काही कार्यकर्ते जेवणास आले होते. त्यानी तर डॉक्टराना स्पष्ट शब्दात सागितलं 'शरद जोशींबद्दलची तुमची जी मतं आहेत ती तुमच्याजवळच ठेवा. तुम्ही आता काहीही म्हणालात तरी लोक ऐकणार नाहीत.' ह्या बागलाणच्या कार्यकर्त्यांपैकी एकजण तर सरळच म्हणाला—'कोण शरद जोशी?' असं तुम्ही विचारता तस आम्ही 'कोण अतुले?' असं विचारायचं का? —तुम्ही अंतुलेंना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून स्वीकारलंत ना?— मग आता लोकानी शरद जोशींना आपला नेता म्हणून स्वीकारलं तर तुमच्या पोटात का दुखतं?

'ब्राह्मणगावचे बापू डॉक्टराना म्हणाले—'तुम्ही अजून शरद जोशींना भेटलेले दिसत नाही! तुम्ही अजून त्याचे विचार ऐकलेले नसावेत!—त्या माणसाला शेतीप्रश्नाविषयी आपणा सर्वांपेक्षा जास्त माहिती आहे. एवढच नव्हे तर ही माहिती कुठल्याही शेतकऱ्याला सहजपणं पटवून देण्याची ताकद त्या माणसामध्ये आहे—आणि ही गोष्ट तुम्हाला नाकारून चालणार नाही. शेतीप्रश्नांविषयीचे जोशींचे विचार शेतकऱ्यांना आता स्पष्टपणे कळले आहेत. लोकांच्या भावना आज ज्या तीव्र झाल्या आहेत त्या शरद जोशींचे विचार मनोमन पटल्यामुळं लोक केवळ हुल्लडबाजी करण्यासाठी एकत्र येऊन त्याच्या पाठीमागं उभ राहिले नाहीत!'

दुसरे एक खासदार डॉ. हिऱ्यांना म्हणाले—'तुम्ही आमची फार अडचण करून ठेवली आहे. शासनाचं निश्चित धोरण काय आहे ते तुम्ही आम्हाला कधीच सागत नाही. लोकामध्ये काय बोललं जातं हे तुम्ही आम्हाला कधी विचारीत नाही. त्यामुळं लोक आता आमच्याकडे आरोपी म्हणून पाहतात. आम्हाला चोर म्हणतात. ह्या चोरामुळंच आम्हाला काही मिळत नाही—हे चोर आमच्या हिताच्या आड येतात असा लोकाचा आमच्याविषयी समज होत चाललाय—'

अशी चर्चा चालू असताना शंकरराव कोल्हे आले आणि म्हणाले—'तुम्ही म्हणता ते सगळं खरं आहे. शेतकरी रस्त्यावर आलाय ही गोष्ट खरी आहे, त्यानं यायला पाहिजे ही गोष्ट सुद्धा खरी आहे आणि तुमच्यासारखे (म्हणजे डॉक्टरासारखे) जे नेते शासनामध्ये काम करतात त्यांना आणि तुम्हाला सर्व परिस्थिती माहिती असून तुम्ही तिथं का बोलत नाही? लोकांमध्ये उघड का बोलत नाही? जोशींबरोबर नका बोलू—पण लोकाना सागा ना की, मागण्या मान्य केल्या आहेत!'

त्यावर डॉक्टर म्हणाले—'कुणी मागण्या मान्य केल्यात? कधी केल्यात?'—तेव्हा कोल्हे म्हणाले, 'साखरेचा प्रश्न आता मिटल्यासारखा आहे. तीनशे रुपये टन भाव आपण देऊ शकतो, ही गोष्ट १ नोव्हेंबरच्या आधीच आमच्यापैकी अनेकाना माहीत होती आणि महाराष्ट्र सरकारला सुद्धा माहीत होती; पण हे सगळं दाबून का ठेवलं जातय हे मला कळत नाही! एक तारखेपासून दहा नोव्हेंबरपर्यंत तुम्ही सगळे काय करत होता?'

शकरराव कोल्हे जेव्हा असं म्हणाले तेव्हा मी विचारलं—'हे जर खरं असेल तर तुम्ही शेतकरी सघटनेच्या नेत्याबरोबर चर्चा का करत नाही?' शंकरराव कोल्हे म्हणाले—'अडचण एकच आहे,—शरद जोशी चर्चेत नको! बाकी कुणाशीही आम्ही चर्चा करायला तयार आहोत.'

तेव्हा डॉक्टर मला म्हणाले—'तुम्ही, माधवराव बोरस्ते वगैरे मंडळी या, आम्ही तुमच्याबरोबर चर्चा करायला तयार आहोत. शरद जोशींबरोबर चर्चा करायला लावून तुम्ही आम्हाला गुडगे टेकायला लावताय हे तुम्हाला शोभत का?'

मी म्हटलं—'हा प्रश्न पक्षाचा नाही. हा प्रश्न शेतकऱ्यांचा आहे

आणि लोकांच्या भावना इतक्या तीव्र आहेत की, शरद जोशीबरोबर चर्चा झाल्याशिवाय लोक इतर कुणाचंही ऐकणार नाहीत.'

ब्राह्मणगावचे बापू म्हणाले–'तुम्ही साडेबाराचं तेरा रुपये केलं, त्यानंतर पाच इन्क्रिमेन्टस् ज्या वेळोवेळी दिल्या हे सर्व काही शरद जोशींनी आंदोलन उभं केल्यामुळंच मिळाल अशी लोकांची दृढ भावना आहे. तुम्ही काय वाटेल ते समजा–सचिवालयातून प्रेसनोट काढलीत तरी शासनानं हे आपण होऊन केलं ह्यावर कुणीच विश्वास ठेवणार नाही जो संघर्ष करतो तो मिळवून देतो अशी लोकांची भावना आहे. लोकमत असं असताना शरद जोशीबरोबर चर्चा करायला तुम्हाला काय अडचण आहे?'

दुसऱ्या एका कार्यकर्त्यानं तर एकदम भारी मुद्दा उपस्थित केला. तो म्हणाला–'तुम्ही म्हणता सरकारनं ३०० रुपये टन भाव दिला! आता फक्त कांद्याच्या भावाची एक लेव्हल ठेवायचा प्रयत्न तुम्हाला करायचा आहे. जर त्यात यश आलं नाही तर पुढं काय करायचं हे ठरवायचं आहे. म्हणजेच उसाचा प्रश्न मिटल्यासारखा आहे. खेरवाडीच्या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करण्यामध्ये तुम्हाला काही अडचण असायचं कारण नाही. लोकाच्याकडे चूक निघाली–लोकाना शिक्षा करा. पोलिसांची चूक असेल तर त्याना शिक्षा करा. शरद जोशीबरोबर तुम्ही जर वाटाघाटी केल्या आणि तुमच्या म्हणण्याप्रमाण यदाकदाचित शरद जोशींनी जर आंदोलन मागं घेतलं तर अर्स कॉंग्रेस आणि डाव्या आघाडीनं उभी केलेली ही कृति-समिती साफ कोसळणार!–आपल्या पक्षाचं जर तुम्हाला हित पाहायच असेल तर ही एवढी मोठी संधी वाया घालवू नका! शरद जोशीबरोबर चर्चा करून आंदोलन कसं मिटेल ते बघा!'

ह्या विषयावर जास्त चर्चा मात्र झाली नाही आणि मग तिथं जमलेल्यांपैकी एक जण म्हणाला–'तरुण भारतमध्ये, ५००० निष्पाप लोकावर निर्घृण लाठीहल्ला असं छापून येतं, कुठलंही वर्तमानपत्र उघडलं तर त्यात शेतकरी संघटनेचीच बातमी येते–हे काही बरोबर नाही सरकारची पण बाजू आली पाहिजे–पण सरकारचं पब्लिसिटी डिपार्टमेंट आम्हाला काहीच सांगत नाही–कुणीच काही सांगत नाही. मग आम्ही वर्तमानपत्राना तरी काय सांगणार?'

'मग डॉक्टर हिऱ्यानी पब्लिसिटी डिपार्टमेंटच्या लोकाना बोलावून घेतलं. पब्लिसिटीचा अधिकारी म्हणाला, 'मी आजच 'जॉइन' झालो आहे. मागं काय घडलं ह्याची मला कल्पना नाही. मी लागलं तर इथून पुढं चर्चा करतो!'

मी म्हटलं–'चर्चा कसली करता? तुम्हाला निर्घृण लाठीहल्ला झाला की नाही याची खात्री करून घ्यायची आहे ना?–मग तुम्ही सौंदाण्याला जाऊन या! आणि तिकडच्या लोकांना सांगा की, तुम्ही असल्या आंदोलनाच्या भानगडीत पडला नसता तर तुम्हाला मार बसला नसता! पोलिसाना त्रास दिल्यामुळं तुम्हाला मार बसला असं लोकांपुढं बोला–आणि लोकाची रिॲक्शन बघा!–तुम्हाला लगेचच तिथंच उत्तर मिळेल!–सौंदाण्याला कुठं रस्ता उखडलेला नव्हता, पूल तोडलेला नव्हता–कुणी हात उचललेला नव्हता, तिथं लोकाना मारायची काय गरज होती?–घराघरामध्ये शिरून पोलिसानी लोकाना मारलंय! तुम्ही जाऊन प्रत्यक्ष पहा, चौकशी करा!'

'पब्लिसिटी–अधिकाऱ्याशी मी बोलत असताना एक आमदार म्हणाले–'शेतकरी आंदोलन असं असतं का? आपल्या शेतकऱ्याची संस्कृती किती मोठी! एखाद्याला जर अडवून ठेवलं तर त्याला जेवण देण्याची, त्याच्या चहापाण्याची सोय बघण्याची त्याची पद्धत आहे आणि ह्या आंदोलनात तर लोकाची लूटमार, अडवणूक आणि उपमर्दार होते! हे काही शेतकऱ्यांच्या संस्कृतीला शोभत नाही!!'

'त्या आमदाराकडे मी लक्ष दिलं नाही आणि डॉक्टर हिऱ्याना म्हणालो–'तुम्ही आता जिल्ह्यात फिरून लोकमताचा प्रत्यक्षच अंदाज घ्या!' त्यावर डॉक्टर म्हणाले–'मला जायचं होतं! सटाण्याचा दौरा करायचा होता; परंतु पोलिसांनी सांगितलं की न गेलेलं बरं म्हणून मी काही आता दौऱ्यावर जाणार नाही!'

शेवटी मी म्हणालो–'तुम्हीच आता पुढं काय करायचं ते ठरवा!' डॉक्टर म्हणाले–'मी स्वतः आणि तिडके कधीही चर्चा करायला तयार आहोत–अगदी आज म्हणालात तरी आमची तयारी आहे! पण शरद जोशीबरोबर नाही! शरद जोशींचं नुसतं नाव जरी काढलं तरी सी एम् भडकतात!'

ह्या कार्यकर्त्याला अजून बरच काही सांगायची इच्छा होती; पण ऐकायचा मला कंटाळा आला होता. अंगणातील नारळाच्या झाडाखालून मी उठली आणि दिवाणखान्यात डोकावलं. शरद जोशी एका वार्ताहराला सांगत होते–

'शासनाशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न तर आमचा सुरुवातीपासूनच आहे–आज आता सुद्धा आम्ही मुंबईला कॉल बुक करून वाट बघत आहोत. शासनच बोलायला तयार नाही–आणि शेतमालाच्या भावाविषयी राज्यसरकारशी बोलणी करून तसा फारसा उपयोगही नाही–ह्याबाबत राज्यशासनाला काहीही अधिकार नाहीत ह्याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. फक्त केंद्रशासनच ह्याबद्दल निर्णय घेऊ शकतं आम्हाला राज्यशासनाशी एवढ्याचसाठी चर्चा करण्याची इच्छा आहे *की त्यांनी हा प्रश्न नीट समजावून घ्यावा* आणि केंद्रासमोर आमची बाजू मांडावी. शेतमालाच्या भावासंबंधीचे प्रश्न केंद्रासमोर योग्य तऱ्हेने मांडले जावेत अशी आमची अपेक्षा आहे आणि त्यासाठी राज्यशासनाबरोबर सर्वतोपरीनं सहकार्य करण्याची आमची तयारी आहे; पण राज्यशासनानंच वाटाघाटीचे सर्व मार्ग बंद केले आहेत. सत्याग्रहाशिवाय दुसरा मार्ग आमच्याकडे सध्या तरी नाही. हा मार्ग देखील शासनबळाचा वापर करून बंद करू पहात आहे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न करत आहे. इथून पुढं आम्हाला गनिमी सत्याग्रहाचा अवलंब करावा लागणार! *आंदोलन अधिक तीव्र कराव लागणार!'*

प्रेसरिपोर्टर्स भराभर नोटस् घेत होते. शरद जोशींच्या शेजारी बसलेले माधवराव बोरस्ते काहीसे अस्वस्थ दिसत होते वारंवार टेलिफोनकडे पहात होते. मुंबईचा कॉल लागेल अशी त्याना अपेक्षा असावी–पण शासन 'रिंग' करण्याच्या 'मूड'मध्ये नसावे!

बोरस्तेंच्या समोर शरद जोशींच्या पत्नी, सौ. लीलाताई बसल्या होत्या. त्या कसल्या तरी विचारात स्वतःशीच हरवल्यासारख्या दिसत होत्या. शंकर वाघ प्रचंड बेचैन होते आणि कोपऱ्यातील एका खुर्चीत अत्यंत निर्विकार चेहऱ्यानं *ध्यानस्थ* बसून होते. माधवराव खंडेराव मोरे, त्याच्या कपाळावरची शीर मात्र तट्ट फुगली होती आणि ताड्ताड् उडत होती!

माझी बायको सौ. सिसोदियाना मदत करत होती. चहाचे पेले, कांदापोह्याच्या प्लेटी देत होती. मी दिवाणखान्याच्या दरवाजातून मागे फिरलो. अंगणातील नारळाच्या झाडापाशी आलो. डॉ. बळीराम हिरेकडील भोजनप्रसंगाची वर दिलेली साग्रसंगीत माहिती मला पुरवणारा कार्यकर्ता कुठं दिसत नव्हता. दरवाज्याबाहेर पोलिसाच्या *दोन वायरलेस जीप्स् पहाऱ्यावर उभ्या होत्या.*

साडेदहा–अकराच्या सुमारास शरद जोशी, माधवराव बोरस्ते, माधवराव खंडेराव मोरे दिवाणखान्यातून बाहेर पडले. इंडियन एक्सप्रेसच्या विनायक गोखलेंचा कॅमेरा क्लिक् करू लागला. वायरलेस् जीप्स् स्टार्ट झाल्या आणि आम्ही सगळे कोर्टाच्या दिशेनं निघालो. माझं मन अकारणच सुन्न झालं होतं. □

कथा

# अश्वत्थामा

दिलीप येलकीकर

'ह्या जंगलाच्या जवळपास वस्ती नाही, परंतु दूर उत्तरेच्या पायथ्याशी भिल्लांच्या टोळ्या वस्ती करून आहेत. सारं जंगल घनदाट झाडी–झुडपाचं आहे जंगली श्वापदांची भीती असल्यामुळं भिल्लही इकडं जास्त फिरकत नाहीत. जंगलाच्या मध्यात एक वर्तुळाकार माळ वसलेला आहे. तिथंच जायचंय आपणाला.

'एवढं अंतर तोडून आलोत आपण. खरं म्हटलं तर मी दमले आहे अवी ! परंतु तुला केव्हा तिथं घेऊन जाईन अन् तुझ्या वडिलाचं अपूर्ण कार्य तुझ्यावर सोपवून निर्वाणीची तयारी करीन असं झालं होतं मला. आपल्या घरात चालत आलेलं कलेच्या सेवेचं पवित्र व्रत पालन करण्याकरिता तू समर्थ आहेस आणि परिस्थिती सुद्धा अनुकूल आहे. अंगी योग्यता असली तरी ती कृतीतून प्रकट करून शोभिवत करावी लागते, या तत्त्वाचे तुझे वडील समर्थक होते. म्हणूनच एका मोठ्या कार्याच्या पूर्ततेचं आव्हान त्यांनी स्वीकारलं होतं. तुझ्या अंगी ते गुण आहेत. त्या गुणाची पारख त्याच्यासारख्या दैवीशक्तिसंपन्न शिल्पकाराच्या सहवासामुळं करता येणं शक्य आहे मला. बालपणीच आमचं लग्न झालं तेव्हापासून मी त्याच्या सहवासात आले; परंतु काळाला आमचा शेवटपर्यंतचा सहवास अमान्य झाला आणि ते गेले तीन जीवाना निराधार करून ! प्रवीरही कोठे तरी परागंदा झाला वाटते, तो परत येईल.

'आता मला धाप लागली आहे अवी ! पायाला गोळे येताहेत. चढणं किती अवघड आहे; परंतु एवढी चढण संपली की, ह्या टेकडीवरून तो वर्तुळाकार राग दिसते ना. ही टेकडी त्या वर्तुळाचा एक भाग नाही, परंतु ती आपणाला एकदम मध्यात नेऊन सोडते. वाट आपणालाच काढावी लागेल. कारण इकडं कुणी फिरकतच नाही. तुझ्या बाबांना त्यांची कला समूर्त करायची होती. म्हणूनच ते कातळ शोधीत राहिले आणि अशा दुर्गम ठिकाणी तो त्याच्या दृष्टीस आला, तेव्हा ते घरी आले व मला सांगू लागले, 'अश्विनी, मी समाधान पावलो. मला अगदी हवा तसाच कातळ सापडला आहे आणि आता लवकर कामाला लागलं पाहिजे बरं का ! किती स्वच्छ व रम्य निसर्ग विसावला आहे तिथं ! त्याचं सौंदर्य टिपून घ्यायचे डोहाळे होतात डोळ्याना ! विविध वृक्षानी गजबजून टाकलेला तो भाग ! त्या विविधतेतच स्वत:ला हरवून जातो माणूस. डोंगराची मांडणी सुद्धा अनुरूपच आहे कार्याला आणि ती रचनाही त्या सुंदरतेचं एक वैशिष्ट्यच वाटतं पाहणाराला. मध्यभागी खळखळणारी एक झरी गुजगोष्टी करते त्याच्याशी. पाण्याची सोय आहेच. प्रथम लेण्यांचा आकार कोरून विवरं करून ठेवायची. सभामंडपात पुरेसा प्रकाश राहील; परंतु गाभाऱ्यात अंधार असेल. तिथं अशा अंधारात मूर्ती कशा कोरायच्या व कला-कुसरीचा हात कसा फिरवायचा माहीत आहे का ? सभामंडपाच्या तळाशी सर्पूर्ण तळ झाकेल असं पाणी टाकायचं सूर्य पूर्वेला असतो तेव्हा पश्चिमी लेण्यामध्ये, सायंकाळी पूर्व लेण्यामध्ये व दक्षिणायनात उत्तर लेण्यामध्ये व उत्तरायणात दक्षिणी लेण्यामध्ये अंधारे कोपरे मंडपात टाकलेल्या पाण्यावरून परावर्तित होणाऱ्या प्रकाशकिरणांमुळे उजळून निघतील आणि त्या प्रकाशात मूर्ती आकार घेऊ लागतील. अनुपम सौंदर्याचं लेणं लेतील. तो अवाढव्य कातळ कोरून काढीन, हा हा म्हणता इतिहास कोरून काढीन त्यावर व त्याला आयुष्यमान करीन, तेव्हा सारं जंगल दुमदुमून निघेल छिन्नी-हातोड्याच्या आवाजानं ! तसं आव्हान केलंय मी त्या कातळाला आणि त्यानंही ते माझ्याच शब्दानं स्वीकारलं. शब्दा न् शब्दाचा प्रतिसाद ऐकलाय मी त्याच्या तोंडून. आजपर्यंत सुप्त असलेला माझा कलाकार जागृत केला आहे, विस्तृत केला आहे त्यानं.. त्याच लावण्यमय रूप दाखवून देईन जगाला देवादिकानीही तोंडात बोट घालावं असं चैतन्य निर्माण करीन त्या धोंड्यात ! तेव्हा प्रत्यक्ष कैलासराणा पार्वतीसह अवतरला तिथं, तर त्यालाही संभ्रम पडेल की, आपल्या सोबत आलेली पार्वती उजव्या कोपऱ्यात दिवास्वप्न बघत असलेली, का शृंगारात तल्लीन असलेली, का समोर आपणाला हसत उभी असलेली ? तेव्हा तो पार्वतीच्या प्रत्येक मूर्तीला चाचपून बघेल आणि पार्वतीलाही विनोदाची लहर येईल त्या वेळेस ती लपून राहील. कैलासपती पार्वतीला हाक मारील तेव्हा ती त्या हाकेला 'ओ' देईल आणि तो 'ओ' प्रत्येक पार्वतीच्या तोंडून निनादत राहील हजार वेळा...' हो ! माझ्या मनगटात सामर्थ्य आहे तेवढं आणि तो त्याच शिवाचा आशीर्वाद. त्या जगज्जेत्याच्या कृपेनं पूर्ण करीन ते कार्य ! त्यासाठी सर्वस्व त्यागाचाही संकल्प केलाय मी.'

'चालुक्य राजानी तीस वर्षांपूर्वी ह्या लेणीच्या उत्खननाला सुरुवात करण्यापूर्वी, विनायकाची स्थापना तुपाचा अभिषेक करून केली आणि अमाप पैसा व मनुष्यबळ यांचा पुरवठा करून तुझ्या वडिलाच्या नेतृत्वाखाली कार्य पूर्ण करण्याचा संकल्प केला. त्या वेळेस त्यांनी तुझ्या वडिलावर सोपवलेल्या जबाबदारीची जाणीव करून दिली. ते म्हणाले होते, 'महाराज ! आपल्या संकल्पसिद्धीसाठी अंगातील थेंब-थेंब आटवीन. ह्या पाथरवटावर, त्याच्या दणकट मनगटावर विश्वास मात्र असू द्या ! पैशापैशाचं चीज मूर्तिमंत होईल तुम्ही ही फुलं श्रीच्या चरणी अर्पण केली आहेत, तद्वतच मी माझं जीवनही माझ्या कलासमाधीतील मूर्तींना अर्पण केलं आहे देवाच्या मूर्तीला शोभिवंत करणारी ही फुलं मूर्तीच्या चरणावर वाहिल्यानं सार्थक पावतात, तसंच एका शिल्पकाराचं जीवनही शिल्पाला आकार देतादेताच सार्थक पावतं. तुमचा विश्वास आणि श्रीचा आशीर्वाद हवाय मला. माझी श्रद्धा दृढ आहे !'

'चालुक्याच्या राज्यात पृथ्वीचा अलंकार व विश्वेश्वराचा आशीर्वाद प्राप्त असलेल्या त्या तेजस्वी शिल्पकाराच्या मार्गदर्शनाखाली हळूहळू शिल्प साकार होऊ लागलं. काळ्या कातळावर चंदनाच्या रेघानी आखून दिलेला भाग खोदला जाऊ लागला कोरून ठेवलेले द्वारपाल, हत्ती, घोडे, दीपमाळ जणु मुक्त होऊ लागले.

'बघ, बोलता बोलता आपण लेणीच्या तोंडावरच आलो. लेणीची कमान किती भव्य आहे! हे भव्यपण वैभवाचं प्रतीकच वाटतं. ह्या कोरलेल्या मूर्ती कशा सजीव वाटतात प्रत्येक मूर्तीचं आगळं, वेगळं वैशिष्टच. कौरव-पाडवयुद्ध बघ, अर्जुनाचं सारथ्य करणारा श्रीकृष्ण बघ महाभारतातील प्रत्येक पात्र जबरदस्त आहे. प्रत्येक पात्र सामर्थ्यवान आहे आणि त्या सामर्थ्याचं प्रदर्शन करणाऱ्या मूर्ती कोठेही कमी पडत नाहीत. चक्रव्यूहात गोवलेला अभिमन्यू बघ. चक्रव्यूहाची रचना त्याना सापडत नव्हती. एखादी गोष्ट चितारायची म्हणजे त्याची वास्तविकता शोधून काढण्याचा प्रयत्न ते करीत, त्यासाठी भरपूर कष्ट घेत. चक्रव्यूहाची रचना मिळवण्यासाठी त्यांनी बरेच कष्ट घेतले होते. अभिमन्यूच्या शरीराची घडण बघ. त्याच्या डोळ्यांतील ईर्षा किती जिवंत वाटते! शौर्याला ती आव्हान करते. नाजूक भावनानाही असंच जपून चितारलं आहे. ती रूपसुंदरी तिलोत्तमा, प्रणयपीडित रती, हट्टाला पेटलेली पार्वती, स्वयंवरसिद्ध सीता बघ. तिची नजर खाली आहे. रामाकडे बघण्यासही संकोचत आहे; परंतु श्रीरामचंद्राचं सावळं मंगल रूप तिनं आपल्या डोळ्याच्या पापणीत जपून ठेवलं आहे.

'काळाचे पडदे एकानंतर एक पडत राहतात. सत्य-असत्याच्या शिवाशिवीचा खेळ चालू असतो. जेव्हा असत्य सत्याची गळचेपी करतं, तेव्हा परमेश्वर अवतार घेतो. त्याला कार्य करावं लागतं आणि ते कार्य समाजातील प्रत्येक स्तरावर परिणाम घडवतं. तो अवतार मानवाची संस्कृती, आचार, विचार, राहणीमान, नैतिक मूल्ये, श्रद्धा ह्या साऱ्या गोष्टीवर प्रभाव टाकून त्याना उजळा देतो. त्यासाठी त्याला इतिहास घडवावा लागतो. अशा पुण्यमय घटनाच्या स्मरणाकरिता प्रतिकृती करून त्याना आयुष्यमान करणं म्हणजे पुण्यकृत्य असं ते समजत. असे प्रसंग आदर्श शिकवणीचं बीज पेरतात, ह्या शिकवणीची भविष्यकाळाला गरज असते. हे शिल्पकलेच्या माध्यमातून शक्य होते, म्हणूनच शिल्पकलेला ते श्रेष्ठ कला समजत.

'त्यांच्या ह्या साऱ्या मूर्ती म्हणजे महान शिल्पकलेचा आविष्कार आहे; परंतु ही पहिली-वहिली लेणी शेवटचीच लेणी ठरली आणि तीही अपूर्ण! यापैकी कोणत्याच मूर्तीवर त्यानी शेवटचा व समाधानाचा नाजूक हात फिरवलेला नाही. कारण नियतीला ते मान्य नव्हत. चालुक्य राजाला पडती कळा लागली. युद्ध-लढाया होऊ लागल्या, पैसा कमी पडू लागला. मनुष्यबळही घटलं. राजाचं दुर्लक्ष झालं आणि ह्या कार्याला विराम मिळाला; परंतु अशा पडत्या काळातही त्यानी घेतलेल्या व्रतात खंड पडू दिला नाही. ते एकटच काम करू लागले आणि त्याचा परिणाम म्हणून ही परीक्षिताची–उत्तरेच्या गर्भाची मूर्ती पूर्ण झाली. अश्वत्थाम्यानं दुष्ट बुद्धीन पाडववंशाचा निःपात करण्याच्या हेतूनं त्या गर्भावर ब्रह्मास्त्र सोडलं. ते दिव्य अस्त्र फक्त फिरत राहिलं त्या गर्भाभोवती. कारण ते श्रीकृष्णाच ध्यान करीत होतं. त्याच्या तपस्येमुळं त्या अस्त्राचं तेज लोप पावलं आणि गर्भाला ते स्पर्शसुद्धा करू शकलं नाही. केवढी शक्ती असते ईश्वराच्या आराधनेत! श्रीकृष्णाचं अशा कठीण प्रसंगीही मंगल स्मरण करीत असलेल्या निष्पाप व पुण्यमय गर्भाची मूर्ती मात्र पूर्ण झाली; परंतु ही अखंड कलाकृती पूर्ण होऊ शकली नाही. कारण त्याना अश्वत्थाम्याची मूर्ती कोरायची होती. त्यासाठी त्याना त्याचे जिवत रूप एखाद्या माणसात बघून प्रतीत करायचे होते. ते त्याच्या कलासमाधीतील अश्वत्थाम्याचं जिवत रूप माणसात शोधू लागले; परंतु चेहरा सापडत नव्हता आणि दहकत्या वास्तवतेच्या चित्रणाचं कार्य तसच राहून गेलं; परंतु त्यासाठी त्यांनी घाई केली नाही.

'ती कलाकृती पूर्ण करायच काळालाही मान्य नव्हतं. ते काळाला प्रिय झाले! त्यावेळेस तू अंकुरत होतास. तुला त्यानी बघितले असते तर आणखी एखाद्या कलाकृतीचा त्याना साक्षात्कार झाला असता. प्रवीरचा जन्म झाला तेव्हा त्याना असाच साक्षात्कार झाला होता. तो प्रसंग मला अजूनही आठवतो. ऊन रणरणत होत. पृथ्वीचा दाह आकाशाला भिडू पहात होता. अशा वेळी आम्ही दोघं वाट तुडवीत होतो. मी थकले होते. विश्रांत्यासाठी म्हणून एका निष्पर्ण झाडाच्या सावलीत आम्ही बसलो. मला कळा येऊ लागल्या वेदना असह्य होत गेल्या आणि मी प्रसूत झाले प्रवीरचा जन्म झाला. प्रथम ते रडलं आणि नंतर डोळे मिटून शात पडून राहिलं. त्याच्याकडे ते बघत राहिले. त्याच्या डोळ्यात विशिष्ट चमक मला दिसली. प्रवीरवरील नजर न हटवता ते म्हणाले, 'अशा आगीत रणरणत्या उन्हातही हे बाळ कसं डोळे मिटून शात पडलं आहे! मासाच्या ह्या लालचुटुक गोळ्याला जीवघेण्या वातावरणाची दखलही नाही. मूर्तिमत सौन्दर्य आपल्या पदरात पडलं आहे. दैवी अंशाचा साक्षात्कार मी बघत आहे. बघ, ते ईश्वराच्या चिंतनातच तल्लीन जणू! कौरव-पांडवाचं महायुद्ध चालू असताना असाच उत्तरेचा गर्भ परीक्षिती तिच्या उदरात पक्व होत होता. त्या गर्भावर अश्वत्थाम्यानं ब्रह्मास्त्र सोडलं होतं, पाडवाचा वंश नष्ट करण्याच्या हेतूनं, परतु ते दिव्य अस्त्रदेखील श्रीकृष्णाचं मंगल स्मरण करीत असलेल्या त्या गर्भाला स्पर्शसुद्धा करू शकलं नाही. ते अस्त्र त्या गर्भाभोवती फिरत राहिल. त्याची शक्तीही लोप पावली त्या गर्भाच्या दारुण तपस्येपुढं!'

'महान तत्त्वज्ञान व अध्यात्म यांच्या संयोगाने आपला इतिहास घडून गेला आहे. प्रवीरचं ते रूप डोळ्यापुढ ठेवून परीक्षिताची मूर्ती त्यानी कोरली; परंतु ही अखंड कलाकृती अपूर्ण राहून गेली. कारण अश्वत्थाम्याची मूर्ती कोरायची राहिलेली आहे अजून. ते काम तुला करायचे आहे!'

'होय आई, मी माझ्या परीने प्रयत्न करीन!'

¤

'जवळजवळ दोन वर्षं उलटून गेली आहेत त्या गोष्टीला, नाही का? तू मला इथं आणलंस, ही कामगिरी माझ्यावर सोपविलीस. परंतु आई, मी साशंकच होतो ह्या कामाबद्दल. तरीही मी माझ्या परीनं त्या अश्वत्थाम्याची मूर्ती एक का होईना कोरू शकलो. ही बघ ती मूर्ती. पांडवानी अश्वत्थाम्याच्या डोक्यातील दिव्य मणी काढून घेतल्यावर कसा भणंग होऊन प्रदक्षिणा घालतो आहे पृथ्वीला! त्याच्या यातना त्याच्या चेहऱ्यावर घोंगावत आहेत. त्याचं ते न संपणारं दुःख .. आणि तो स्वतःही न

संपणारा .. चिरंजीव ! टक्कापाणीचा खेळ खेळतो आहे... कधीही न संपणारा ! त्याच्या समोर सूर्य व पाठीमागं चंद्रकोर आहे. तो प्रथम सूर्याला टक्का विचारणार. नंतर संध्याकडे जाणार.संध्याला टक्का विचारणार. संध्याकडून रजनीकडं... रजनीकडून उषाकडं... उषाकडून पुन्हा प्रभाकरकडं... आठही दिशा भरलेल्या. कोणीही कोणता कोपरा सोडणार नाही आणि तो टक्का विचारत राहणार ! प्रभाकर त्याला खोऽ खोऽ हसून खिजवणार ! संध्या आणि उषा त्याला बघून हसून हसून लाल होणार !

'आई, अश्वत्थामा चिरंजीव आहे म्हणूनच मला वाटत गेलं की, त्याचं जिवंत रूप पृथ्वीच्या पाठीवर भटकत असणार आणि ते मला सापडलं. सेऊण देशाच्या सरहद्दीवर मी एक वेडा पाहिला. तो जिवंत अश्वत्थामा असल्याचा भास मला झाला. विश्वातील सर्व प्रकारच्या नरकयातना त्याच्या चेहऱ्यावर दिसल्या मला. त्याच्या अंगावर जखमांचं जाळंच होतं जणू ! डोक्यातही भली मोठी एक जखम होती. हजारो माशा घोंगावत होत्या त्या जखमेवर. यातनांनी त्रस्त होऊन तो आपल्याच अंगाचे ओरखडे काढीत होता. वेडंवाकडं ओरडत होता. बस्स ! मी ज्याच्या शोधात होतो तो मला सापडला होता. चार-पाच इसमांच्या सहाय्यानं मी त्याला पकडून इथं आणलं आणि ह्या खांबाला बांधलं. मी माझं कार्य सुरू केलं... ही मूर्ती तयार झाली.

'अरे, आई, तू अस्वस्थ दिसते आहेस. काय होतं आहे तुला ?'

'अवी, मला घरी येत आहे रे. पाणी... पाणी... दे प्यायला.... हा... वेडा कुठाय रे.....?'

'आई, तो पळून गेला एका रात्री ! नाही तर... मला आणखी.....'

'...आणखी काही नको अवी, बस्स... एवढेच पुरे आहे... तो वेडा कुठे आहे रे ? ...तो तुझाच थोरला भाऊ, पराग झालेला प्रवीर, ज्याच्या सौंदर्यात त्यांनी दैवी अंशाचा साक्षात्कार पाहिला आणि परीक्षिताची मूर्ती कोरली. तोच प्रवीर... माझं बाळ आहे रे ते ! ......'

☐

# पुस्तके

# निरोगी आठवणी

प्रा. चंद्रशेखर राजे

**'चरित्र-आत्मचरित्र या लेखनाला ललित वाङ्मयप्रकार मानू नये असे मला नेहमी वाटते'**

—डॉ. द. भि. कुलकर्णी

आपला बाप कारकुंडा होता, मास्तरडा होता म्हणून त्याच्या नावे लाखोली वाहणारे माझे मित्र 'आठवणींचे पक्षी' वाचल्यानंतर म्हणू लागले, 'अरे, आपले तीर्थरूप कारकून होते, शिक्षक होते हे किती बरे होते; त्यामुळे आपल्याला दोन वेळा निश्चितपणे खायला तरी मिळत होते !' जातपात न मानणाऱ्या काही मित्रांना हे पुस्तक वाचल्यानंतर 'आपण प्रल्हादाच्या जातीत जन्माला आलो नाही ही कोणाची कृपा ? असा प्रश्न पडला.' त्यावर एकाची मल्लीनाथी 'अरे, तुम्ही सुखाने चार घास खात होता तेव्हा प्रल्हादासारख्यांची आठवण तुम्हाला नव्हती, तुमची जातच प्रल्हादासारख्यांचा हजारो वर्षे छळ करण्यात आनंद मानीत होती. त्याचे काही तरी प्रायश्चित्त घ्याल की नाही ?' 'आठवणींचे पक्षी' प्रसिद्ध झाल्यानंतर ऐकायला मिळालेले असे अनेक उद्गार आणि मी वाचल्यानंतर माझ्या मनात निर्माण झालेले वादळ यांना शब्दबद्ध करण्याचा हा प्रयत्न.

'दलित साहित्य हेच खरे ललित साहित्य', दलित-साहित्याला टीकेच्या परंपरागत निकषांवर पारखू नका' असे वेगवेगळे विचार वाचण्यात आणि ऐकण्यात आले. 'दलित साहित्य हे आक्रोश साहित्य आहे' असेही काही जणांनी सुनविले. साहित्यगुणांपेक्षा आक्रोशालाच जास्त महत्त्व दिले गेले आहे असेही त्यांना त्यातून सूचित करावयाचे असावे बहुधा. मला त्यातला आक्रोश ऐकू येतो, त्यांच्या व्यथा, वेदना जाणवतात, त्याचप्रमाणे त्यातील कलागुणही भावतात. माझी तक्रार वेगळीच आहे. हा आक्रोश ज्यांच्यापर्यंत पोहोचला पाहिजे, त्यांच्यापर्यंत तो पोहोचतच नाही. कारण ते ना काव्य वाचत, ना कथा-कादंबरी वाचत. मग आत्मचरित्रांचे तर नावच काढायला नको ! हजारो वर्षे जे मूक होते, मूकपणाने सारे अन्याय, अपमान सहन करीत होते ते आता कोठे बोलू (आणि लिहू) लागले आहेत. त्यांना मनसोक्त बोलू द्या, लिहू द्या ! वाङ्मयाचा समाजावर परिणाम होतो का ? तो परिणाम कसा, किती आणि केव्हा होतो हे मोजता येत नसले तरी या तळमळीच्या बोलाचा परिणाम सर्वांवर ( झोपेचे सोंग घेतलेले वगळता ) आज ना उद्या होईल यात शंकाच नाही. वरच्या वर्गातील आणि जातीतील वाचक या साऱ्या वाङ्मयनिर्मितीकडे कोणत्या नजरेने पाहतो, त्याला त्यातले नेमके काय आवडते, त्याच्यावर नेमका परिणाम कोणता होतो हे समजणे आणि सांगणे तसे एकंदरीत कठीणच. दलित लेखकांनी लिहिलेली कोणती पुस्तके गाजतात, वाजतात, वाचली जातात, चर्चिली जातात हे पाहिले म्हणजे थोडाबहुत अंदाज येईल. नामदेव ढसाळ यांचा 'गोलपीठा' हा काव्यसंग्रह घरात ठेवण्याची, तो वाचला

आहे हे सागण्याची हिंमतच (?) काही जणाना होत नाही. त्यातील अवतरणे (लेखनातून वा भाषणातून) देणे हे तर फार दूर राहिले; पण दया पवाराच्या 'बलुतं'वर मात्र सारे जण लट्टू होतात असे का? दया पवारानीच एकदा तक्रार केली की, ज्या आशयाकडे वाचकानी लक्ष द्यावे अशी माझी इच्छा आहे त्याकडे, जे जीवन त्यानी विचारात घ्यावे असे वाटते त्याकडे अनेकाचे दुर्लक्ष झाले आणि त्या मानाने गौण अशा प्रसगाचा, अनुभवाचा आणि व्यक्तीचा मोह अनेकाना झाला. त्याचीच चर्चा झाली, माझ्याकडे विचारणाही झाली. हे असे का व्हावे? त्यामुळे वाचकाच्या अभिरुचीचा प्रश्न उभा राहतो की, त्याची एकूण जीवनदृष्टीच त्यामुळे लक्षात येते हे सागणे कठीण आहे. सहज आठवले म्हणून सागतो. विजय तेंडुलकराचे 'शातता! कोर्ट चालू आहे!' आणि रत्नाकर मतकरी याचे 'निखारे' ही दोन्ही नाटके जवळजवळ एकाच वेळेला रंगभूमीवर आली; पण गाजले मात्र तेंडुलकराचे नाटक! मतकरीचे नाटक रूपातरित होते म्हणून असे झाले की साऱ्याना आवडेल असा मालमसाला 'शांतता'मध्ये होता म्हणून ते गाजले, कोण सागणार?

दया पवाराचे 'बलुत', माधव कोडविलकराचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' याच्या तुलनेने प्र. ई सोनकावळे याचे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मपर लेखाचे, (एकूण १५ लेख) आठवणीचे पुस्तक मात्र त्या मानाने उपेक्षित राहिले. प्रल्हादाचे जीवन म्हणजे एकूण मराठी (आणि भारतीय) समाजजीवनाचे बोलके चित्र उभे करणारे आहे. ज्या जातीत तो जन्माला आला ती जात म्हणजे स्पृश्य समाजाच्या दृष्टीने गरजेसाठी आवश्यक आणि हक्काचे देण्यासाठी अनावश्यक अशी आहे. आर्थिक दुर्बलता हा काही त्याच्या जीवनाचा खेळखंडोबा करणारा प्रधान प्रश्न नाही. तो दरिद्री का? तर त्याला त्याची जात जबाबदार! त्याची जात आणि त्याचे दारिद्र्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत बिंब-प्रतिबिंबासारखे हे आहे. तो ज्या जातीत जन्माला आला ती जात हा त्याच्या दृष्टीने फार मोठा गुन्हा होता. त्याची आर्थिक दुर्बलता, परवशता, परावलबित्व आणि जात याचे भयानक असे मिश्रण झाले आहे. अस्पृश्याच्या जातीत जन्माला येऊन त्याला भूकही लागते हा तर केवढा मोठा अपराध होता त्याचा! अशा या कैचीत सापडलेल्या प्रल्हादाचे जीवन 'आठवणीचे पक्षी' मध्ये आले आहे. हे सारे लेख वाचल्यानंतर सतत मनात असे येते की, हा प्रल्हाद नावाचा मुलगा त्या वेळेस एव्हढा शात कसा राहिला? तो चवताळून उठला कसा नाही? त्याने जगाचा राग राग का केला नाही? याउलट पोट भरलेले असो वा नसो, नेसूला धडके असो वा नसो, त्याने ध्यास घेतला तो शिक्षणाचा. अगदी थंडपणाने, शातपणाने एकेक आठवणी तो आपल्याला सागत जातो. हा थडपणा आपल्या साऱ्याच्याच मनाचा आणि जीवनाचा स्थायीभाव आहे की अशी सारी संकटे, अशा प्रकारचे जीवन हे आपल्या बाबतीत अटळ आहे, अपरिहार्य आहे असे समजून त्याने या आठवणी सागितल्या की, प्राध्यापक कॉलेजचे शिक्षण घेताना, घेतल्यानंतर, प्राध्यापक झाल्यानंतर ह्या आठवणी लिहिल्यामुळे ही योग्याची तटस्थता (की कलावंताची अलिप्तता? की या दोन्ही अवस्था एकच?) त्याला आली. हे असे लिहिणे फार फार कठीण आहे हे ज्याने लिहिले त्याचे, त्याच्या मनाचे, लेखणीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे

आत्मचरित्र, आत्मपररचना, आत्मचरित्रसदृश रचना, आठवणी इ. बद्दल, त्याच्या निकषाबद्दल खूप लिहिले गेले आहे. बोलले गेलेले आहे. आत्मचरित्रलेखन हीच मुळात कला आहे की नाही असाही प्रश्न उपस्थित केला गेला आहे. चरित्रे–आत्मचरित्रे कला म्हणून, कलात्मकतेचे निकष लावण्यासाठी म्हणून गौण प्रकारची आहेत. त्याचा फारसा गभीरपणे विचार कोणीही करू नये असेही म्हटले जाते. चरित्र-आत्मचरित्र वाङ्मयप्रकार केवळ समाजशास्त्राच्या दृष्टीने, इतिहास म्हणून गतकालीन व्यक्तिजीवन आणि समाजजीवन समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यात कला शोधू नका असेही कोणी कोणी सागतो. व्यक्ती समजून घेण्याच्या दृष्टीने आत्मचरित्रासारखा दुसरा वाङ्मयप्रकार नाही असेही ऐकतो. त्यातले खरे काय आणि खोटे काय हे त्या त्या टीकाकाराना, साहित्यशास्त्रज्ञाना ठावे. आपली भूमिका रसिक वाचकाची, आस्वादकाची असली म्हणजे पुरे आहे असे मला वाटते. मला शक्यतो सारे काही जाणून घ्यायचे आहे. माझ्या भोवतालची माणसे (कालची, आजची आणि जमले तर उद्याचीही) समजून घ्यायची आहेत. त्याचे जीवन कसे असते, ते तसेच का असते इ. सारे काही मला कळावे असे वाटते. एकेक माणूस म्हणजे असंख्य परस्परविरोधी अनुभवाची खाण आहे. त्याचे मन म्हणजे थाग न लागणारी गुहा आहे. समजातील वेगवेगळया थरातील, जातीजमातीतील माणसे जेव्हा मोकळेपणाने बोलू लागतील, लिहू लागतील तेव्हा समाजमन कळेल, वाङ्मय समृद्ध होईल, जीवन अधिक मोकळे होईल, शुद्ध होईल, अधिक चागल्या तऱ्हेने जगण्यालायक होईल. जगताना चोरट्यासारखे होणार नाही. हा फायदा तरी काय कमी मानायचा काय?

या आठवणी 'मी' (प्रल्हाद) सागत असला तरी त्यातून 'मी' पण डोकावत नाही. अहं विशेष ही भूमिका नाही. वास्तविक प्रौढपणी लिहिलेल्या, लिहिताना, स्मरताना बालपणीच्या आठवणी स्पष्टपणे आठवत नाहीत. त्या पुसट होत जातात, होण्याची शक्यता असते. त्या मानाने अगदी नजीकच्या भूतकाळातील आठवणी ह्या स्पष्टपणे, ठळकपणे आठवत असतात, पण प्रल्हादाने आपल्या कॉलेजनतरच्या-तसे म्हटले तर हायस्कूलनतरच्याच– विवाह होऊन जीवनात स्थिर होण्यापर्यंतच्या काळातील आठवणी अगदी त्रोटकपणे लिहिल्या आहेत. प्रल्हादने सारा जीवनप्रवासच सुसंगतपणे, साऱ्या तपशिलानिशी लिहावयास हवा; पण फक्त आठवणीच सागावयाच्या अशी मर्यादाच त्याने घालून घेतली आहे. त्यामुळे चुटपुट लागते, हे पक्षी खाद्यावर स्थिरावले पाहिजेत, त्यांना समग्रपणे समजून घेतले पाहिजे असे वाटत राहते. लेखकाने ही मर्यादा स्वत वर का घालून घेतली?

ऐन तारुण्यात आल्यानंतर शरीराची, मनाची आणि भूतकालीन अनुभवाची सागड कशी घातली? त्याने घेतलेले हे सारे अनुभव वरवरचे, कातडीवरच आघात करणारे नव्हते. ते घाव अगदी जिव्हारी लागले होते. त्यानी त्याच्या रक्ताचाच कबजा घेतला होता. त्याच्या अतर्बाह्य अस्तित्वावरच त्या अनु-

भवानी परिणाम केला होता तो वयाने मोठा झाल्यानतर, आपली कर्तबगारी सिद्ध केल्यानतर तो हे सारे अनुभव (सडलेला कुत्रा टाकण्याचे काम, ते झाल्यानंतरही भाकरी न मिळणे, भाकरी खाण्यासाठी संडासाचा आश्रय, आपल्याला झालेली खरूज इत्यादि) टाळत नाही वा त्याचे भाडवलही करीत नाही. आपल्या हृदयाला कोवळया वयात झालेल्या अवहेलनेच्या, तुच्छतेच्या जखमा उघडया करून दाखवीत नाही. आपल्या वाचकाची सहानुभूती मिळावी, त्यानी दयार्द्रदृष्टीने आपल्याकडे बघावे हा हेतूच त्याचा नाही. निर्हेतुक लेखन हा हेतू असल्यामुळे ते सारे प्रभावी झाले आहे हे सारे ज्याने अनुभवले तो कोणी दुसराच होता, इतक्या अलिप्तपणे तो हे सारे सागतो, आठवतो. जरा प्रतिकूल परिस्थिती असली आणि त्या परिस्थितीवर मात करून एखाद्याने काही मिळविले की तो तुरा उभा करून आरवणाऱ्या कोंबडयाच्या ऐटीत ते सागत सुटतो. पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोरासारखा नाचतो आणि नको त्याचे दर्शन होते. ते दर्शन आठवणीना किंवा आत्मचरित्राला मारक ठरते. अगदी कलाकृती म्हणून जरी विचार केला नाही तरी ज्या सभ्यतेच्या, सुसंस्कृतपणाच्या मर्यादा पाळतो त्याही तो पाळताना दिसत नाही इतके 'मी' पणाचे उबगवाणे दर्शन तो घडवितो प्रल्हादने सारे लक्ष 'मी' कडे दिले असले तरी तो 'I' specialist नाही. त्याने आपल्या समाजाचे, जातीचे चित्रण करण्याचे ठरविले नाही तरी 'मी'च्या सदर्भात जे जे येईल ते ते तो टाळत मात्र नाही. व्यक्तीच्या संदर्भात समाज असा प्रकार आहे. त्याच्या परिस्थितीवरून समाजाचे समग्र दर्शन जरी घडले नाही तरी जे काही दिसते ते पुरेसे बोलके, प्रातिनिधिक आहे.

त्या काळचा मराठवाडा, त्याहीपेक्षा त्या मराठवाडयातील दलित समाज कसा असेल याची दाहक कल्पना येते अनेक वेळा आपल्या असे लक्षात येते की, आपल्यातच अनेक 'मी' दडले आहेत त्या साऱ्याचे समग्र दर्शन आपल्याला कोठे घडते ? तसेच आपण ज्या समाजात राहतो त्या समाजातील साऱ्या थराचे, गटाचे; विविधतेचे दर्शन आपल्याला कोठे घडते ? आपण समाजात राहतो एवढेच. झापड लावलेल्या घाण्याच्या बैलासारखी आपली अवस्था. दलित समाजातील प्रत्येक व्यक्तीला सवर्णांमुळे, ऐतखाऊंमुळे अपमान आणि तुच्छता, दारिद्रय आणि भूक याचे तडाखे सहन करावे लागतात. या साऱ्यांची एकमेकाशी वागणूक तरी एकोप्याची, मिळूनमिसळून राहण्याची आहे का ? एकमेकाला समजून घेऊन, साभाळून घेऊन राहण्याची आहे का ? तशी ती नाही याचे विदारक दर्शन घडते. जेव्हा एकाच, समान अशा सकटात सारा समाज सापडतो तेव्हा त्या प्रत्येकाने एकमेकाच्या मदतीने ते सकट दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्या दु खातून सुख मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे; पण इथे दिसते ते वेगळेच ! जो तो आपल्याच नादात, तालात, सुखात वा दु.खात चूर ! कोणी कोणाची पर्वा करताना दिसत नाही. प्रल्हादच्या सख्ख्या बहिणी, त्याचे पती याचे वर्तन पाहिले, प्रल्हादशी वागणूक पाहिली की मी काय म्हणतो ते लक्षात येईल. त्यातल्या त्यात आक्काचाच आसरा त्याला मिळतो; पण तीसुद्धा परावलंबी आहे. आतडं तुटत असलं तरी नवऱ्यामुळे भाव.कडे लक्ष द्यायलाच जमत नाही तिला. ज्यांना प्रल्हादची कणव येते ती सारी दुबळी आहेत, परावलंबी आहेत. हे परावलंबन आणि त्यामुळे येणारी अगतिकता, दुःख हे ज्याप्रमाणे वर्णभेदामुळे घडते तसेच त्याला पुरुषप्रधान रचनाही कारणीभूत आहे. ह्या पुरुषीवर्चस्वापासून ना सवर्ण स्त्रिया सुटल्या ना दलित स्त्रिया सुटल्या. पुरुषांचा ऐतखाऊपणा, दादागिरी, स्वतःपुरतेच पाहणे, स्वत च्याच भाकरीवर कोरडयास ओतणे (पोळीवर तूप हा प्रकार इथे कसा बरे असेल ?) असा हा सारा मामला आहे. या साऱ्या गोष्टीना इच्छा असो वा नसो, ताकद असो वा नसो, प्रल्हाद तोड देतो. शिक्षण घ्यायचेच असा पण करून एकेक दिवस ढकलतो. भुकेची चैन करता येत नाही. 'आघोळ म्हणजे मजा', अंगावर धडके कपडे असणे हा अपवाद; पण खरूज वा तत्सम चर्मरोग मात्र बिरुदासारखे सहन करावे लागतात. काविळीपासून अनेक रोगाच्या तडाख्यात सापडतो त्यातून कसावसा बाहेर पडतो काविळीसारखा रोग आणि वसतिगृहातील जेवण म्हणजे मृत्यूलाच आमंत्रण. हा सारा प्रसग त्याने त्या मानाने जरा अधिक विस्ताराने सागितला आहे. सारे शरीर किती टणक झाले होते याचा तर पुरावा देत नाही ना ? या साऱ्या मानसिक कोडमाऱ्यातून आणि शारीरिक आपत्तीतून तो बाहेर येतो त्याची कहाणी म्हणजेच 'आठवणीचे पक्षी.' या आठवणीतून काय सागायचे, काय निवडायचे, काय वगळायचे ? वाचकांनी प्रत्यक्ष वाचल्याशिवाय तो दाहक अनुभव ते समजू शकणार नाहीत. अशा प्रसंगी त्यातून काही नमुन्यादाखल निवडणे केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे. त्याच्या दोन्ही पायात ५१ काटे होते हे त्याला मॅट्रिक झाल्यानंतर कळले. पायाची कातडी एवढी निब्बर झाली होती की, अशा गोष्टीकडे लक्ष द्यायला फुरसत नव्हती ! पायात काय घुसलंय याच्याकडे लक्ष देण्याऐवजी पोटात काय ढकलायचं याचीच विवंचना करण्यात ऐन उमदेची वर्षे गेली ! पायातले काटे निघाले (काढले) म्हणजे जणू काही त्याने साऱ्या प्रतिकूल, टोचणाऱ्या, बोचणाऱ्या वास्तवाला शिक्षणाच्या धारदार, तीक्ष्ण सुईने दूर केले. या आपत्तीनी कणखर झालेल्या पायानी आणि मनाने पुढील वाटचाल सुरू केली, करावी हा तर त्याचा अर्थ नाही ना ?

प्रल्हाद आपल्या वाटयाला आलेले आयुष्य निमूटपणे, तक्रार न करता, न रागावता, न वैतागता, कोणालाही शिव्याशाप न देता जगतो, भोगतो, सहन करतो. या साऱ्या आठवणी अशा सरळपणे येऊन आपल्याला भिडतात. तो फक्त एकाच ठिकाणी जरा वेगळा सूर धरतो. तो सागतो 'वडलाच्या बादसुद्धा हे मुसलमान लोक आम्हाला येवढा जीव लावतात हे बघून व तेही कुठलीच बादावाट न धरता. मग मला वाटते की, एकीकडे आम्ही ज्या गावात जन्मलो तिथे कशी वाईट वागणूक दिली जाते ? हे बघून कोणासही वाटेल की आमच्या गावचे वाणी व मरसंगीचे मुसलमान पाटील यात किती तफावत आहे म्हणून !' हिंदूपेक्षा मुसलमान बरे असे त्याला वाटते तो प्रसंग पुरेसा बोलका आहे प्रल्हादने ही अशी मल्लीनाथी करून तो का सागावा हे ध्यानात येत नाही.

'आठवणीचे पक्षी'चा आशय असा आहे. ती सारी कहाणी सलगपणे सागितली असती तर फार चागली झाले असते. फक्त वेगळे अनुभवसंपन्न आत्मचरित्र त्यातून

आकाराला आले असते या अनुभवांचे, आठवणीचे मोल आणि कस वादातीत आहे, ते सारे परिणामकारक झाले आहे त्याला त्याची बोलीभाषा, त्यातील शब्दकलाही कारणीभूत आहे. या अशा शैलीचा विचार केल्याशिवाय या आठवणीचा विचार पूर्ण होऊच शकत नाही. त्याची बोलीभाषा खास मराठवाड्यातील, तो ज्या समाजात जन्मला, वाढला त्या परिसराची आहे. ते अनुभव जसे अपरिचित आहेत तशी त्याची भाषाही फारशी परिचयाची नाही; पण तिची सवय झाली, परिचय झाला की ती आणि आपण याच्यातील दुरावा नाहीसा होतो. त्या भाषेची लकब, मोडणी, धाटणी लक्षात यावयास फारसा वेळ लागत नाही. त्याच्या तोडचे काही शब्द, वाक्प्रचार सांगण्याचा मोह टाळता येत नाही. तो 'लागलो' असे न म्हणता 'लालो' म्हणतो. 'म्हनग्या' (लहानग्या), 'मज्या' (माझ्या), 'आता' (आत्या), 'हुंट' (उट), 'नाफास' (नापास), 'मुगपाठ', 'सनाटून' इ. या साऱ्या आठवणी या अस्सल बोलीभाषेत सांगताना 'पर्यायाने' असा एखादाच खटकणारा (त्या भाषेशी विसगत म्हणून) शब्द येतो. त्याच्या भाषेवर हिंदी, उर्दूचा परिणाम होणे अगदी साहजिक आहे. कारण कितीही झाले तरी तो मुलूख दीर्घकाळ निजामराजवटीचा भाग होता. त्यामुळे 'शरीक होणे' 'टैलत' असे शब्द सहजपणे येतात. त्याच्या भाषेच्या लकबी, त्याने वापरलेले वाक्प्रयोग, त्याची उदाहरणे किती म्हणून द्यावीत? काही देतोच. 'मिरचू फिरचू', 'मुचूमुचू खायचो,' 'जुने-पाने जे जे देण्याचे तेच माझे लेण्याचे', 'लोक चैनीत तर मी बेचैनीत" 'लोक मजेत तर मी सजेत', 'खातूस आळगीला नि लोळतूस मळगीला', 'खातूस कणगीला व गांतूस इरल्याला,' 'कारण आपण सारं मानस दोन पारासारख्या पायावर उभे राहिलेल्या कणसासारखे,' 'भाकरीनं नसले तरी पाण्यानं भरून घेतलं पोट दुडुंब,' 'मजा जीव लिव्हण्यासाठी तुळतुळ तुटायचा' 'मी गुलामाचा गुलाम,' 'आतून हुंबरडा फोडायचो,' 'एक व्हती बाई. जरा आदर-काडी,' 'मजी शाळा, बिनपाण्याची तशीच वाळली असती,' 'हल्याची म्हणून हलाल,' या अशा भाषेने हे पक्षी आपल्या स्मरणात दीर्घकाळ वस्ती करून राहतात, राहतील यात शंकाच नाही. तो एके ठिकाणी म्हणतो, "मी एक 'सदा रोगी' होतो." पण या साऱ्या आठवणी निरोगी आहेत. □

---

फिनिक्स निवड

## Indira Gandhi

**In the Crucible of Leadership**
**Jaico Publishing House**

---

आधीच सांगून टाकतो, हे पुस्तक फिनिक्स-मध्ये आले आहे. खरं म्हणजे या पुस्तकाविषयी मी काही महिन्यांपूर्वी इलस्ट्रेटेड विकलीमध्ये व इतर नियतकालिकात बरेचसे वाचले होते. त्या वेळी Beacon Press, Boston याची या पुस्तकाची विदेशीच आवृत्ती विक्रीला उपलब्ध होती.

जेव्हा इंग्रजीतून चरित्रे विक्रीला येतात तेव्हा A definitive biography किंवा A Psychobiography असे पुष्कळशा चरित्रावर लिहिलेले असते. इतर पुस्तकावर सुद्धा विषयाप्रमाणे A blockbuster of a novel–Soon to be a major motion picture–Simply unput-downable वगैरे चावीछाप, मस्कायुक्त मजकूर असतो. आमच्याकडे एक वकीलसाहेब येतात, ते सारखे या मथळ्याविषयी गमतीने बोलत असतात.

श्रीमती इंदिरा गांधीची ही Psycho-biography आहे. श्रीमती गांधीवर इतकी पुस्तके लिहिली गेली आहेत की, कदाचित् ती सर्व त्यानाही एकदम आठवत नसतील ! पण त्यातली खास उल्लेखनीय अशी तीन–चारच आहेत. कीसन, भाटियाचे 'इंदिरा', झरीर मसानीचे 'इंदिरा गांधी : अ बायोग्राफी' (दोन्ही न्यूयॉर्कच्या प्रकाशकानी छापलेली) आणि उमा वासुदेवचे (हो, 'टू फेसेस'वाली) 'इंदिरा गाधी : रेव्होल्यूशन इन रीस्ट्रेंट' ही पुस्तके बरीच अभ्यासू आहेत. श्रीमती गांधींवर एकदा श्री. मराठे यानी 'माणूस' मध्ये लिहिलेला 'करिष्मा' नावाचा लाब लेख वाचल्याचे आठवते. मराठीमध्ये तो एक वेगळाच प्रकार वाटला.

श्रीमती गाधीचे हे चरित्र करासबाई चार वर्षे लिहीत होत्या ! त्यानी या विषयावर इतकी पुस्तके वाचली व इतक्या लोकाशी चर्चा केली आहे की, त्याच्या पुस्तकाला एक प्रकारची 'थ्री डायमेन्शनल रिॲलिटी' आली आहे अगदी अलिप्ततेने व प्रामाणिकपणे लेखिकेने आपली मते मांडली आहेत. प्रस्तावनेतच लेखिका कबूल करते की, इंदिरा गाधींशी लेखिका पुष्कळ बोलली, त्यांच्या बरोबर पुष्कळ हिंडली, फिरली; पण व्यक्तिगत स्तरावर ती त्यांच्याशी rapport प्रस्थापित करू शकली नाही. प्रस्तावनेत इंदिरा गाधीच्या लकबीविषयी, त्याच्या काळ्या केसामधील पाढऱ्या बटेविषयी, श्रीमती गाधीच्या डोळ्यातील दुःखी छटेविषयी व इतर अनेक बाबीविषयी लेखिका आपला तरल दृष्टिकोन माडते आणि अशीच तरल व डोळस दृष्टी पुस्तकाच्या शेवटपर्यंत आढळते.

या पुस्तकातले सर्वांत वाचनीय प्रकरण आहे ते शेवटचे. या तेवीस पानात लेखिकेने श्रीमती गाधी याची घेतलेली मुलाखत उद्धृत केली आहे. या मुलाखतीत एकूण सात तास चर्चा झाली होती.

एकदा 'करीष्मा'चे लेखक श्री. मराठे आमच्या ग्रथालयात आले असता असे म्हणाले होते की, श्री. संजय गाधी याचा छिन्न-विच्छिन्न देह पहाण्याचा अट्टाहास इंदिरा गांधीनी धरला होता. दिल्लीच्या जुडग्याविषयी व

इतर गोष्टीविषयीही बरेच वाचले होते पण डोस्टोव्हस्की एकदा म्हणाले होते की माणूस एकदम दिग्मूढ होतो त्या वेळेला बारीक-सारीक गोष्टीना महत्त्व देतो व इरॅशनल होतो म्हणून या छोटया छोटया गोष्टीवरून श्रीमती इंदिरा गाधीच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करणे चुकीचे होईल.

असे म्हणतात की, माणसाच्या खऱ्या आयुष्याचा ढोबळ आराखडा वयाच्या सहा-सात वर्षापर्यंत तयार होतो बऱ्याच सवयी व पुष्कळसे दृष्टिकोन या वयातच रुजले जातात. अर्थात् पुढे परिपक्वता व लवचिकपणामुळे यात थोडा-फार बदल होतो; पण आमूलाग्र बदल होत नाही, असे म्हणतात. आणि म्हणूनच बाहुल्याशी खेळणे, पित्याचा कारावास, आईचे आजारपण हे सर्व उरकले जाते. पाश्चात्य देशात तर कंपनीने निवडायच्या मॅनेजरच्या बायकोची पण मुलाखत घेतली जाते. मॅनेजरचे मानस कसं असेल ते त्याच्या भोवतालच्या परिस्थितीवरही अवलंबून असते म्हणून.

लेखिकेबरोबरच्या मुलाखतीत श्रीमती इंदिराबाई आणीबाणीचे धडपणे समर्थन करतात. या मुलाखतीत श्रीमती इंदिरा गाधी असे म्हणतात की, त्याच्या वडिलाची सर्वांत मोठी चूक ही की त्यानी सरकारच्या कारभाराची (administrative structure) रचनाच बदलली नाही; परंतु फाळणीनंतर देश इतका कमकुवत झाला होता की ( Status quo ) ( जैसे थे अवस्था ) ठेवणे भाग होते.

तुम्ही स्वत बरीच वर्षे खुर्चीवर असताना सरकारच्या कारभारात का बदल केला नाही, असा रोखठोक सवाल श्रीमती करासनी श्रीमती गाधीना केला. यावर श्रीमती गाधी उत्तरल्या की, आणीबाणीत त्यानी तसा प्रयत्न केला; पण त्यांच्या हाताखालचे लोक तेवढे द्रष्टे नव्हते. त्यामुळे हे काम फार अवघड होऊन बसले. श्रीमती गांधीनी चर्चिलच्या शब्दात सागितले की, लोकशाही ही फार नाजूक असते (Democracy is fragile) व कोणताही बदल करण्याच्या कार्यात लोकाशी नाते तुटेल इथवर मजल आली की थाबायला लागते.

या मुलाखतीत श्रीमती गाधी प्रामाणिकपणे असे कबूल करतात की, पाश्चात्य देशाच्या ढवळाढवळीमुळे त्याचा इलेक्शनमध्ये पराभव झाला, यात फारसे तथ्य नाही. त्याच्या प्रचारामुळे थोडासा फरक पडला, नाही असे नाही, असेही त्या बोलल्या. निवडणुकीमधले एक सत्य असे आहे की—

Elections are won by men and women chiefly because most people vote against somebody, rather than for somebody. (फ्रॅंकलीन डी ॲडॅम्स)

आपण परत खुर्चीवर आलात तर आणीबाणी परत येऊ नये यासाठी काय कराल असा प्रश्न श्रीमती करासनी श्रीमती गाधीना विचारला होता. यावर श्रीमती गांधीनी स्पष्टपणे सागितले की, मी परिस्थिती तेथपर्यंत खालावेल इतका वेळ जाऊच देणार नाही !

या मुलाखतीत श्रीमती करास यानी अनेक विषयांवर श्रीमती इदिरा गाधीना अनेक प्रश्न चिकाटीने व खोदून खोदून विचारले आहेत. यातले बरेच प्रश्न ऑरियाना फॅलासीसारखे वाटतात. श्रीमती ऑरियाना फॅलासी ही बाई मुलाखती घेण्यात जगभर प्रसिद्ध आहे हे सर्वांना माहीत आहेच.

मला या पुस्तकातील आणखी एक वाचनीय प्रकरण वाटले ते तिसरे. त्याचे लाबच्या लाब नाव–Authoritarian Versus Democratic Aspects of Indira Gandhi's Political Personality. या प्रकरणात नेहरू कुटुंबियाचे मनोविश्लेषण छान केले आहे. नेहरू–कमला नेहरू–सघर्ष, कमला–सासू–नणद-संघर्ष, नेहरू–मोतीलाल–सघर्ष या सर्वांचा इदिरा गाधीवर असर कसा झाला याचे विवेचन केले आहे. या पुस्तकात नेहरूंच्या पुस्तकातील काही उतारे उद्धृत केलेले आहेत. पुष्कळ दिवसानतर श्री नेहरूंचे ' लाउड थिंकिंग वाचावयास मिळाले. या प्रकरणात श्रीमती इरावती कर्वे. मनुष्यशास्त्रवेत्ता (anthropologist) याचा उल्लेख आहे. भारतीय सस्कृतीत नणंद व सासू या नैसर्गिक शत्रू आहेत, असे त्या एकदा म्हणाल्या होत्या. शेवटी उच्चभ्रू कुटुंबातसुद्धा सासू ती सासू व नणद ती नणंदच !

—जे. एन. पोंडा


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

१. माहिष्मती–( अहिल्याबाई होळकर याचे जीवनावर कादबरी ) नयनतारा देसाई
२. तुमचे ग्रह तुमचे काय इच्छित साध्य करणार ?–द. शं. केळकर
३. अश्वमेध–(नाटक)–रत्नाकर मतकरी रु. ९/–
४. पंजाबी कहाण्या–सपादक–डॉ. हरभजन सिंह, अनुवाद–डॉ. प्रभाकर माचवे ,, १०/–
५. गंगव्वा गंगामाई–अनुवाद–शंकर पुणेकर मोकाशी
६. घुरमट–(कथा)–सरिता पतकी ,, १२/–
७. अमृतफळे–(कथा)–जी. ए. कुलकर्णी ,, १५/–

1. A Spell from Laker–(Cricket)–Jim Laker
2. Cricket And All That–(Cricket)– Denis Compton and Bill Edrich

* Raging inflation has changed your life-style. Change the life-style of books too. Carry them in a clean closed bag. Listen to an experienced Librarian When he tells you how to handle books.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

## रंगभूमी

विनया खडपेकर

# घरटे अमुचे छान

## ठरीव साचातील ढोबळ हाताळणी

समाधान देणारे नाटक आता क्वचितच पहायला मिळते; पण नाटकाचे लेखक श्री. विजय तेंडुलकर आणि दिग्दर्शक श्री. कमलाकर सारंग म्हणून विशिष्ट दर्जाची अपेक्षा बाळगून 'घरटे अमुचे छान' या नाटकाला गेले; पण निराशाच झाली.

मध्यमवर्गीय, पांढरपेशा माणूस हा भानगडखोर, ढोंगी, कातडीबचाऊ प्राणी असतो हा अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, चित्रपट यात घोळून घोळून बुळबुळीत झालेला विषयच या नाटकाचा विषय आहे!

पपा–ममी, दोन मुले–मोहन, निता असं चौकोनी सुखी कुटुंब. पपा म्हणजे राजाभाऊ एकदा परदेशी गेले असताना त्यांची प्रेयसी विमल त्यांच्या घरी येते. राजाभाऊंची पत्नी सुनेत्रा अस्वस्थ होते. ती समंजस, प्रेमळ विमल मुलांना आपलेसे करून घेते. सुनेत्रा चडफडते. एकसारखी भडकते. आपणच घरात उपऱ्या आहोत असे तिला वाटू लागते. राजाभाऊ परत येतात. विमलला घरात कशाला घेतली म्हणून पत्नीवर ओरडतात. विमलला 'चालती हो!' म्हणतात. कोणी माझ्याबद्दल काहीही सांगेल म्हणून विश्वास ठेवायचा का असे पत्नीला विचारतात, पतीची भानगड नाही असे वाटून सुनेत्रा खूष. ती चहा करायला गेल्यावर विमलला जवळ घेऊन राजाभाऊ गोडीत म्हणतात, 'तू का आलीस? मी येणारच होतो.' मग विमलही खूष. राजाभाऊ रात्री जेवायला येणार नाही म्हणतात तेव्हा पुन्हा सुनेत्रा साशंक. असे हे नाटकाचे कथानक. मधेच निताचे प्रेमप्रकरण येते. त्या प्रेमप्रकरणात थोडेसे मानसशास्त्रही येऊन जाते.

कथानकात अनेक गोष्टी खटकतात. सुनेत्राच्या मनात आधी पतीबद्दल कोणताही संदेह नसतो. तर एक अगदी साधे पत्र आल्या आल्या ती अस्वस्थ का होते? पतीच्या तोंडून ऐकून सुद्धा माहिती नसलेल्या स्त्रीला कोणी घरात राहू देईल हे शक्य वाटत नाही. वडिलांच्या प्रेयसीशी समंजस वयाची मुले केवळ तिने भेटी आणल्या, आपल्याशी हसते–बोलते म्हणून आपुलकीने मैत्रीने वागणे असंभवनीय. राजाभाऊंचे आणि विमलचे सूत का जमते ते कळत नाही.

हा संगतीचा अभाव फार्समधे सहज खपून जातो. कारण फार्सची प्रकृतीच वेगळी असते. फार्स वास्तवाशी साम्य दाखवतो; पण त्याच वेळी वास्तवापासून दूरही जातो. कार्यकारणभावाचा प्रश्न तेथे मग फारसा उद्भवतच नाही. हे नाटक पूर्णपणे फार्सच्या पातळीवर येत नाही. ते थोडेसे फार्स, थोडेसे वास्तववादी असे वाटते. सुनेत्राचे, मोहनचे फोनवरचे बोलणे, मोरेचे संवाद, मालुताईची बडबड हे सगळे फार्सवजा आहे. सुनेत्राचा चडफडाट, राजाभाऊंचे राग–लोभ हे फार्सच्या पातळीवर येऊ शकत नाही. यामुळे नाटकाचा तोल ढळतो.

नाटकात केवळ सुनेत्राचे व्यक्तिमत्त्व नीटपणे उभे राहिले आहे. संसारात रमलेली, नंतर अस्वस्थ झालेली, पतीची भानगड नाही असे वाटताच आनंदी होणारी, शेवटी पुन्हा साशंक झालेली, मैत्रिणीला जास्त शंका काढू नकोस म्हणणारी अशा अनेक बाजूंनी सुनेत्रा आपल्याला दिसते. कोवळ्या वयाच्या निताचे व्यक्तिमत्त्वही थोडेफार कळू शकते. बाकी सर्व पात्रे एकसुरी वाटतात. मोहन खुल्लंखुल्ला बोलणारा कॉलेजकुमार. मालूताई सो कॉल्ड सोशल वर्क करणारी स्त्री. पपा टिपिकल कातडीबचावू, दुटप्पी, पांढरपेशा माणूस. विमल सुजाण, मनमोकळी, सत्प्रवृत्त वगैरे.

नाटकात चांगली व्यक्तिचित्रे नाहीत. निताच्या निमित्ताने येणारे थोडे–फार मनोविश्लेषणही फारच ढोबळ वाटते. नाटकातील विनोदही फार ठरीव ठशाचे आहेत. 'मालुताई' टाइप स्त्रियांचा नाटकातून अगदी सुकाळ आहे. 'तुज आहे तुजपाशी' पासून आम्हाला त्यांचा परिचय आहे. कॉलेज-कुमारांचे ते शिव्या देत बोलणे तरी प्रेक्षकांना किती दिवस हसवणार आहे!

नाटकाचा प्रयोग उत्तम होतो. सुखवस्तू घराची सजावट योग्य आहे. सुनिला प्रधान (सुनेत्रा), सुषमा सावकार (निता) लालन सारंग (विमल), नलिनी कानिटकर (मालूताई) कमला सारंग (पपा) यांनी आपापल्या भूमिका चोख केल्या आहेत. विराज चिटणीस (मोहन), विजय कदम (मोरे) यांचे हावभाव मात्र कृत्रिम वाटतात.

प्रयोग चांगला असला, तरी ठरीव विषय, ठरीव विनोद, यांची ढोबळ हाताळणी यामुळे उथळ झालेले हे नाटक आहे. हे नाटक सुमारे सात–आठ वर्षांपूर्वी लिहिले गेले हे लक्षात घेऊनही विषयाच्या ढोबळ हाताळणीकडे दुर्लक्ष करता येत नाही. □

# फलज्योतिष शास्त्र की थोतांड ?

डॉ. शरद अभ्यंकर

भारतात नवजात बालकापासून तो आसन्न मरण वृद्धापर्यंत, बेकार युवकापासून तो लक्षाधीश सिनेनिर्मात्यापर्यंत सर्वांच्या सारखाच आवडीचा आणि महत्त्वाचा असा एक विषय आहे आणि तो म्हणजे फलज्योतिष यात आपले सर्व व्यवहार ज्योतिषाच्या सल्ल्याने करणाऱ्या महाभागापासून ते साप्ताहिकातले आठवड्याचे भविष्य नियमाने वाचणाऱ्यापर्यंत अनेक थराचे 'विश्वासू' लोक पहायला मिळतात, पण हा संपूर्ण अशास्त्रीय आणि खोटा प्रकार आहे असा निश्चय बाळगणारे फारच थोडे आढळतात. आपण आता जरा या शास्त्राची चिकित्सा करू या.

या शास्त्राची मूलभूत गृहीततत्त्वे अशी–

आकाशस्थ ग्रहगोलाचा पृथ्वीवरील मानवी प्राण्यांच्या जीवनावर परिणाम होतो.

हा परिणाम चागला वा वाईट होणे हे त्या माणसाच्या जन्मकाळी असणाऱ्या ग्रहाच्या स्थितीवर, तसेच पुढे निरनिराळ्या वेळी असणाऱ्या ग्रहस्थितीवर अवलंबून असते.

योग्य त्या अभ्यासाने हा परिणाम आगाऊ ओळखता येतो.

अनिष्ट ग्रहांची शाती वगैरे उपचार केल्यास वाईट परिणाम टाळता येतात.

आता यावर शास्त्रीयदृष्ट्या घेता येणारे आक्षेप असे–

ग्रहगोलाचा परिणाम होतो तर सूर्याचा कसा होतो ? तो तारा आहे, चंद्राचा का ? तो उपग्रह आहे. इतर ग्रहाना अनेक उपग्रह आहेत त्याचे काय ? नुसते आकाशस्थ गोलक, (Heavenly Bodies) असे म्हणले तर इतर लक्षावधी तारे, तारकापुज, धूमकेतू, अॅस्टरॉईड्स असतात. त्याचा का नाही ? सूर्यमालेतलेच ग्रह असे धरले, तर प्लूटो, नेपच्यून, हर्शल याचे काय ? पॅसाडोना हा एक आणखी ग्रह सूर्यमालेत असावा असा अंदाज आहे. त्याचे काय ? काही पाश्चात्य ज्योतिषी हे ग्रहसुद्धा विचारात घेतात. त्याचे चांगले-वाईट परिणाम कुणी ठरवले ? त्याकरता केलेले प्रयोग, त्याचे निष्कर्ष याबाबत शास्त्रीय संशोधन झाले आहे का ? बरे. हे झाले आहे असे मानले तर राहू, केतू हे ग्रह कुठले ? हे तर पृथ्वीच्या कक्षेतले काल्पनिक बिंदू आहेत. अशा बिंदूचा परिणाम मानवी जीवनावर कसा होईल ?

असा परिणाम मान्य केला तर एकाच वेळी एकाच ठिकाणी जन्म पावलेल्या दोन बालकाचे आयुष्य अगदी सारखे जायला हवे; पण काही मिनिटाचे अंतराने जन्मलेल्या जुळ्यापैकी एक मूल मरते, एक मूल जगते हे कसे ?

जन्माचे वेळच्या ग्रहाचा परिणाम होतो, असे म्हणतात. मग निश्चित जन्मवेळ कोणती ? शास्त्रीयदृष्ट्या जन्मवेळ म्हणजे पुरुषबीज व स्त्रीबीज याचा संयोग होतो ती; पण पत्रिका सर्रास बालक स्त्रीदेहाच्या बाहेर येते ती वेळ म्हणजे जन्मवेळ असे मानून करतात. ही वेळ अगदी ढोबळ असते, मागे पुढे होऊ शकते, आधी ठरवून बदलता येते. मुख्य म्हणजे यानुसार केलेल्या सर्वच पत्रिका सुमारे ९ महिन्यानी चुकलेल्या असतात. ज्या ठिकाणी जन्म झाला असेल तिथल्या अक्षांश-रेखाशानुसार ग्रहस्थिती काय असेल त्याप्रमाणे पत्रिका माडायला हवी; पण प्रत्यक्षात जन्म काश्मीरला (हनीमूनचे वेळी) आणि पत्रिका पुण्याला (प्रसूतीचे वेळी) असे होत नाही काय ? पंचांगातही ग्रहस्थिती मुबई टाइमप्रमाणे किंवा स्टँडर्ड टाइमप्रमाणे असते. प्रत्येक शहराची वेगळी थोडीच असते ? थोडक्यात म्हणजे काटेकोर शास्त्रीय निकषावर यातली एकही गोष्ट टिकत नाही हा सर्व गोलमाल मामला आहे !

ग्रहाचे परिणाम फक्त मानवी प्राण्यावरच का होतात ? इतर प्राण्यावरही झाले पाहिजेत. अगदी सूक्ष्म जंतूवरही झाले पाहिजेत. ज्योतिषीमडळी म्हणतात, होय असे परिणाम सर्व जीवावर होतात. (त्यानुसार रेसच्या घोड्याच्या पत्रिका माडणारे अनेक तज्ज्ञ ज्योतिषी पहायला मिळतातही !) आता जंतूवरही जन्मवेळी असणाऱ्या ग्रहाचे परिणाम होतात हे मान्य केले तर मजेशीर अनुमाने निघतील. एका भाड्यात लक्षावधी जंतू प्रत्येक क्षणाला जन्माला येत आहेत असे द्रावण आहे. त्यातले निम्मे बाजूला काढून तापवले तर हे सर्व जंतू मरतील, पहिले मात्र मजेत वाढत राहतील. या सर्वांच्या पत्रिकात शुभ ग्रह आणि तापवले त्यांच्या पत्रिका अकालमृत्यूयोग असणाऱ्या मानायच्या काय ?

आंध्र वादळ किंवा मोरवीसारख्या आपत्तीत एकेका गावातले शेकडो लोक एकाच वेळी प्राणास मुकतात. ही सर्व गावेच्या गावे काय अकालमृत्युयोगाने ग्रासलेली असतात ? इथल्या प्रत्येकाच्या कुडलीत एकाच दिवशी मृत्युयोग कसा काय असतो ? तसा असेल तर आधी एकाही ज्योतिषाच्या तो लक्षात कसा येत नाही ?

पूर्वी बालमृत्यूचे प्रमाण, तसेच साथीच्या रोगामुळे व युद्धामुळे तरुण वयात मरणाराचे प्रमाण खूप होते. हल्ली हे सर्व खूपच कमी झाले आहे. म्हणजे असे मृत्यू घडवून आणणारे ग्रह काय सध्या रजेवर गेले आहेत काय ? का त्यानी आपली गती बदलली आहे ? संततिविरहित जोडप्याचे प्रमाणही आता शास्त्रीय प्रगतीमुळे कमी झाले आहे. म्हणजे संततीला अडथळा आणणारे ग्रह आता कमताकद झाले काय ? प्राचीन रानटी समाजात विवाह हा प्रकारच नव्हता. त्या वेळी विवाह घडवून आणणारे वा लांबवणारे ग्रह काय करत होते ? देश हाच प्रकार पूर्वी नव्हता परदेशी फारच थोडे लोक जात. आता लक्षावधी लोक परदेशात गमन करतात. त्यांच्या कुंडलीत हे योग अचानक कसे काय वाढले ? अमेरिकन लोक

सर्वांत जास्त परदेशगमन करतात. जवळच्याच मेक्सिको वा क्यूबात हे करू शकत नाहीत. ह्या सर्व ग्रहाचाच परिणाम की काय ? आता गर्भपात कायदेशीर झाल्यापासून अनेक बालके जन्माला येण्यापूर्वीच मरण पावतात. हे कुठल्या ग्रहयोगामुळे घडत असावे बरे ?

माणसाच्या वा प्राण्यांच्या कुंडल्या मी एक वेळ समजू शकतो; पण ,क्रिकेटच्या सामन्याची कुंडली ! याची जन्मवेळ कुठली ? बोर्डाने सामना ठरवला ती का सामना सुरू होण्याची ? जन्मस्थान कोणते ? पण असल्या कुंडल्या मांडून वाटेल ते खोटे भविष्य दडपून देणारे ज्योतिषी पुण्यात आहेत. वर कमीत कमी १०० रुपये फी म्हणून जाहिरात करत असतात ! दुनिया झुकती है... दुसरे काय ?

असाच प्रकार राजकीय पक्षाच्या आणि अरूल्या ह्रोल इंडियाची पत्रिका मांडून दरवर्षी दिवाळी अंकात सबंध देशाचे भविष्य वर्तवणाऱ्या होरारत्नांचा. ७७ सारखा किंवा ८० सारखा अनपेक्षित निकाल लागला की या निवडणुकीची भविष्ये देणाराचे चेहरे फोटो काढण्यालायक होतात ! त्याच्या भविष्यातून होते, त्यापेक्षा जास्त करमणूक त्यांनी नंतर आपले भविष्य का चुकले याबद्दल केलेल्या केविलवाण्या सारवासारवीतून होते.

आता कॉम्प्यूटरविज्ञान इतके पुढे गेले आहे की लक्षावधी लोकाच्या अचूक पत्रिका आणि त्यांच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या घटना यांचा अभ्यास करून खरोखर परिस्थिती आणि जीवनातले महत्त्वाचे टप्पे यांचा संबंध असतो काय हे कूट चुटकीसरशी सोडवता येईल; पण कोणीही ज्योतिषी हे करणार नाही. कारण आपली थापेबाजी ज्या जोरावर चालते ते सिद्धातच खोटे पडले तर काय करा अशी त्यांना भीती असते.

ग्रहशांती वगैरे तर इतका बोगसपणा आहे की त्यावर वेगळे भाष्य करण्याची जरुरीच नाही. हल्ली दर्जेदार ज्योतिषी असले प्रकार सुचवीत नाहीत. त्यांची फीच जास्त असल्यामुळे जास्त पैसे काढण्याकरता आणखी ही थापेबाजी त्याना करावी लागत नाही.

पत्रिकेच्या खुळामुळे आधीच अवघड असलेले मुलीचे विवाह जमण्यात किती प्रचंड अडचणी येतात त्यावर वेगळा लेखच लिहावा लागेल. सायन्सचे Ph. D. सुद्धा पत्रिका जुळण्याचा हट्ट धरतात. स्वत: फारसे कर्तबगार नसणारे तरुण निदान बायकोच्या पत्रिकेत धनयोग असावा या आशेवर घोटाळत असतात.

आता तुम्ही म्हणाल की इतके हे शास्त्र खोटे आणि अशास्त्रीय आहे, तर सगळ्या जगात याचा प्रसार निरनिराळ्या वृत्तपत्रांत स्तंभ भरभरून भविष्यकथन आणि पुस्तके, मासिके आणि कन्सलटंट ज्योतिषी आणि परदेशात तर पॉश ऑफिसेस आणि सेक्रेटरी बाळगून केवळ अपॉइंटमेंटने काम करणारे फाइव्ह स्टार ज्योतिषी हे सगळे कसे काय ? आज हजारो वर्षे हा प्रकार चालू आहे ! इतका खोटा असता तर टिकला असता का ? त्याचा इतका प्रचार झाला असता का ? आता अमेरिकन लोक एवढे चंद्रावर जाऊन आलेले; पण तेसुद्धा...

तर आता आपण या बनावट शास्त्राचा प्रभाव लोकमानसावर का पडतो त्याची कारणे पाहू !

पुढे काय घडेल ते जाणण्याची प्रत्येक माणसाला तीव्र इच्छा असते. 'अज्ञाताबद्दल कुतूहल' हे जगाच्या उत्पत्तीपासून आहे.

आपले भवितव्य आपण घडवीत नसून दूर अंतरावर असणारे प्रबळ ग्रह हे ठरवीत असतात ही कल्पना माणसाचा अहंकार फुलवणारी असते.

आपल्या परागतीला, दारिद्र्याला वा अपयशाला आपला आळशीपणा, नाकर्तेपणा वा योग्य प्रयत्नाचा अभाव हे कारण नसून लांब कोठे तरी राहून आपल्याला पाण्यात पाहणारे ग्रह आहेत ही कल्पना कोणालाही हवीहवीशी वाटते.

काही वेळा एखाद्या माणसाला मिळणारे यश हे त्याच्या प्रयत्नापेक्षा वा योग्यतेपेक्षा इतर बाह्य गोष्टीवर जास्त अवलंबून असते. उदा. महत्त्वाच्या परीक्षेला बसलेला विद्यार्थी, नोकरी न मिळणारा तरुण, लग्न न जमणारी तरुणी, सिनेमानिर्माता, रेस, लॉटरी वा सट्टा यात भाग घेणारा, मंत्रिपदाचा इच्छुक पुढारी, निवडणूक लढवणारा नेता वगैरे वगैरे. ही सर्व मंडळी ज्योतिषीलोकांची कायदेशीर भक्ष्ये असतात आणि ज्योतिषीही त्यांचेवर यथास्थित ताव मारतात. यांना पाहिजे असतो दिलासा. ज्योतिषी तेवढा नेमका देतात.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा. अमेरिकन वा पाश्चत्य लोक करतात ती प्रत्येक गोष्ट बरोबर मानायचे कारण नाही. मूर्खपणाचा मक्ता काय फक्त भारतीयांनी घेतला आहे ?

यावर तुम्ही म्हणाल हे डॉ. अभ्यंकर कोण मोठे शहाणे ज्योतिष शास्त्र की अशास्त्र हे ठरवणारे ? अगदी बरोबर. मी काही कुणी मोठा शास्त्रज्ञ नाही. तेव्हा आता शास्त्रज्ञांची मते सांगतो.

जगातील १८६ अत्युच्च शास्त्रज्ञाची परिषद झाली. त्यात १८ नोबेल पारितोषिकविजेते होते. या भौतिक व खगोलशास्त्रज्ञानी पत्रक काढले, 'ज्योतिष शास्त्र नव्हे'. टा. ऑ. इं. २५–१०–७५

अतिमानवी व पारलौकिक कल्पनांचा शास्त्रीयदृष्टया विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीने जाहीर केले.

'ज्योतिष खरे नव्हे !'

—Readers Digest March 1979

डॉ. जयंत नारळीकर म्हणतात, 'मानवावर ग्रहांचे परिणाम होत नाहीत ! मराठी विज्ञान परिषद (चिंचणी, नोव्हेंबर ७८.)

पुणे येथील मानसोपचार रुग्णालयाचे प्रमुख डॉ. देव व ३००० रुग्णांना तपासून असे दिसते की पौर्णिमा, अमावास्येला त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही !' (माणूस, १०–७–७१)

इतिहाससंशोधक मंडळाचे अध्यक्ष ग. ह. खरे 'फलज्योतिषातले ठोकताळे वेणीसंहार नाटकातल्याप्रमाणे काकतालीयन्यायानेच कधीकधी बरोबर येतात.' (महाराष्ट्र टाइम्स १८–११–७९.)

डॉ. कोवूर यानी तर ज्योतिषांचे विरुद्ध आघाडीच उघडली होती. दहा अचूक पत्रिका दिल्यास त्यातले पुरुष कोण व स्त्रिया कोण आणि जिवंत कोण वा मृत कोण एवढी माहिती कोणाही ज्योतिषाने ५ टक्के चुकीला वाव ठेवून सांगावी, असे त्यांचं आव्हान होते. मी हे आव्हान पुन्हा देऊ इच्छितो आणि त्याला ५०० रुपये बक्षीस जाहीर करतो. है कोई आवाज ?

□

चित्रपट

# राम-बलराम

## आणखी एक फुसकी बुलेट

सोळा वेळा तीसरी मंझिल पाहिला असेल तुम्ही अन् 'जॉनी 'देखील. रिळामागोमाग रीळ उलगडत मसालेदार चीज देणाऱ्या विजय आनंदसाठी बुलेटही पाहिला असेल. जुन्या इमानाला जागून; पण त्याच इमानाने राम-बलराम पाहिलात तर तुम्हाला विजय आनंद आपली पुरानी पहचान साफ विसरलेला दिसेल !

कथा, पटकथा, एडिटिंग हातात असून विजय आनंद आपल्याला कुठंच भेटत नाही. उलट एखाद्या बेवफा दोस्तासारखा दुसऱ्या रस्त्यानं जातो. 'बुलेट 'ने केलेली जखम उगीच वाहू लागते.

राजकपूर काय किंवा व्ही. शांताराम काय एके काळी भरभरून दिलेले, नंतर पुन्हा ओरबाडून आपल्याकडनं घेत राहिले. सी. रामचंद्रची रसीली अनारकली जशी पुन्हा फुलत नाही, तसंच काहीसं गूढ वाटतं या लोकांबद्दल. व्यावसायिक तडजोडीसाठी बघता बघता ही गुणी माणसं भलत्याच रस्त्यानं जाताहेत. गोल्डीसाब त्याला काय म्हणून अपराध ठरावेत ?

तर सांगायचं असं की, प्रेक्षकांना आवडणाऱ्या फॉर्म्युलाचा आणखी एक कडू घोट ' राम-बलराम 'ने आपल्याला पाजला आहे !

स्टोरीत राम (धर्मेंद्र) व बलराम (अमिताभ) हे सगेभाई आहेत. त्यामुळे पहले दोस्ती व नंतर गलतफहमीचे डायव्हर्शन घेऊन फिर प्यार अशी चक्कर नाही. शिवाय झीनत अमान व रेखा अशी सरळ वाटणी असल्याने त्रिकोणाची किंवा त्यागाची बात नाही. राम व बलरामच्या खानदानाची वाट लावून त्यांच्या संपत्तीवर चैन करणारा व लहानपणापासून रामाला गलत रास्तेपर चलानेवाला व बलरामाला पोलीसइन्स्पेक्टर बनवून त्या दोघांच्या साहाय्याने श्रीमंत होण्याची म्हणजे सबसे बडा स्मगलर बनण्याची दृष्टी ठेवणारा जगत्पाल (अजित) हा मुख्य शत्रू. त्यानंतर अमजद, प्रेम चोप्रा, सुजीत कुमार या त्या मानाने चिल्लर गुंडांचा नायनाट ही राम-बलरामची कारकीर्द !

आता या कामगिरीवर निघालेले राम-बलराम. चाळीस किंवा त्याहून अधिक उंच मजल्यावरून उड्या मारतात. सुंदर इम्पोर्टेड गाड्यांच्या टक्करी करतात. खाणीच्या प्रचंड अवजड यंत्रामधून लीलया धावतात. प्रत्येक अर्ध्या तासाला गोळ्यांचा भडीमार घडवून आणतात. शे-पन्नास मुडदे पाडतात. हेलीकॉप्टरमधून लोंबकळून युद्ध करतात. आदिवासी नृत्य करतात अन् उरलेल्या वेळात प्रेमालाप अन् हरतऱ्हेच्या कवायती करतात !

या आणि अशा तऱ्हेच्या गोष्टी आपल्याला पहायला मिळतात; पण इथे असह्य होणाऱ्या काही नमुनेदार गोष्टी आहेत. त्या अशा—

१) झीनत अमानचा ' राम ' या शब्दाचा अँग्लोइंडियन उच्चार आणि तशाच वळणाचे संवाद— २) अजून यौवन मिरवणाऱ्या हेलनला झीनतची माता म्हणून पाहणं. ३) संजीवकुमारछाप पांढऱ्या बटांचा विग देऊनही तिला कन्या झीनत, होनेवाला दामाद राम याच्याबरोबर शत्रूच्या बंदिवासात एक नृत्य करावं लागलं आहे. ते सर्व नृत्य पाहणं, ' यार की खबर मिल गयी ' असंच काहीसं म्हणत, म्हजे सीता बंदिवासात आहे, लवकरच लंका नष्ट होईल, राम येईल वगैरे अर्थाचा धावा स्वतः राम, सीता व तिची आई नाना अंगविक्षेप करत म्हणतात. ४) उत्पलदत्तसारख्या संवादातून जान आणणाऱ्या माणसाला मूकाभिनय करायला लागला आहे. त्याच्या वाट्याला संवाद न देऊन मोठा अन्याय केला म्हणावं तर त्याची बिचाऱ्याची भूमिका डॅडीची असल्याने शेवटी फक्त कन्यादानाचं काम आहे. बाकी कुछ नही. ५) उर्मिला भट्ट माँ असल्याने पांढरी साडी अन् डोळे गाळणं व सूडाच्या भावनेनं पेटलेल्या रामचे पाय ओढणं (म्हणजे ' खूनखराबा मत करो ' वगैरे म्हणून ऐनवेळी शपथा घालणं) एवढंच काम ती करते.

रेखा झीनत किंवा धर्मेंद्र अमिताभ आणि अजित पूर्वसंचित कमी पडल्याने आपलं कोणतंच कौशल्य दाखवत नाहीत. सारी मंडळी मजबूर होऊन आपल्या वाट्याला आलेल्या फुटात वावरतात.

अशी आटोपशीर कथा असताना एडिटिंग टेबलावर विजय आनंदना काम असण्याचं कारण नव्हतं. त्यांच्याऐवजी तिथे कुणीही बसून, वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीसारखी कात्री चालवून, कुठलंही रीळ कुठंही जोडलं असतं तरी चाललं असतं.

सारा प्रपंच प्रेक्षकाना खूष करण्यासाठीच असल्याने सारेच मजबूर—

चित्रपटाच्या संगीताबद्दल—लक्ष्मीकान्त प्यारेलालच्याबद्दल बोलायचं म्हणजे पुन्हा अध्याय उघडावा लागेल. दोन प्रेमी जोड्यासाठी दोन द्वंद्वगीतं, भाईभाईंच्या प्यारसाठी एक, आदिवासींनी केलेलं एक आणि मगाशी सांगितलेलं ' अशोकवना 'च्या Situation वरचं एक. अशी आनंदबक्षीविरचित गीतं. ढोल, ताशा, वाजंत्री आणि अनेक वाद्यांच्या आदळआपटीचे आवाज ! बस् एवढेच.

या चित्रपटाचं एकच सुख आहे. ते म्हणजे स्व. फली मिस्त्रीची फोटोग्राफी. नवकेतनच्या जुन्या ब्लॅक अँन्ड व्हाइटमधून छायाचित्रणांच्या कविता चितारणाऱ्या फली मिस्त्रीनी जाता जाता एक सुदर लेणं दिलं आहे. शिवाय जगत्पाल (अजित) पोलीसइन्स्पेक्टर बलरामचं पोस्टिंग गोव्यात मागून घ्यायला लावतो ते आपल्या पथ्यावर पडलं आहे. गोव्यातले दूरवर पसरलेले समुद्रकिनारे, माडांच्या रांगा, जंगल आणि आभाळ याचा केवढा सुदर तपशील पडद्यावर भरला आहे! फली मिस्त्रीची ही फोटोग्राफीची जादुगिरी इतक्या भिकार, निरर्थक कथानकाला वापरली आहे की काही वेळा वाटतं पडद्यावरून सारी पात्रं बॅकग्राउंड म्युझिकसह नाहीशी व्हावीत अन् कॅमेरा नुसता समुद्र, आभाळ, झाडं यातून फिरत रहावा.

फली मिस्त्रीची प्रतिभा बिचारी सैरंध्री म्हणून रावलीय !

एक पुलीस अफसर होने के नाते... नंतरच्या साऱ्या गोष्टी पाठ असून बिचारा प्रेक्षक अमिताभची दिलफेक डायलॉगबाजी ऐकतो. अशा गदारोळात एखादा प्रसंग चांगला भेटेल या आशेने विजयआनंदचा चाहता एकोणीस रिळं संपण्यापर्यंत बसतो.

ह्या मंडळीवरच्या आत्यंतिक प्रेमामुळेच आपण वाटेल ते सहन करीत राहतो. आपणही तसे मजबूरच आहोत, नाही का ?

—सुलभा तेरणीकर